# कुबाचा झुंझार क्रांतीलढा

डॉ. सुलभा ब्रह्मे

# प्रस्तावना

कूबाची समाजवादी वाटचाल आज दोलायमान अवस्थेत आहे. गेली चाळीस वर्षे नियोजनपूर्वक विकासाचे शिस्तबद्ध प्रयत्न, त्यासाठी जनतेने त्याग, बांधिलकी, जिद्द याची शिकस्त करूनही आज कूबा आर्थिक कोंडीत सापडला आहे. आणि त्यातून मार्ग काढायचा तर कूबाच्या भौतिक परिस्थितीच्या मर्यादा आड येत आहेत. कूबाची लोकसंख्या आहे मुंबई शहराएवढी–१.१ कोटी आणि भौगोलिक क्षेत्र आहे १०९८ चौ.कि.मी.! कूबात तेलसाठे अल्प आहेत. निर्यात करायला हूकमी संपत्ती हाती नाही. एवढेच नव्हे तर अर्थव्यवस्थेला पायाभूत अशा इंधनासाठी कूबाला परकीय चलन मिळवण्याची गरज आहे. कूबाचे मुख्य निर्यात उत्पादन साखर – त्याला खात्रीशीर बाजारपेठ उपलब्ध नाही व साखरेच्या किमतीमध्ये आंतरराष्ट्रीय बाजारात झंझावाती चढउतार होते. त्यामुळे निर्यातीचे उत्पन्न अत्यंत अपुरे व बेभरावशाचे आहे.

कूबन जनतेने लोकशाही व स्वातंत्र्यासाठी प्रदीर्घ काळ लढा दिला आणि १९५९ साली अमेरिकेच्या साम्राज्यशाही जोखडातून कूबन जनतेने आपली सुटका करून घेतली. त्यावेळी कूबाची अर्थव्यवस्था अमेरिकेवर पूर्णतया परावलंबी होती. कूबातील क्रांतिकारक शासन उलथवण्यासाठी अमेरिकेने कूबाची आर्थिक नाकेबंदी करून पुरी कोंडी करण्याचा प्रयत्न केला; परंतु समाजवादी देशांच्या विशेषत: सोविएत युनियनच्या मदतीमुळे कूबा आर्थिक आणीबाणीतून बाहेर पडू शकला आणि १९९० पर्यंत कूबाने लक्षणीय आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक प्रगती साधली; परंतु कूबासारख्या इंधनाचा तुटवडा असलेल्या चिमुकल्या देशाला आर्थिक स्वयंनिर्भरता गाठणे अशक्य आहे. त्यामुळे सोविएत युनियनला साखर निर्यात करून इंधनतेल व इतर आवश्यक वस्तूंची आयात समाजवादी देशांकडून करून कूबा आर्थिक प्रगती साधत होता. परंतु १९९१ साली सोविएत युनियनमधील शासकीय समाजवादी व्यवस्था कोसळली. परिणामी सोविएत व्यापार बंद पडला आणि कूबाची पुरी दूरवस्था झाली. जगात अन्य समाजवादी देशच शिल्लक नसल्याने भ्रातृभावी मदतीची शक्यताच संपली आणि भांडवलशाही वाघांच्या तोंडी कूबा फेकला गेला. निर्यातीत प्रचंड घसरण झाल्याने आयात इंधन, खते, रसायने, अन्नधान्य यांचा मोठा तुटवडा निर्माण झाला. त्यामुळे कूबातील उद्योग व शेती क्षेत्रात आणीबाणीची वेळ आली. गरिबी व बेकारीचे प्रश्न उभे राहिले. परकीय चलन मिळण्यासाठी अर्थव्यवस्था खुली करणे भाग पडले. परिणामी भांडवलशाही नफेखोरी व उपभोगवादाचा मारा कूबावर सुरू झाला. आजही कूबात समाजवादी अर्थव्यस्था आहे, पण ती भांडवलशाहीच्या सापळ्यात सापडलेली असल्याने मोठ्या पेचात आहे. तरीही बहूसंख्य कूबन जनता समाजवादासाठी झगडते आहे आणि यातच कूबातील क्रांतीचे श्रेय आहे.

कूबातील आर्थिक आणीबाणीमुळे जीवन एवढे खडतर बनले असताना अजूनही समाजवादाशी बांधिलकी मानणारे तरुण जेव्हा एका भारतीय वार्ताहराला भेटले तेव्हा त्याला ते अनाकलनीय वाटले. कारण गरिबीची वेळ आली तरीही समाजवादी समाजात प्रत्येक नागरिकाला ताठ मानेने जगता येते याचे

महत्व तो भारतीय समजू शकला नाही.

पन्नास वर्षांचा स्वातंत्र्य लढा आणि अखेरचा सहा वर्षांचा अतिदुर्धर क्रांतिलढा व क्रांतीनंतर चाळीस वर्षाच्या प्रदीर्घ आर्थिक–सामाजिक पुनर्रचनेच्या लढ्यातून कूबात झालेले क्रांतिकारी परिवर्तन, पदोपदी आलेल्या अडचणी आणि १९९१ पासून उभी ठाकलेली आणीबाणी याचा धावता आढावा प्रस्तुत पुस्तिकेत घेतला आहे. न्याय्य समानतापर, भ्रातृभावी, मानवी समाजजीवन उभारण्यासाठी जिवाच्या कराराने वर्षानुवर्षे भांडवलशाहीशी निग्रही झुंज देणारी कूबन जनता आणि कूबाचे सच्चे नेतृत्व यांच्या लढ्याचा इतिहास निश्चितच स्फूर्तीदायी व पथदर्शक आहे. विशेषत: आज अन्याय्य, शोषक, अतिविषम, अमानवी अशा भांडवलशाही अर्थव्यवस्थेला पर्यायच नाही अशी अपसमजूत जगभर मोठ्या हिरिरीने ठसवली जात असताना अमेरिकेच्या अंगणामधील चिमुकला कूबा केवढी भरारी मारू शकला या वास्तवाला उजाळा देणे अधिकच महत्त्वाचे वाटते. मानवी प्रयत्नांनी क्रांतिकारी परिवर्तन घडवणे शक्य आहे. ते कसे घडवावे, कसे पुढे न्यावे याबाबत कूबाचा इतिहास आपणास बरेच काही शिकवतो.

पुस्तिका दोन भागात विभागली आहे. पहिल्या भागात कूबाच्या क्रांतिलढ्याची झलक दिली आहे ती प्रसिद्ध लेख अरुण साधू यांच्या शब्दात. १९७२ साली साप्ताहिक माणूसमध्ये अरूण साधू यांची "फिदेल,चे आणि क्रांती' ही कादंबरी क्रमश: (१२ लेख) प्रसिद्ध झाली. ती फार गाजली, तरुण पिढीला स्फूर्तीदायी ठरली. आज ती दुर्मिळ आहे. ती कादंबरी मूळ रूपात संपूर्ण छापणे आजच्या वाचक वर्गाचा छोटेखानी साहित्याकडचा कल लक्षात घेता शक्य वाटले नाही. शिवाय क्रांतीनंतरचा इतिहासही तेवढाच महत्त्वाचा आहे. ८० पानांच्या मर्यादेत हा सारा इतिहास सादर करायचा म्हणजे क्रांतीचा इतिहास संक्षिप्त करणे भाग होते. अरूण साधू यांना पुस्तकाच्या संक्षिप्त रूपाबाबत विचारले तेव्हा त्यांनी मोठ्या दिलखुशीने सहमती दिली, याबाबत त्यांचे विशेष आभारी आहोत. पहिला भाग हा त्यांच्या शब्दात पण संक्षिप्त केलेला आहे. संक्षिप्तीकरणाने जो रसभंग झाला असेल त्याला आम्ही जबाबदार, पण त्यात जी खुमारी आहे, ती अरुण साधूंची.

पुस्तिकेच्या दुसऱ्या भागात क्रांतीनंतरच्या स्थित्यंतरांचा उहापोह केला आहे. क्रांतिलढ्यातून अमेरिकेचे बाहूले हूकुमशहा बातिस्ताचे शासन उलथवून फिदेल–राऊल कास्त्रो, चे गेवारा आदी क्रांतिनेत्यांच्या नेतृत्वाखालील लोकशासन सत्तेवर आले आणि दुसऱ्या एका प्रदीर्घ लढ्याला आरंभ झाला. अमेरिकन कंपन्यांचे व कूबन जमिनदारांचे वर्चस्व झुगारणे, कसणाऱ्याला जमीन, बेकारीचे उच्चाटन, सर्व जनतेला किमान राहाणीमान, शिक्षण, आरोग्य याची शाश्वती, आर्थिक, सामाजिक, लैंगिक भेदाभेद कमी करणे, लोकसहभागाने आर्थिक विकास आणि अमेरिकेच्या षड्>यंत्री कारवायांबाबत सतत जागरूक राहून मुकाबला करणे ही पर्वतप्राय आव्हाने पेलत कूबाने न्याय्य, समानतापर भातृभावी समाज उभारणीकडे वाटचाल कशी केली याचा धावता परामर्श भाग–२ मध्ये घेतला आहे.

विकसनशील देशाला सामाजिक विकास, आर्थिक प्रगती व राजकीय सहभाग साधायचा असेल तर उत्पादन–व्यवस्थेतील शोषण–संबध आणि सामाजिक विशेषाधिकार–हक्कदारी–(वर्ग–वर्ण–जात–लिंग आधारित) यांचा अंत घडवणे हे पायाभूत होय हे कूबाच्या इतिहासातून स्पष्ट होते. त्यामध्ये कोणताही मध्यममार्ग, तडजोड शक्य नाही हेही गेल्या पन्नास वर्षांतील विकसनशील देशांना दिलेल्या मदत योजनांचे फलित तपासले तर प्रकर्षाने पुढे येते. १९६१ साली अमेरिकेचे अध्यक्ष जॉन केनेडी यांनी कूबातील समाजवादी क्रांतीमुळे धास्तावून लॅटिन अमेरिकेतील बंडखोरीचे मूळ –दारिद्र्य व मागासलेपणा – दूर करण्यासाठी शेतीतील उत्पादकता वाढ, शिक्षण, आरोग्यसुविधा, घरबांधणी व विकासाच्या लाभाचे न्याय्य वाटप याची गरज मांडून अर्थिक साहाय्य योजनां्द्वारा मदतीचा उदार (!) हात पुढे केला. पण त्या मदत–योजनांमार्फत विकासाचे ध्येय साध्य झाले नाही कारण मदतीच्या मुखवट्याखाली या देशांचे शोषणच तीव्रतर बनवण्याची या मदत योजनांमध्ये व्यवस्था होती. परिणामी लॅटिन अमेरिकन देशांवरचे कर्जाचे ओझे वाढले आणि आर्थिक विषमता व दारिद्र्य वाढले. कूबाचा शेजारी – निकरागुआमध्येही जनतेने क्रांतिकारी लढे दिले. १९७९ च्या क्रांतीनंतर समाजवादाकडे वाटचाल सुरू केली पण अमेरिकेच्या हस्तक्षेपाने १९८९ मध्ये देश साम्राज्यवादाच्या जाळ्यात पुन्हा अडकला. आर्थिक पिछेहाट चालू झाली. कर्जाचे डोंगर, परावलंबन व गरिबी वाढली. निकारागुआ हे कूबासारखीच परिस्थिती असलेले एक उदाहरण. निकारागुआसारखीच अवस्था लॅटिन अमेरिका, आफ्रिका व आशियामधील पूर्ववासाहतिक देशांची आहे. साम्राज्यशाहीच्या अंकित निकरागुआ आणि त्याचाच शेजारी जागतिकरणाच्या सापळ्यात न सापडलेला समाजवादी कूबा यांच्या शैक्षणिक, सामाजिक प्रगतीबाबतची पुढील आकडेवारी समाजवाद काय साधू शकतो हे स्पष्ट करते. निकरागुआ,भारत व अन्य विकसनशील देश कूबाच्या हजारो योजने मागे आहेत. आरोग्याच्या निकषांवर तर कूबा विकसित देशांच्या बरोबर किंवा पुढेही गेलेला दिसतो.

| | संशोधक–शास्त्रज्ञ (हजारमागे) ९०–९६ | साक्षरता (प्रतिशत) १९९५ | लोकसंख्यावाढ (% वार्षिक दर) १९७०–९५ | डॉक्टर १९९३ | क्षयरोगी (दहाहजारामागे) १९९५ | बालमृत्यू दर (हजारात) १९९६ |
|---|---|---|---|---|---|---|
| विकसित देश | ३.८ | ९९ | ०.७ | २८७ | २७.६ | १३ |
| कूबा | २.७ | ९६ | १.० | ५१८ | १४.७ | १० |
| विकसनशील देश | ०.४ | ७० | २.१ | १६० | ६८.६ | ६५ |
| निकरागुआ | ०.३ | ६६ | २.८ | ८२ | ६८.९ | ४४ |
| भारत | ०.३ | ५२ | २.१ | ४८१ | ३०.६ | ७३ |

टीप : कूबा :१९९५ मधील लोकसंख्या ११० लाख, क्षेत्रफळ १०९८ चौ. कि.मी.

निकारागुआ : ४१ लाख लोकसंख्या, क्षेत्रफळ १२१४ चौ. कि.मी.

संदर्भ : Human Development Report, UNDP, Oxford, 1998

भांडवलशाहीशी टक्कर देत समाजवादाकडे वाटचाल करण्याचे आव्हान स्वीकारायचे तर मार्क्सवादी विचारांची शिदोरी व प्रगल्भ, सच्चे, निधडे, नि:स्पृह नेतृत्व आणि लढाऊ, त्यागी, समंजस जनता असा त्रिविध संयोग साधला पाहिजे हे कूबाचा क्रांतीनंतरचा चाळीस वर्षांचा झुंझार लढा दाखवतो. त्यापासून यथायोग्य बोध घेऊन विशेषत: तरुण–तरुणींनी आपल्या देशावर होत असलेले अमेरिकेचे आर्थिक–सामाजिक–सांस्कृतिक आक्रमण व भारतीय राज्यकर्त्यांयशी संगनमताने भारताच्या संपत्तीची प्रचंड लूट आणि श्रमिकांचे खच्चीकरण या विरोधातील लढ्यात उतरावे आणि आपला देश स्वतंत्र, स्वायत्त व स्वयंनिर्भर बनवावा, सर्व जनतेला चांगले जीवनमान व अर्थपूर्ण काम मिळवण्यासाठी देशाच्या संपत्तीचा सुयोग्य वापर करण्याच्या दृष्टीने वाटचाल करावी या दृष्टीने कूबन जनतेचा स्वातंत्र्यलढ्याचा हा स्फूर्तीदायी इतिहास जिज्ञासूंच्या हाती देत आहोत.

तरुण वाचकांना ही पुस्तिका कार्यप्रवण करील असा विश्वास वाटतो.

२६ जुलै २००२ **सुलभा ब्रह्मे**

शंकर ब्रह्मे समाजविज्ञान ग्रंथालय, पुणे.

देश, प्रांत, गावे, व्यक्ती आदी स्पॅनिशमधील विशेष नावांच्या इंग्रजीतील स्पेलिंगवरून मराठीत अनेक चुकीचे उच्चार रूढ झाले आहेत. प्रस्तुत पुस्तिकेत ते स्पॅनिश उच्चाराप्रमाणे देण्याचा प्रयत्न केला आहे. पूर्ण बरोबर उच्चार मराठीतून देता येत नाहीत. कारण काही व्यंजनांचे हूबेहूब उच्चार मराठीतून दर्शविणे कठीण होते. उदा. हॅवाना (करvररि). यातील "ह' चा उच्चार "ह' व "अ' यामधील आहे व "व' चा "व' व "ब' मधील आहे. पुस्तिकेत उच्चार हावाना असा दिला आहे, "चे गव्हेरा'चा "चे गेवारा', क्यूबाचा "कूबा', फिडेल कॅस्ट्रोचा "फिदेल कास्त्रो' इत्यादी.

# उपोद्घात

## अणुयुद्धाच्या उंबरठ्यावर : २२ ऑक्टोबर १९६२!

""कूबाच्या प्रश्नावर अणुयुद्ध पेटून साऱ्या जगाची होळी होण्याचा धोका!'' या मथळ्यांनी सारे जग हादरले. अणुयुद्धसज्जतेच्या दिशेने अमेरिकेच्या हालचाली वेगाने सुरू झाल्या. अमेरिकीची अण्वस्त्रवाहक बॉम्बर्स व पाणबुड्या यांना हल्ल्यासाठी तयार राहाण्याचे हूकूम सुटले! अमेरिकन नागरिकांना बचावाबाबतच्या सूचनांचा मारा टी.व्ही.वरून सुरू झाला. कूबापासून आठशे मैलावर अमेरिकेच्या नौदलाने साखळी तयार करून कूबाच्या दिशेने आगेकूच करणाऱ्या सोविएत जहाजांना अडवण्यास सुरूवात केली. बुखारीन हे सोविएत जहाज थोपवून त्याची झडती घेण्यात आली. अमेरिकेचे अध्यक्ष केनेडी यांचा सोविएत युनियनला इशारा गेला की, "कूबात एकही अण्वस्त्र पोचता कामा नये, कूबातील सर्व अण्वस्त्रे ताबडतोब हलवा. कूबातून एकही अण्वस्त्र सोडले गेले तर रशियावर तत्क्षणी तुफान अण्वस्त्रहल्ला केला जाईल.'

सोविएत शासन अमेरिकेच्या इशाऱ्याबाबत गप्प होते. अण्वस्त्रधारी रशियन जहाजांची कूबाच्या दिशेने आगेकूच चालूच होती. जगातील सारी जनता अणुयुद्धाच्या धोक्याने भयग्रस्त आणि कूबाच्या प्रश्नातून निर्माण झालेल्या आणीबाणीने दिङमूढ झाली. हा प्रश्न कां व कसा निर्माण झाला याची कोणालाच कल्पना नव्हती आणि एकाएकी हा प्रश्न सुटला. अमेरिकी टेहळणी विमानांना आढळले, की रशियन जहाजे ९० अंशाचा कोन करून परतू लागली आहेत. परंतु अण्वस्त्रतळ हलवण्याबाबत मात्र सोविएत युनियन अजून गप्पच होते. तेव्हा अमेरिकेने फ्लॉरिडा किनाऱ्यावर सैन्याची जमवाजमव सुरू केली. नौदल व वायूदल सज्ज करून कूबातील रशियन तळ नष्ट करण्याची अमेरिकेने धमकी दिली. तेव्हा **"अमेरिका कूबावर आक्रमण करणार नाही' असे आश्वासन घेऊन ख्रुश्चोवने अण्वस्त्रतळ काढून घेण्याचे कबूल केले.**

अणुयुद्धाच्या उंबरठ्यावर पोचलेल्या जगभरच्या जनतेने सुटकेचा नि:श्वास  टाकला!

जग असे अण्वस्त्र युद्धाच्या उंबरठ्यावर पोचण्याची वेळ २२ ऑक्टोबर १९६२ रोजी आली तरी कां? ११ डिसेंबर १९६० रोजी कास्त्रोचा खून पाडण्याचा सी.आय.ए.चा डाव फसला होता. अमेरिकेतील स्थलांतरित कूबनना लष्करी व अन्य सर्व साहाय्य देऊन कूबावर केलेल्या आक्रमणातही (१७ एप्रिल १९६१) अमेरिकेला सपशेल पराभव पत्करावा लागला होता. तेव्हा १९६२ साली ७ मार्चला अमेरिकेतील लष्करप्रमुखांनी तयार केलेल्या गुप्त अहवालामध्ये कबुली देण्यात आली होती, की कूबात असंतोषाचा भडका उडवून क्रांतिकारी सरकार हटवणे  अशक्य आहे. आता कूबाला नष्ट करण्याचा एकच मार्ग शिल्लक होता– अमेरिकेचे कूबावर प्रत्यक्ष लष्करी आक्रमण. परंतु प्रश्न असा पडला, की असे उघडउघड आक्रमण करायला निमित्त काय शोधावे ? ९ मार्च १९६२ रोजी तयार केलेल्या अहवालात यासाठी अनेक पर्याय सुचवले गेले होते. उदा. १) ग्वानतानामो उपसागरातील

अमेरिकेच्या नाविक तळावरील एक जहाज अमेरिकेनेच उडवून द्यायचे व कूबाने अमेरिकेचे जहाज उडवल्याचा खोटा आरोप करून कूबाविरुद्ध लष्करी कारवाई सुरू करायची. २) कूबातून अमेरिकेला स्थलांतरीत होणारे कूबन प्रवासी घेऊन निघालेले जहाज बुडवायचे आणि त्याचा ठपका कूबावर ठेवून कूबावर लष्करी हल्ला करायचा. ३) अमेरिकन विमानावर कूबन मिगने हल्ला केल्याचे नाटक रंगवून या काल्पनिक हल्ल्याचा जोरदार निषेध करून कूबावर लष्करी आक्रमण करायचे.

प्रेसिडेंट केनेडी यांनी ऑगस्ट १९६२मध्ये याबाबत अंतिम निर्णय घेण्याच्या दृष्टीने "तातडीचे' म्हणून या दस्तऐवजावर शिक्कामोर्तब केले. या गुप्त निर्णयाचा सुगावा सोविएत युनियनला लागला. तेव्हा सोविएत नेत्यांनी कास्त्रोशी या प्रश्नावर चर्चा केली व अमेरिकेचा लष्करी हल्ला कसा थोपवता येईल अशी विचारणा केली. कास्त्रोने सुचवले की, "कूबावरचे आक्रमण म्हणजे सोविएत युनियनवरचेच आक्रमण मानले जाईल', असे सोविएत युनियनने जाहीर करावे. मग प्रश्न असा उपस्थित झाला, की ही घोषणा पोकळ न वाटता खरी वाटली पाहिजे, यासाठी काय करावे? तेव्हा सोविएत अण्वस्त्रे कूबामध्ये ठेवण्याचे सोविएत युनियनने सुचवले आणि त्याबाबतची कार्यवाही तातडीने सुरू झाली.

अमेरिकेपासून अवघ्या १५० कि.मी.वर रशियन अण्वस्त्रतळ कूबात उभा रहात असल्याचे अमेरिकेच्या हेरखात्याने घेतलेल्या हवाई छायाचित्रांवरून स्पष्ट झाले. सरळ हल्ला करून अण्वस्त्रे नष्ट करण्याचा प्रयत्न केल्यास रशियाच्या प्रतिहल्ल्याचा धोका होता. तेव्हा अमेरिकेने रशियाला धमकावले. अण्वस्त्रतळ हलवण्याबाबत निर्वाणीचा इशारा दिला. कूबावर स्वारी करणार नाही, असे आश्वासन अमेरिकेकडून घेऊन ख्रुश्चोवने कूबामधून अण्वस्त्रे हलवली व अमेरिकेचे कूबावरील लष्करी आक्रमण थोपवले.

१९६२ ऑक्टोबरमध्ये अशा रीतीने कूबा जागतिक मंचावर अचानक अवतरला. अमेरिकेच्या (यू.एस.ए.) दक्षिणेचे हे चिमुकले बेट नकाशात सापडणेही कठीण. ते प्रकाशझोतात येऊ लागले ते १९५९ साली अमेरिकेच्या टाचेखालील कूबाने अमेरिकेचे वर्चस्व झुगारून समाजवादाच्या दिशेने वाटचाल सुरू केल्यावर. अमेरिकेच्या दृष्टीने अमेरिकेच्या अंगणात "कम्युनिझम'चा "धोका' येऊन ठेपला. त्यामुळे अमेरिकेचे धाबे दणाणून कोणत्याही अघोरी मार्गाने कूबातील समाजवादी शासनाला जमीनदोस्त करण्याचे प्रयत्न अमेरिकेने जारी केले. ते प्रयत्न अखंडपणे गेली ४० वर्षे चालू आहेत आणि १ कोटी लोकसंख्येचा चिमुकला कूबा अमेरिकेपासून काही मिनिटांच्या अंतरावर असूनही अमेरिकेला नामशेष करता आलेला नाही.

भाग – १

# कूबाचा क्रांतिलढा

## १. २६ जुलै १९५३

अजून पहाटेचे पाचही वाजायचे होते. खरे म्हणजे एवढ्या पहाटे सारे सांतिआगो दे कूबा हे शहर नेहमी गाढ साखरझोपेत असायचे. परंतु आदल्याच दिवशी कसला तरी स्थानिक उत्सव होता. त्यामुळे २६ जुलै १९५३ च्या त्या पहाटे कूबा द्वीपाच्या दक्षिण भागातील त्या छोट्याशा शहरात अजून थोडी जाग होती. अनेक ठिकाणी रोषणाई चालू होती, नाचगाणी चालू होती. स्पॅनिश–कूबन गीते गाईली जात होती. रस्त्यावर रहदारीही होती. पण तुरळक.

त्याच वेळी सव्वीस वाहनांचा एक मोठा ताफा सांतिआगो दे कूबाच्या एका रस्त्यामधून शहराच्या दिशेने सरकत होता. एरवी एवढा मोठा मोटारींचा, ट्रक्सचा ताफा शहरातून यावेळी गेला असता तर भराभरा घरांची दारे–खिडक्या उघडल्या गेल्या असत्या आणि काय आहे म्हणून कुतूहलाने लोकांनी डोकावून पाहिले असते. पण त्या पहाटे लोक एक तर दमून झोपले तरी होते किंवा जल्लोषात मग्न होते.

वाहनांचा तो ताफा ठरलेल्या चौकात आला. तिथे त्याचे तीन भाग झाले. एक एक तुकडी ठरलेल्या दिशेने निघून गेली. शेवटच्या मोटारीतल्या उण्या–पुऱ्या सत्तावीस वर्षाच्या भरदार शरीरयष्टीच्या फिदेल कास्त्रोने डोळे बारीक करून एकवार सर्व वाहने गेल्याची खात्री करून घेतली आणि सीटवर ठेवलेल्या एका सबमशीनगनवरील आपली पकड अधिकच घट्ट केली व ड्रायव्हरला हूकूम सोडला, चलो –

अवघ्या दोनशे तरुणांसह आणि त्याहीपेक्षा कमी अशा जुन्या–पुराण्या शस्त्रांनिशी फिदेल कास्त्रो दक्षिण अमेरिकेतील एका जबरदस्त जुलुमी हूकूमशाहीला बेडरपणे टक्कर द्यायला निघाला होता. या हल्ल्याचा उद्देश होता सांतिआगोमधील मोनकादो लष्करी बराकींवर हल्ला करून ती सर करणे व सांतिआगोपासून जवळच असलेल्या बयामो या दुसऱ्या बराकीही ताब्यात घेणे.

एवढ्याने काही कूबाचा हूकूमशाह फुलखेन्सीओ बातिस्ता याची लष्करी राजवट एकाएकी उलथून पडणार नाही हे फिदेलला माहीत होते आणि तरीही त्याने तो धाडसी बेत आखला होता. त्याने काही हिशेब केले होते. हल्ल्यात यश पदरी आले तर क्रांतिकारकांना एक प्रचंड नैतिक विजय मिळणार होता. प्रचाराला एक जबरदस्त साधन मिळणार होते. पुढे या बराकींमधून क्रांतिकारकांना निघून जावे लागेल. पण कूबाच्या जनतेला हे दिसून येईल, की मूठभर क्रांतिकारक देखील बातिस्ताच्या फौजांना भारी आहेत. थोडा धक्का दिला तर ही राजवट सहज कोसळून पडेल आणि पराभव झाला तर या हल्ल्याकडे सर्व देशाचे जे लक्ष वेधले जाईल त्याचेच भांडवल बंडखोरांना करता येईल आणि जनतेत जाणीव निर्माण करता येईल.

ही धाडसी योजना आखायला फिदेल कास्त्रोला एक वर्ष लागले होते. गुप्त बैठकी होत होत्या.

शस्त्रास्त्रे, वाहने छुपेपणाने विकत घेतली जात होती. हल्ल्याचे थोडेसे छुपे शिक्षणही दिले जात होते व प्रत्यक्ष लढ्याची तपशीलवार योजना आखली जात होती. उणे-पुरे दोनशे जवान यात सामील होते. दोन तरुणीही होत्या. सारे तिशीच्या आत, जवळच्या सर्व मोलाच्या चीजवस्तू विकून त्यांनी या हल्यासाठी कष्टाने पैसे उभे केले होते. सगळ्यांनी आपल्या नोकरी-व्यवसायांवर तुळशीपत्र ठेवले होते. सारे पेटले होते.

पंचवीस जुलैला शस्त्रास्त्रे आणि सारी माणसे सांतिआगो जवळच्याच एका पोल्ट्री फार्ममध्ये जमली. सत्तावीस तरुणांना बयामो बराकीवर हल्ला करण्यासाठी पाठविण्यात आले आणि फिदेलच्या नेतृत्वाखाली मोनकादोवर चढाई करणारी तुकडी सांतिआगो शहराकडे पहाटे निघाली. त्यांच्या अंगावर लष्करी पोषाखच होते. त्यामुळे बराकीकडे जाताना कुणाला त्यांचा संशय आला नसता.

मोनकादो बराकी सांतिआगो शहराच्या अगदी मध्यभागी होत्या. बराकीच्या प्रवेशद्वारावरील रखवालदाराला ताब्यात घ्यायचे, जवळचे इस्पितळ ताब्यात घ्यायचे, जवळचीच सरकारी मुख्य कचेरी पॅलेस ऑफ जस्टीस कब्जात घ्यायची आणि मग मुख्य बराकीवर हल्ला चढवायचा, अशी योजना होती.

आबेल सांतामारिया, डॉ. मुनोझ, त्रिगो हे तरुण व नर्सेसच्या वेशात असलेल्या हेदी सांतामारिया व मेल्बा हरनान्देथ्स या तरुणींकडे हॉस्पिटलमध्ये घुसण्याची कामगिरी होती. फिदेलचा धाकटा भाऊ राऊल कास्त्रो याच्या तुकडीवर पॅलेस ऑफ जस्टीस घेण्याची जबाबदारी होती. खुद्द फिदेल आपल्या तुकडीसह बराकीवर हल्ला चढवणार होता.

बरोबर सव्वापाचला फिदेलच्या सब-मशिनगनमधून पहिली गोळी सुटली आणि हल्ल्याला तोंड लागले. साऱ्या गोष्टी काही पूर्वनियोजनाप्रमाणे होत नव्हत्या. बंडखोरांची एक मोटार रस्त्यावरून घसरली व त्याच वेळी शिपायांचे एक सशस्त्र पथक गार्डरूममधून बाहेर आले. त्यामुळे फिदेलला गोळ्या झाडाव्या लागल्या. बंडखोरांची दुसरी सशस्त्र तुकडी सांतिआगोच्या दुसऱ्या रस्त्याने येणार होती. पण ही तुकडी रस्ता चुकली व तिला बराकीपर्यंत पोचायला उशीर झाला. या तुकडीजवळ अधिक भारी शस्त्रे होती.

पॅलेस ऑफ जस्टीस आणि हॉस्पिटल सहज ताब्यात आले. पण एकदा गोळ्या सुटू लागल्यावर बराकीतल्या शिपायांनी जोरदार प्रतिकाराला सुरुवात केली. एक दोन बराकीमध्ये बंडखोर घुसून त्यांनी तेथील सैनिकांना कडे केले. पण गोळ्या सुटल्यामुळे शत्रूला एकदम विस्मयचकित करून सोडण्याची संधीच गेली आणि बराकीच्या मधल्या पटांगणात घुसलेल्या बंडखोरांवर चारी बाजूंनी गोळ्यांचा वर्षाव होऊ लागला.

विजयाची संधी गेली असे पाहताच कास्त्रोने बंडखोरांना माघार घेण्याचा इशारा दिला. पळावे लागले तर काय करायचे याच्याही योजना तयार होत्या. बंडखोरांनी आपल्या अंगावरचे लष्करी पोषाख काढून टाकले. काहीजण जवळच्याच इस्पितळात लपले. काही सांतिआगोमधल्या आपल्या मित्राकडे पळाले तर काही थेट गावाबाहेर जाऊन जवळच्या पहाडी प्रदेशात घुसले.

हॉस्पिटलमध्ये शिरलेल्यांवर लवकरच पश्चातापाची पाळी आली. बँडेजेस वगैरे बांधून काही बंडखोरांनी रिकाम्या कॉटवर अंग टाकले होते. हल्ला होऊन गेल्यावर थोड्याच वेळात सैनिकांचे तपासणीपथक आले. आत कुणी बंडखोर नाही याची खात्री करून घेऊन ते बाहेर पडणार एवढ्यात हॉस्पिटलमधल्या एका खबऱ्याने चुगली केली आणि सगळ्यांना पकडण्यात आले. वीस बंडखोर आणि दोन्ही नर्ेेसस पकडल्या गेल्या. बंडखोरांना हात बांधून बाहेर नेण्यात येऊ लागले. एका सैनिकाने अगदी सहज डॉ. मुनोझच्या पाठीत गोळी झाडली. डॉ. मुनोझ कोसळला.

सांतिआगो दे कूबा शहरात ठिकठिकाणी जे लोक लपले होते त्यांनाही एकेक करून शोधून काढण्यात आले. हल्ल्यामध्ये ठार झालेल्या एकेका सैनिकाच्या बदल्यात दहा-दहा बंडखोर भयंकर हाल हाल करून मारण्यात आले.

सुमारे चाळीसएक बंडखोर फिदेल कास्त्रोबरोबर सिएर्रा माएस्त्राच्या पहाडीत शिरले होते. डोंगरामधून आणि जंगलामधून लढा चालूच ठेवण्याचा फिदेलचा इरादा होता. पण वीसजणाांनी शरण जायचे ठरविले. उरलेल्यांनी फिदेलबरोबर पहाडीत एक आठवडा अन्न-पाण्याविना काढला. हळूहळू तुकड्या तुकड्यांनी भोवतालच्या सैनिक साखळ्यांमधून थकलेले बंडखोर बाहेर तरी पडू लागले किंवा शरण येऊ लागले. अखेर फिदेलबरोबर तीनच साथीदार उरले.

हे चौघेजण भयानक थकलेल्या अवस्थेत पडलेले असताना सैनिकांच्या एका पथकाने त्यांना गराडा घातला. पथकाचा नेता होता लेफ्टनंट सारिया. ""तुझे नाव सांगू नको, तुझा जीव धोक्यात आहे,'' असे फिदेलला सुचवून सारिया हळूच पुटपुटत राहिला, ""विचार कधीच मारता येत नाहीत.'' खरे पाहाता फिदेल सापडेल तेथे त्याला जागच्या जागी ठार मारण्याचे गुप्त हूकूम होते. पण सारियाने आपण जणू फिदेलला ओळखलेच नाही असे दाखविले. त्याने फिदेलला अटक केली आणि मोनकादोला न नेता त्यांना मुलकी जेलमध्ये नेले. फिदेलचा प्राण वाचला.

परंतु हल्ला अयशस्वी झाला होता. अनेक बंडखोर ठार मारले गेले होते. उरलेले तुरुंगात तरी होते किंवा भूमिगत तरी होते. बातिस्ताच्या सैन्याचा आणि गुप्त पोलिसांचा पाश कूबन लोकांच्या मानेभोवती अधिकच घट्ट आवळला जात होता. सैनिकांच्या निर्घृण अत्याचारांमुळे सर्वसाधारण जनतेची सहानुभूती सहाजिकच बंडखोरांकडेच होती. पण नुसत्या सहानुभूतीचा काय उपयोग ? बंडखोरांचा नेता फिदेलही तुरुंगात होता.

आता त्यांच्यापुढे काय भविष्य होते? तुरुंगवास किंवा मृत्यू.

पण फिदेल कास्त्रो हा हरणारा तरुण नव्हता. "मोनकादो'चा पराभव त्याने पचवला. एवढेच नव्हे तर या पराभवाचेच प्रचंड भांडवल करून त्यावर आपल्या क्रांतीच्या भावी विजयाची जोमदार मुहूर्तमेढ रोवली. त्यानंतर अवघ्या साडेपाच वर्षांच्या आत फिदेल कास्त्रोने क्रांतिकारकांचा विजयी नेता म्हणून मोनकादो बराकीमध्ये भाषण केले. मोनकादो बराकींना ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झाले होते आणि सव्वीस

जुलै या दिवसाभोवती अनेक काव्ये गुंफली गेली. कास्त्रोने आपल्या चळवळीचे नावच सव्वीस जुलै चळवळ असे ठेवले. मोनकादो हा तर क्रांतिकारकांचा परवलीचा शब्द झाला. त्या नावात एक वेगळीच जादू होती. सामर्थ्य निर्माण झाले होते. दक्षिण अमेरिकेतील जुलुमी,दहशतवादी राजवटीला उलथून पाडण्याची स्वप्ने पाहाणाऱ्या ठिकठिकाणच्या क्रांतिकारकांना मोनकादो हे एक नवे श्रद्धास्थान, प्रतीक निर्माण झाले होते.

"मोनकादो'चे महत्त्वच तसे आहे. फिदेलच्या हाती अपयश आले होते खरे; पण या पराभवातच त्याने आपल्या भावी विजयाची बीजे पेरली. मोनकादोने कूबाला एक जबरदस्त धक्का दिला. जुलुमी राजवटीबद्दल अगोदरच जनतेमध्ये असलेला सुप्त तिरस्कार जागा होऊन त्याला प्रखर स्वरूप प्राप्त झाले. वेगवेगळे विरोधी पक्ष आणि क्रांतीची प्रेरणा असलेले तरुण या धक्क्याने जागे होऊन खडबडून उठले आणि क्रांतिकार्याला, गनिमी युद्धाला कूबाची भूमी सुपीक झाली.

कास्त्रोने हे दाखवून दिले, की क्रांतिकारकांमध्ये जिद्द आणि हिम्मत असली तर ते जुलुमी राजवटीचा पाडाव करू शकतात. ज्यांची क्रांतीवर श्रद्धा आहे त्यांनी योग्य परिस्थिती निर्माण होण्याची वाट बघत स्वस्थ बसण्याची गरज नाही. जुलुमी राजवटीखालची जनता ही वाळलेल्या गवताप्रमाणे क्षीण आणि सत्ताहीन असते. पण क्रांतिकारकाची एक पेटलेली काडी त्या जनतेला पेटवून उठवते. हे कूबाने दाखवून दिले.

कूबा हा देश मूळचा इंडियन लोकांचा! युरोपीय त्यांना रेड इंडियन असे म्हणतात.

कोलंबसला अमेरिकेचा शोध लागला. १४९२ साली आपल्या पहिल्या प्रवासात तो या बेटावर उतरला त्या वेळचे त्याचे इतिहासप्रसिद्ध उद्गार – ""काय सुंदर भूमी! डोळ्यांचे पारणे फिटते हे सौंदर्य पाहून!''

साडेचारशे वर्षांपूर्वी या सुंदर भूमीवर सुमारे दोन लाख इंडियन्सची वस्ती होती.

स्पॅनियर्डांनी  इंडियन जनतेला छळले, लुटले! मागणी एकच ""सोने काढा! सोने टाका!'' दरवर्षी स्पॅनिश लुटारू येत. इंडियन्सचे हाल हाल करीत ! त्यांचे वाडे, त्यांची देवळे लुटत! घरेदारे जाळत ! बायका–मुलांसह सर्वांच्या कत्तली करीत आणि सोन्या–चांदीच्या राशी गलबतावर चढवून स्वदेशी प्रयाण करीत! ५० वर्षांच्या भीषण संहारानंतर कूबात तीन हजारही इंडियन शिल्लक राहिले नाहीत.

सोने–चांदी लुटून झाल्यावर स्पॅनियर्डांची नजर त्यांच्या भूमीकडे वळली. अमेरिकेची ही भूमी सुप्त संपत्तीने अत्यंत समृद्ध आहे. शेती व गुरे–चराईला ती अत्यंत अनुकूल आहे; आणि शिवाय या भूमीत लोखंड, तांबे, टिन्, सोने, चांदी, शिसे, मँगेनीत, नैट्रेट्स वगैरे अनेक खनिजांचे प्रचंड साठे आहेत. ही सारी सुप्त संपत्ती साडेचारशे वर्षे स्पॅनिश लुटारू लुटून नेत होते.

कूबा ही स्पॅनियर्डांची अमेरिकेतील प्रारंभीची वसाहत. हे बेट स्पॅनियर्डांनी इ.स. १५११ साली

आपल्या ताब्यात घेतले. स्पॅनियर्डांच्या जोखडाखालून या बेटाची मुक्तता अमेरिका खंडातील सर्व देशांच्या मागून म्हणजे इ.स. १८९९ मध्ये झाली. म्हणजे या देशावर जवळजवळ चारशे वर्षे स्पॅनिश सत्ता होती.

सुरुवातीला स्पॅनिश मळेवाल्यांनी  इंडियन्सनाच गुलाम बनविण्याचा प्रयत्न केला. पण तो बहूतेक ठिकाणी अयशस्वी झाला. काही झाले  तरी  इंडियन्स तेथलेच रहिवासी होते. त्यांना तेथील प्रदेशाची खडान् खडा माहिती होती. जंगलात त्यांच्याच जातभाऱ्इंची वस्ती होती. त्यामुळे गुलाम बनविलेले इंडियन्स संधी सापडताच जंगलात पळून जात आणि आपल्या जमातीत मिसळून जात. म्हणून १५१७ मध्ये स्पॅनिश लोकांनी मळ्यावर राबवण्यासाठी आफ्रिकन निग्रो गुलामांची आयात केली. १७६३ साली कूबात ३२००० निग्रो गुलाम होते. त्यांची संख्या १८२७ मध्ये २८७ हजार एवढी वाढली.

हे मळेवाले आणि व्यापारी फक्त निग्रोनाच गुलाम करीत, असे नाही. ते युरोपातील गरीब गोऱ्या शेतकरी आणि कारागिरांनाही वेठबिगार करीत. या काळात युरोपातील सरंजामी प्रथा मोडू लागली होती. हजारो शेतकऱ्यांच्या हातातील जमीन जाऊन ते अन्नाला मोताद झाले होते. कारागिरांचीही दैना उडू लागली होती. या त्यांच्या दैन्यावस्थेचा फायदा घेऊन गोऱ्या श्रीमंत व्यापाऱ्यांनी "करारबद्ध नोकर' पद्धत सुरू केली. भडक जाहिरातबाजी करून ते या गरीब लोकांना अमेरिकेत स्थलांतर करण्यास प्रोत्साहन देत. त्यांच्याजवळ प्रवासखर्चाचाही पैसा नसे; म्हणून त्यांच्याकडून सात-सात वर्षांच्या नोकरीचे बंधपत्र (Bond) घेऊन अमेरिकेत त्यांची सरळसरळ विक्री होई. या नोकरांची परिस्थिती जवळजवळ गुलामासारखीच असे. गुलामांप्रमाणे त्यांचेही जाहीर लिलाव होत. आणि त्यांच्याकडूनही चाबकांच्या  फटकाऱ्यांखाली सक्तीने काम घेतले जाई.

गुलामांचे जीवन गुराढोरांसारखे निर्घृण व जुलुम-जबरदस्तीचे असे. त्यांच्या जीवावर ऐदी मळेवाले ऐषारामात लोळत. दारू पिणे, कोंबड्यांच्या झुंजी लावणे, जुगार खेळणे  यात त्यांचा वेळ जाई. सारी सत्ता त्यांच्याच हातात एकवटलेली होती.

**गुलामांचे उठाव**  : या महाभयंभर जीवनाला कंटाळून निग्रो गुलाम वारंवार बंड करत. कित्येकजण जंगलात पळून जात. १५३३, १५३७ आणि १५४८ मध्ये गुलामांचे उठाव झाले. इ. स. १८१२ मध्ये खोसे अफान्ते या निग्रोच्या नेतृत्वाखाली मोठा उठाव झाला. या उठावात निग्रो गुलाम, इंडियन भूदास आणि गोरे "नोकर' एकजुटीने लढले. वसाहतीतील जनतेने परकीय अंमलाविरुद्ध पुढे जे स्वातंत्र्य संग्राम लढवले, त्यात त्यांनी ह्याच निग्रो गुलामांच्या उठावातून स्फूर्ती घेतली.

इ. स. १८४९ साली कूबाचा नार्सिसो लोपेथ्स याने बंडाचा झेंडा उभारला. हे केवळ गुलामांचे बंड नव्हते. कूबा हे आता एक राष्ट्र बनले होते. निग्रो, गोरे व मिश्र-मेस्तिझो (निग्रो व गोरे विवाहातून जन्मलेली प्रजा) या सर्वांचे मिळून कूबन राष्ट्र बनले होते. आणि आता या सर्व जनतेचा स्पॅनिश अमलाविरुद्ध राष्ट्रीय स्वातंत्र्याचा उठाव सुरू झाला होता;  परंतु हाही उठाव चिरडला गेला. स्पेनच्या

हातातील बहूतेक सगळ्या वसाहती आता त्यांच्या हातातून गेलेल्या होत्या. त्यामुळे आपली सारी ताकद कूबन जनतेविरुद्ध एकवटणे स्पेनला शक्य झाले आणि या ताकदीपुढे कूबन जनतेची ताकद कमजोर ठरली.

इ.स. १८६८ मध्ये सेस्पेदीच्या नेतृत्वाखाली उठाव झाला. निम्म्या बेटावर ताबा मिळवण्यात क्रांतिकारक यशस्वी झाले व तेथे सेस्पेदीच्या अध्यक्षतेखाली स्वतंत्र प्रजासत्ताक राज्याची घोषणा झाली; परंतु १८७८ साली स्पेनने आपली सत्ता पुन्हा स्थापन केली. स्पॅनिश राज्यकर्त्यांयनी इ.स. १८८६ साली, क्रांतिफौजात दुफळी माजविण्याच्या हेतूने कूबातील गुलामगिरी नष्ट केल्याचे जाहीर केले. परंतु अंतानियो मसीओच्या नेतृत्वाखाली काही राष्ट्रप्रेमी मंडळींनी स्वातंत्र्ययुद्ध पुढे चालूच ठेवले.

आणि इ. स. १८९५ साली पुन: क्रांतियुद्धाचा भडका उडाला. या युद्धाचे नेतृत्व क्रांतिवीर खोसे मार्ती या कवीकडे होते. "कूबा स्वतंत्र तरी होईल किंवा मरण तरी पत्करील' ही त्याची घोषणा कूबाच्या घराघरातून घुमू लागली. क्रांतियुद्धाच्या आरंभीच मे १८९५ मध्ये मार्ती युद्धात मारला गेला आणि शहीद बनला.

हे स्वातंत्र्ययुद्ध अत्यंत निकराने लढविले गेले. १० लक्ष कूबन जनतेचा हा उठाव चिरडून काढण्यासाठी स्पेनची ५ लाख फौज जनरल वेलर यांच्या अधिपत्याखाली कूबन जनतेवर चाल करून गेली. वेलरला क्रांतिफौजेवर नेत्रदीपक विजय मिळवता आले नाहीत; पण त्याने त्याची भरपाई सर्वसामान्य जनतेवर भीषण दडपशाही करून घेतली. एकट्या हावाना या एका प्रांतात ५० हजार कैद्यांचा उपासमार करून बळी घेण्यात आला. कूबन स्वातंत्र्य–फौजांनी डोंगराळ प्रदेशाचा आश्रय घेतला व गनिमी काव्याने युद्ध चालू ठेवले.

"उंबरठ्यागणिक एकेक थडगे उभारावे लागले तरी बेहत्तर! पण काही झाले तरी स्पॅनिश राजवट यापुढे चालू देणार नाही' या निर्धाराने जनता लढली. आणि अखेर तिने स्पॅनिश फौजेला साफ दमविले. स्पॅनिश फौजांचा सपशेल बिमोड होऊन स्वातंत्र्यप्राप्तीचे मधुर फळ शूर कूबन जनतेच्या पदरात पडणार अशी चिन्हे दिसू लागली.

पण – पण तसे व्हावयाचे नव्हते.

स्पेनचा पराभव होत असण्याचा मोका साधून आपले अधिपत्य कूबावर स्थापन करण्यासाठी यू.एस.ए.च्या सत्ताधाऱ्यांनी स्पेनविरुद्ध युद्ध पुकारून कूबाच्या स्वातंत्र्य सैनिकांना मदत करण्याच्या नावाखाली एप्रिल १८९८ मध्ये कूबाच्या भूमीवर स्वत:च्या फौजा घुसविल्या. अमेरिकेच्या या मदतीमुळे कूबन जनतेच्या उत्साहाला भरते आले. अमेरिकेबद्दल सहानुभूतीची प्रचंड लाट उसळली. जुलै १८९८ मध्ये स्पॅनिश आरमाराचा अमेरिकन आरमाराने साफ फडशा उडविला. लवकरच अमेरिकन फौजांनी प्युर्तोरिकोचा ताबा घेतला आणि लढाई संपली. कूबन जनतेला स्वातंत्र्याची

सुखस्वप्ने पडू लागली.

इ. स. १९०१ साली कूबासाठी घटना तयार करण्याचा प्रश्न पुढे आला. आणि त्यावेळी अमेरिकेच्या खऱ्या डावाची चाहूल लागली. यू.एस.ए.च्या काँग्रेसने "प्लाट उपसूचना' संमत केली. या उपसूचनेप्रमाणे कूबाचे सार्वभौमत्व मान्य करण्यात आले. मात्र "यू.एस.ए.' च्या परवानगीशिवाय कूबाच्या सार्वभौम सरकारने कोणत्याही परकीय सत्तेशी संबंध ठेवता कामा नये; वॉशिंग्टनच्या परवानगीशिवाय कूबाच्या भूमीवर कोणत्याही परकीय सत्तेला लष्करी किंवा नाविक तळ स्थापू देता कामा नये; वॉशिंग्टन मान्य करील त्या मर्यादेपेक्षा कूबाने अधिक सरकारी कर्ज काढू नये,' इत्यादी निर्बंध घालण्यात आले. याचा खराखुरा साधा अर्थ इतकाच की कूबा आता स्पेनच्या गुलामीखालून सुटून अमेरिकन (यू.एस.ए.च्या) अंमलाखाली आला.

कूबा आगीतून सुटून फुफाट्यात येऊन पडला. कूबाच्या स्वातंत्र्य सैनिकांचे बलिदान तात्पुरते तरी व्यर्थच ठरले. कूबावर अमेरिकन साम्राज्यवादाचे दाट सावट पडले. कूबन जमीनदारांमार्फत कूबावर अमेरिकी वॉलस्ट्रीटच्या करोडपतीचे अधिराज्य सुरू झाले.

कूबात अमेरिकन साम्राज्यवाद्यांचे आर्थिक साम्राज्य स्थापन झाले, त्यावेळी कूबाची अर्थव्यवस्था कशी होती? जवळजवळ सर्व लागवडीलायक जमीन केवळ ५ टक्के लोकांच्या हाती केंद्रित होती. हे जमीनदार शहरात राहून मजा मारीत. शेतीसुधारणेत त्यांनी काहीच रस नव्हता. कुळांना पिळून ते पैसा उकळीत.

कूबावर अधिसत्ता स्थापन केल्यावर अमेरिकन कंपन्यांनी तेथील जमिनी ताब्यात घ्यायला सुरुवात केली. "अटलांटिक डेल गोल्फस' कंपनीने ५ लाख एकर, "रिओंडो मिल्स' ने ५ लाख एकर, "कूबन अमेरिकन शुगर कंपनी'ने ३.३० लाख एकर आणि "युनायटेड फ्रूट कंपनी'ने २.७ लाख एकर जमीन घशात घातली आणि या जमिनीवर भांडवली पद्धतीने उसाची लागवड सुरू झाली. लवकरच कूबातील ६७ टक्के साखरधंदा अमेरिकन कंपन्यांच्या हाती गेला. ही साखर परदेशाला रवाना करण्यासाठी अमेरिकन कंपन्यांनी कूबामध्ये ४ हजार मैलांची खाजगी रेल्वे बांधली; रस्ते बांधले; बोटींची वाहतूक सुरू केली. टेलिफोन आणि विजेची सुविधा अमेरिकन कंपन्यांमार्फत करण्यात आली.

इ.स. १८९५ ते १९०२ पर्यंत कूबाला मदत देण्याच्या नावाखाली कूबावर अमेरिकन फौजेने सरळ सरळ अधिकार गाजवला. इ.स. १९०२ नंतर कूबन जनतेचा रुद्रावतार पाहून अमेरिकेने आपले हे धोरण बदलले आणि पडद्याआड राहून राज्यकारभार चालविण्याचे म्हणजेच तेथील जमीनदारांमार्फत राज्यकारभार चालविण्याचे धोरण अंमलात आणले. १९०२ साली कूबन जनतेने थॉमस पाल्मा यांना राष्ट्राध्यक्ष पदावर निवडून दिले. हा मनुष्य सचोटीचा होता. परंतु अमेरिकेच्या कारवायांपायी त्याला जनहित फारसे साधता आले नाही. त्यानंतर झालेले सर्व अध्यक्ष पक्के खाबू होते. अमेरिकेने त्यांना सहज विकत घेतले. दुसऱ्या अध्यक्षाने अधिकारपद सोडण्यापूर्वी लाखो डॉलरची माया जमा केली होती.

तिसऱ्याने चार कोटी डॉलर्सची माया जमविली आणि चवथ्याला तर लोक "पैसाचोर'च म्हणत.

१९२४ साली जनतेतील असंतोष शिगेला जाऊन पोचला. कामगारांनी आता आपल्या ट्रेड युनियन्स स्थापन केल्या होत्या. कूबामध्ये कामगारवर्गाचा स्वतंत्र राजकीय पक्षही – कम्युनिस्ट पक्षही – स्थापन झाला होता. सार्वत्रिक उठावाची लक्षणे स्पष्टपणे दिसू लागली होती व या उठावाचे नेतृत्व गेरार्दो मचादो याने घेतले. त्याने जनतेला भरमसाट आश्वासने देऊन जनतेची मने आपल्या बाजूला वळवून घेतली. आणि राज्यकारभार हाती येताच जनतेवर दडपशाही सुरू केली. सर्व जमीनदारांप्रमाणे याच्याही धोरणाचे एकच सूत्र होते. अमेरिकन भांडवलाला हव्या असतील त्या सवलती देणे, जमीनदारी व्यवस्था टिकवून धरणे आणि अमेरिकन शस्त्रास्त्रांच्या जोरावर जनतेचे उठाव चिरडून टाकणे.

१९३३ साली मचादोच्या जुलमी कारभाराला कंटाळून राष्ट्रव्यापी संप झाला. निव्वळ कामगारच नव्हेत तर विद्यार्थी आणि बुद्धिजीवी लोकांनीही त्यात भाग घेतला. मचादोचे जनरोषापासून संरक्षण करणे अमेरिकन सत्ताधाऱ्यांनाही कठीण होऊ लागले. मचादो लाखो डॉलर्सची संपत्ती घेऊन अमेरिकेला पळाला आणि फुलखेनसीओ बातिस्ताने कट करून राज्यसूत्रे आपल्या हाती घेतली. लोकांचा नूर पाहून सुरुवातीला त्याने जनतेला पुष्कळशा सवलती दिल्या. कामाचा दिवस ८ तासांचा केला, ट्रेड युनियन्सना कायद्याने मान्यता दिली; इतकेच काय दोन कम्युनिस्टांनाही मंत्रिमंडळावर घेतले. पण एका वर्षाच्या आतच त्याने आपले खरे दात दाखवायला सुुरुवात केली. १९३४ ते १९४० च्या काळात त्याने एका पाठोपाठ एक अशा आपल्या सात पित्त्यांना अध्यक्ष बनवले. आणि अखेर १९४० मध्ये तो स्वत:च अध्यक्ष बनला. इ.स. १९४४ साली बातिस्ता १० कोटी डॉलर्सची संपत्ती घेऊन अमेरिकेला पळाला. त्या जागी सान मार्तीन आला. पण तोही अखेर अमेरिकेच्या सुवर्णपाशात अडकला. लाच खाऊन १८ कोटी डॉलर्सची माया जमविल्याचा आरोप १९४८ साली त्याच्यावर ठेवण्यात आला. त्याची जागा सोकार्रास या जमीनदाराने घेतली.

१९५२ साली पुन: उठाव झाला. सारी कूबन जनता जमीनदारशाहीचा अंत करण्याच्या निर्धाराने उठली. बातिस्ताने हा सारा रागरंग पाहून धूर्तपणाने कट करून सारी सूत्रे पुन्हा एकदा आपल्या हाती घेतली. अर्थात यावेळी जनतेचा त्याला यत्किंचितही पाठिंबा नव्हता. त्याने आता सरळसरळ दडपशाही सुरू केली. कूबाची लोकसभा बरखास्त केली. वृत्तपत्रांची मुस्कटदाबी केली; हावानाची युनिव्हर्सिटी – विद्यार्थीचळवळीचे केंद्रस्थान बनली होती; ती बंद केली. आणि गुंड जमा करून जनतेवर अनन्वित अत्याचार केले.

अर्थात बातिस्ता हा निव्वळ बाहूले होता. दडपशाही करणारी खरी सत्ता अमेरिकन साम्राज्यशाही होती. तीच पडद्याआड राहून बातिस्ताला पुढे करून, जनतेवर दडपशाही करीत होती. बातिस्ताच्या फौजेचा खर्च तीच चालवीत होती. परराष्ट्रापासून कूबाचे संरक्षण करण्याच्या नावाखाली तीच बातिस्ताला शस्त्रे पुरवीत होती. बातिस्ताच्या हूकुमशाहीविरुद्ध बंडाचा झेंडा उभारून २६ जुलै १९५३ रोजी फिदेल

कास्त्रो व त्याच्या तरुण सहकाऱ्यांनी मोनकादो बराकींवर हल्ला चढवला. तो अपयशी ठराला. फिदेला पकडण्यात आले. त्याला मारून टाकले तर जनतेच्या प्रचंड रोषाला सामोरे जावे लागेल, हे ओळखून सरकारने खटल्याचे नाटक पार पाडले. त्या खटल्यामध्ये फिदेल क्रांतिकारकांची बाजू मांडताना म्हणाला, ""सावधान! ही फक्त सुरुवात आहे.''

एका समग्र  क्रांतिलढ्याची २६ जुलैचा उठाव ही फक्त सुरुवात होती. त्यानंतरच्या सहा वर्षांत अनेक कष्टांना सामोरे जात, अनेक आव्हाने झेलत, प्रसंगी उपाशी राहून, देशाबाहेर राहून हा लढा फिदेल आणि त्याच्या साथीदारांनी पूर्णत्वाला नेला. कूबाने नुसतेच स्वातंत्र्य मिळवले नाही, तर हालअपेष्टांपासून, शोषणापासून मुक्ती देणारी आणि सर्वसामान्यांची सत्ता राबवणारी क्रांती घडवून आणली. स्वत: फिदेल, त्याचा भाऊ – राऊल, अज~तिनातून आलेला चे गेवारा आणि अशा अनेक क्रांतिवीरांनी एकत्र येऊन ही क्रांती घडवली.

ही क्रांती घडवणारे हे क्रांतीवीर कोण होते? ते कसे घडले होते?

""माझे भाग्य की मी जमीनदाराचा मुलगा होतो, नातू नव्हे. त्यामुळे मी शेतावरच वाढलो. लहानपणी माझे दोस्त होते शेतमजुरांची आणि कुळांची मुले – भांडवली व्यवस्थेचे बळी! मी जर जमीनदाराचा नातू असतो तर मात्र मी शहरात श्रीमंतांच्या मुलांबरोबर वाढलो असतो, उच्चभ्रूंच्या आलीशान वस्तीत राहिलो असतो आणि मला "समजावादी" किंवा "माक्र्सियन कम्युनिझम' विचारांचे वारेही लागले नसते. कोणी काही योद्धा, कवी किंवा क्रांतिकारी म्हणून जन्म घेत नसतो.  मिळालेली संधी किंवा परिस्थितीच माणसाला घडवत असते.'' – फिदेल कास्त्रो. फिदेलचे बालसवंगडी पिचणारी गरिबी आणि अन्यायाखाली नागवले जात होते. त्यांना पिळून ऐषाराम व मग्रुरीत श्रीमंत जमीनदार मनमानी सत्ता गाजवत होते हे वास्तव फिदेलला बंडखोर बनवते. फिदेलचे चौफेर वाचन, सखोल विचार, अनुभव व सामाजिक आस्था याची जोड मिळून तो क्रांतिकारी बनतो.

फिदेलचे वडील आँखेल कास्त्रो हे स्पॅनिश. वयाच्या १६ व्या वर्षी सक्तीने सैन्यभरती होऊन १८९६ साली स्पॅनिश सेनेबरोबर कूबामधील उठाव मोडून काढण्यासाठी कूबात आले व युद्ध संपल्यावर त्यांना स्पेनला परत नेण्यात आले. पुढे ते शेतावर मजुरी करण्याकरता कूबात परत आले आणि हिकमतीने आपले बस्तान बसवून ओरियेन्ते प्रांतात मोठे ऊसमळेदार बनले. त्यांच्या पहिल्या बायकोच्या मृत्यूनंतर त्यांच्याकडे घरकाम करणाऱ्या लीना रूथ गोंथालेस हिच्याशी त्यांनी लग्न केले. लीनाचे पूर्वज स्पॅनिशच होते. फिदेलचा जन्म १३ ऑगस्ट १९२६ रोजी ओरियेन्ते प्रांतात बिरान येथे झाला. फिदेलला सख्खे दोन भाऊ – रामोन व राऊल आणि दोन बहिणी – आँखेला व खाऊना. राऊल प्रारंभीपासूनच फिदेलसमवेत क्रांतिकारी लढ्यात उतरला. मोठा भाऊ रामोनने वडिलांनंतर शेती उद्योगाची जबाबदारी घेतली. त्याचबरोबर तो फिदेलला लष्करी कारवाईच्या तयारीसाठी सिएर्रा माएस्त्रामध्ये शस्त्रास्त्रे,

दारूगोळा व अन्य मदत पोचवी. लष्करी वाहनांसाठी पेट्रोलचा मोठा तुटवडा पडे. रामोनचे इंजीनिअरिंग शिक्षण झाले असल्याने त्याने स्वत: लक्ष घालून उसापासून केलेले अल्कोहोल व पेट्रोल+ केरोसीन किंवा अल्कोहोलमध्ये थोडे एरंडेल हे मिश्रण इंधन बनवले व ते मोटारीत कसे वापरावे याबाबत वाहन–चालकांना मार्गदर्शन दिले.

आँखेल कास्त्रोचे शिक्षण झालेले नव्हते व मुलांनाही शिक्षण देण्याची त्यांची इच्छा नव्हती. परंतु फिदेलने शाळेत जाण्याचा जोरदार आग्रह धरला तेव्हा सांतिआगो दे कूबाला मिशनरी शाळेत त्याला दाखल केले. माध्यमिक शिक्षण पुरे झाल्यावर आईपाशी आग्रह धरून उच्च शालेय शिक्षण त्याने हावाना येथील एका प्रतिष्ठित शाळेत पुरे केले. तो शाळेत उत्तम विद्यार्थी, वाक्पटू आणि क्रीडापटू व ॲथलिट म्हणून चमकला. फावल्या वेळेतला फिदेलचा आवडता छंद म्हणजे डोंगरदऱ्यांतून मनसोक्त भटकंती. या भटकंतीतून त्याला ओरियेन्ते प्रांत, पिनार देल रिओ प्रांताचा भूगोल आणि जनजीवनाचा चांगला परिचय झाला. १९४५ साली कायद्याची पदवी घेण्यासाठी त्याने हावाना विद्यापीठात प्रवेश घेतला. भरभक्कम ताकदीचा, बंडखोर आणि बेडर पण तेवढाच संवेदनाशील असा फिदेल विद्यापीठात गेल्यावर लवकरच त्याच्याभोवती तरुणांचा मोठा गट तयार झाला. विद्यापीठामध्ये विद्यार्थी चळवळीचा तो नेता होता. कम्युनिस्टांबरोबर कटू वादंगातून त्याचे वितुष्टही आले होते. बंडखोरी व चळवळीचे धडेही त्यानी विद्यापीठ काळात घेतले.

१९४७ साली कूबाच्या नजिकच्या डोमीनिकन रिपब्लिकनमध्ये हूकुमशहा त्र्युखिल्लोविरुद्धच्या चढाईत कास्त्रो सामील झाला होता. डोमीनिकन रिपब्लिकनमधल्या जनतेच्या पुढाकाराने व जनरल रोद्रीगेथ्स यांच्या आर्थिक मदतीने वेनेझुऐला, कूबा व इतर कॅरीबियन देशातील क्रांतिवीरांच्या मदतीने त्र्युखिल्लोला पदच्युत करण्यासाठी कूबातून हल्ला करण्याचा बेत आखण्यात आला होता. त्यासाठीच्या प्रशिक्षणात फिदेल सामील झाला. ऑगस्ट १९४७ मध्ये बोटीतून हल्ल्यासाठी ३००० क्रांतिवीर निघाले. परंतु कूबाच्या अध्यक्षांनी त्यांना अडवण्यासाठी आरमारी कारवाई केल्याने अटक होऊ नये म्हणून फिदेलने सबमशीनगनसह समुद्रात उडी घेऊन जिद्दीने किनारा गाठला.

१९४८ साली कोलंबियाची राजधानी बोगोता येथे ९ एप्रिल रोजी पॅन अमेरिकन परिषद होती. ती परिषद उधळण्यासाठी विविध गट बोगोतात जमले होते. त्याच दिवशी साम्राज्यशाहीविरोधी विद्यार्थ्यांनी तेथे परिषद आयोजित केली होती. परिषदेच्या संघटकांमध्ये फिदेल होता. त्याने वेनेझुएला व पनामा येथे जाऊन तेथील विद्यार्थीगटांना भेटून चर्चा केल्या व परिषदेचा जाहिरनामा तयार करण्यात आला. ९ एप्रिलला सुधारणावादी कोलंबियन नेता गायतान यांची मुलाखत घेण्यासाठी फिदेल व विद्यार्थी गट थांबले असताना गायतान यांचा रस्त्यातच खून झाला व मोठ्या दंगली पेटल्या. जाळपोळ व लुटालुटीला ऊत आला. ते थोपवून बंडखोरीला सुसंघटित रूप देण्याचा फिदेलचा प्रयत्न होता. पण त्याला प्रतिसाद मिळाला नाही. सुधारणावाद्यांनी अध्यक्षांशी समझौता केला तेव्हा अध्यक्षांनी

कोलंबियात उठाव घडवून आणणे व पॅन अमेरिकन परिषद उधळणे याबाबत कूबाच्या फिदेल आदी विद्याथ्र्यांयवर कम्युनिस्ट म्हणून आरोप करून आग पाखडली. पोलिसांचा ससेमिरा सुरू झाला तेव्हा फिदेल व त्याचे सहकारी कूबन वकिलातीच्या मदतीने मालवाहू विमानातून कूबाला परतले. या प्रकरणाचा फायदा घेऊन कास्त्रोने बोगोतात दंगल घडवली, पाद्र्यांचे खून केले, तो कम्युनिस्ट आहे अशी त्याची पद्धतशीर निंदा-नालस्ती सुरू झाली. अमेरिकी शासनाने कम्युनिस्ट एवढे बदनाम केले होते व जनमानसातही कम्युनिस्टांबाबत पूर्वग्रहदूषित होते की कोणाही क्रांतिकारकाची निंदानालस्ती करण्यासाठी त्याच्यावर "कम्युनिस्ट'> हा आरोप केला जाई.

१९४८ साली विद्यापीठातील तत्वज्ञानाची विद्यार्थिनी मिर्था बालार्तच्या प्रेमात पडून १२ ऑक्टोबर १९४९ ला ते विवाहबद्ध झाले. मिर्थाच्या आईवडिलांचा विवाहाला पूर्ण विरोध, कारण तिचे वडील व भाऊ सरकारी नोकरीत बड्या हूद्द्यावर होते. आणि फिदेल होता क्रांतिकारक. १ सप्टेंबर "५० ला मुलाचा जन्म झाला. फिदेल घरी कधी असेल तेव्हा मुलाबरोबर रमत असे. १९५३ साली मोनकादो बराकीवरील हल्ल्यानंतर कास्त्रो तुरुंगात असताना मिर्था भावाकडून पैसे घेऊ लागली. त्यामुळे त्यांच्यातील मतभिन्नता व ताणतणाव वाढून फिदेल मेक्सिकोत गेल्यावर १९५५ साली मिर्थाने घटस्फोट घेतला.

विद्यापीठ काळापासूनच एक उत्कृष्ट वक्ता म्हणून फिदेल मान्यता पावला होता. उपहास, तिरस्कार, आवेश, कारुण्य, विनोद, विद्रोह याचे बेमालूम मिश्रण त्याच्या भाषणात असे. त्याच्या चुंबकीय व्यक्तिमत्वाबरोबरच त्याच्या वक्तृत्वाने भारावून अनेक विद्यार्थी त्याचे भक्कम साथी बनले. १९५० साली कायद्याची पदवी परीक्षा उत्तीर्ण होऊन त्याने हावानात वकिली सुरू केली. तो पेसे न घेता राजकीय खटल्याचे काम वा गरिबांना वकिली मदत करी. त्याचबरोबर सनदशीरपद्धतीने राजकीय चळवळ उभारण्यासाठी लोकशाही समाजवादी विचारसरणीचा कूबन जनता पक्ष- ओर्तोदोस्तो, या पक्षातील जहाल गटात फिदेल सामील होऊन सक्रीय राजकारणात उतरला. १० मार्च १९५२ रोजी राष्ट्राध्यक्ष प्रिओना पदच्युत करून बातिस्ताने कूबावर लष्करी हूकुमत जारी केली. लष्करी हूकुमशाहीविरुद्ध कूबामध्ये संतापाची लाट उसळली. प्रिओच्या पाठीशी जनता उभी राहिली; पण प्रिओने साथ दिली नाही. बातिस्ताने बेसदनशीरपणे सत्ता हातात घेतल्याबद्दल कास्त्रोने न्यायालयाकडे धाव घेतली. घटनेच्या विविध कलमांचा आधार घेऊन बेकायदेशीरता निर्विवाद सिद्ध केली. तेव्हा न्यायालयाने "क्रांती हे कायद्याचे उगमस्थान' अशी भूमिका घेऊन बातिस्ताची कृती बेकायदेशीर नाही असा निकाल दिला. अशा रीतीने कायदेशीर मार्ग बंद झाल्याने फिदेल व त्याचे सहकारी यांच्यापुढे आता एकच मार्ग उरला होता, सशस्त्र क्रांती!

फिदेलला लहानपणापासूनच वाचनाचे वेड. मिशनरी शाळेत असल्याने बायबल कोळून प्यालेला. माध्यमिक शाळेत स्पॅनिश साहित्य, कूबाचा इतिहास व स्वातंत्र्य संग्राम, बोलीवार, मार्ती आदी स्वातंत्र्य

लढ्यातील नेत्यांची स्फूर्तीदायी भाषणे, संघर्ष इ. वाचनाने विचारांना गती मिळाली. विद्यापीठामध्ये अर्थशास्त्राच्या अभ्यासातून भांडवलशाहीच्या अनर्थशास्त्राचे विदारक वास्तव स्पष्ट होऊन फिदेल मनोकल्पित (Utopian) समाजवादी बनला. फ्रेंच क्रांती, मेक्सिकन क्रांती, रशियन–चिनी क्रांती यांचा इतिहास आणि मार्क्स, एंगल्स व लेनिन यांच्या विचारातून त्याच्या समाजवादी विचारांना निश्चित दिशा मिळाली.

फिदेल म्हणजे मूर्तिमंत चळवळ. विद्यार्थी जीवनापासूनच जुलूमजबरदस्तीविरुद्ध, अन्यायाविरुद्ध, वंशभेदाविरुद्ध झगड्यात अग्रभागी. कायम लोकांसमवेत, बंडखोरांबरोबर, सैनिकांसमवेत त्यांच्यासारखाच राहिला आणि क्रांतीनंतर राष्ट्राध्यक्ष बनल्यावरही लोकांशी भाषणातून सतत संवाद साधत, शेतात, कारखान्यात, शाळेत फिरून, लोकांत मिसळून, लोकांतलाच एक राहिला. १० मार्च १९५२ पासून क्रांतिकारकांचा संघटक – पूर्णवेळ क्रांतिकारक म्हणून दिवसाचे १७–१८ तास क्रांतीसाठी झटत राहिला.

कास्त्रो जगन्मित्र (Internationalist). आयुष्यभर न्याय्य समाजासाठी, मानवी समाजासाठी, समाजातल्या प्रत्येकाने ताठ मानेने चांगले जीवन जगावे यासाठी नवा माणूस निर्माण करण्यासाठी झगडले आणि हा झगडा आजही चालू आहे. कास्त्रो म्हणतात त्याप्रमाणे एका देशात फार तर समाजवादासमीपची समाजव्यवस्था – किमान गरजा पुरवणे येथपर्यंतच प्रगती करता येईल. परंतु जोवर जगभर श्रीमंती व दारिद्र्य, मग्रुरी व अन्याय चालू आहे तोवर त्या झगडणाऱ्या जनतेला मदत करणे ही कूबन जनतेची जबाबदारी आहे. त्यामुळे केवळ कूबामध्ये समृद्धी गाठणे शक्य नाही. आणि म्हणूनच कूबन क्रांतिकारी लॅटिन अमेरिकी जनतेच्या पाठीशी असतात. डॉक्टर व शिक्षक यांची पथके खास मदतीसाठी गरज पडेल तेथे पाठवली जातात. विकसनशील देशातील जनतेने साम्राज्यशाहीविरुद्ध खंबीरपणे उभे राहावे म्हणून कास्त्रो सतत झटत असतात.

अर्नेस्तोे चे गेवाराचा जन्म १९२८ साली जून १४ रोजी अज~तिनामधील रोझारियो या शहरात झाला. त्याचे कुटुंब मध्यमवर्गीय. वडील इंजिनिअर, डाव्या विचारांचे. अर्नेस्तोे हा सगळ्यात मोठा मुलगा. वयाच्या दुसऱ्या वर्षी त्याला दम्याचा झटका आला. या व्याधीपासून तो पूर्णपणे कधीच मुक्त झाला नाही. पण दम्यामुळे आपण कुठल्याही क्षेत्रात मागे राहाता कामा नये अशी अर्नेस्तोेची जिद्द होती आणि ती त्याने खरी करून दाखविली. रग्बीसारख्या कठीण आणि मारामारीच्या खेळातही तो सर्वांपुढे असे.

सुरुवातीला गेवारा कुटुंबाची परिस्थिती सुखवस्तू होती. पण पुढे काळ बदलला. त्याच्या आईला स्वत:चे मोठे शेत विकावे लागले आणि अर्नेस्तोला शिक्षण पूर्ण करण्यासाठी एक लहानशी नोकरी पत्करावी लागली. हायस्कूल शिक्षण पूर्ण झाल्यावर अर्नेस्तोने आपले नाव वैद्यकीय शाळेत दाखल केले.

अर्नेस्तोचे़ वडील खूप वाचणाऱ्यांपैकी होते. घरी मोठे वाचनालयच होते. मुलानाही सर्व वाचण्यास मुक्त मुभा होती. त्यामुळे जॅक लंडनपासून फ्रॉईडपर्यंत सर्व तऱ्हेचे साहित्य अर्नेस्तोने वयाच्या चौदाव्या वर्षापर्यंत वाचून काढले होते. शाळेत असल्यापासूनच अर्नेस्तोला पायी $वा सायकलवरून प्रवास करण्याची आवड$लागली. आपल्या मित्रांबरोबर तो दूर दूरच्या सहलींना पायी जात असे. अशा तऱ्हेने सर्व लॅटिन अमेरिका त्याने पायाखाली घातली. लॅटिन अमेरिकन जनतेची दरिद्री परिस्थितीही त्याने जवळून पाहिली.

गेवारा आणि त्याचा मित्र अल्बर्तो ग्रॅनादो हे दोघे डिसेंबर १९५१ मध्ये लॅटिन अमेरिकेच्या एका लांब सफरीवर मोटारसायकलवरून निघाले. ते चिलेपर्यंत पोचले नाहीत तोच त्यांची मोटारसायकल एवढी नादुरुस्त झाली,की ती तशीच टाकून देऊन ते दोघे पायीच पुढे निघाले. जवळ पैसे नव्हते. म्हणून ट्रक ड्रायव्हर, हमाल, खलाशी, भांडीघाशे, डॉक्टर अशा विविध भूमिका बजावीत, पैसे कमवीत ते प्रवास करीत राहिले. ठिकठिकाणच्या लोकांची दरिद्री अवस्था आणि शहरांमधून पाण्यासारखा वाहणारा पैसा यामुळे व्यथित होत राहिले आणि गेवाराच्या मनात उत्तर अमेरिकेच्या साम्राज्यवादी पिळवणूकशाहीची चीड घर करू लागली.

दक्षिण अमेरिकेतील जंगले, नद्या, पर्वतमय प्रदेश तुडवीत या दोघांनी ॲमेझॉन नदीच्या खोऱ्यातील सान पाब्लो येथील एका महारोग्यांच्या वसाहतीत काही महिने काढले. डॉक्टर म्हणून काम केले, रूग्णांची सेवा केली. त्यांच्याबरोबर फिरले. रोग्यांचे त्यांच्यावर एवढे प्रेम बसले, की त्यांना ती वसाहत सोडवेना. अखेर त्यांचा प्रेमाचा निरोप घेऊन त्यांनीच बांधून दिलेल्या एका तराफ्यातून त्यांनी ॲमेझॉन नदी पार केली. अधिकृत परवाने नव्हते म्हणून कोलंबियात त्यांना अटक झाली. सुटका झाल्यावर एके ठिकाणी त्यांनी फुटबॉल शिक्षक म्हणून काम केले. तेथून ते वेनेझुएलामध्ये गेले. ग्रॅनादोने त्याच देशात एका महारोगी वसाहतीत मुक्काम ठोकायचे ठरविले. तेथून परत आल्यावर अर्नेस्तोने जोरदार अभ्यासाला सुरुवात केली. पाच वर्षात जे विषय करायचे अशा १२ विषयांच्या परिक्षेला तो एकाच वर्षाच्या अभ्यासानंतर बसला आणि मार्च १९५३ मध्ये डॉक्टरीची परीक्षा उत्तीर्ण झाला.

चे याने लिहिले आहे, ""मी वैद्यकीय शिक्षण घ्यायला सुरुवात केली तेव्हा क्रांतिकारक नव्हतो. खूप मोठा संशोधक व्हावे, मानवजातीच्या कल्याणासाठी झटावे असे माझे स्वप्न होते. पणे हे सारे माझ्या स्वत:पुरते, वैयक्तिक यशाचे स्वप्न होते. परंतु कशी कोण जाणे, मला फिरण्याची/प्रवासाची गोडी लागली. सर्व अमेरिका (दक्षिण) मी पालथी घातली. दारिद्र्य, भूक, रोगराई यांनी लॅटिन अमेरिकन जनता किती पिडलेली आहे, हे मी प्रत्यक्ष पाहिले. औषधाला पैसे नाहीत म्हणून कायम आजारीच असणाऱ्या मुलांचे गरीब आई–बाप पाहिले. दारिद्र्य, हालअपेष्टा आणि भुकेमुळे पशुवत झालेली माणसे पाहिली. पोटच्या पोरांचे मरण असहायपणे स्वीकारणारा हताश बाप पाहिला आणि मनात पक्के ठसले – मोठा संशोधक होण्याइतकेच, वैद्यकशास्त्रात मोठे योगदान देण्याइतकेच, किंबहूना त्यापेक्षा जास्तच

महत्त्वाचे काम आहे या लोकांच्या मदतीला धावून जाण्याचे.''

ग्रॅनादोला भेटायला अर्नेस्तोने पुन्हा वेनेझुएलामध्ये जायचे ठरवले. वाटेत इक्वेदोरमध्ये गयाकिल येथे तो पोचला तेव्हा त्याची अज~तिनामधून पळून आलेला एक वकील रिकार्दो रोजो याची गाठ पडली. रोजो हा क्रांतिकारक होता आणि त्यावेळी तो ग्वातेमाला या देशात क्रांतीची बीजे पेरण्यात मग्न होता. जेव्हा आपण वेनेझुएलामध्ये जात असल्याचे अर्नेस्तोने त्यास सांगितले तेव्हा रोजो म्हणाला, ""पण अर्नेस्तो, तिकडे जाऊन तू काय करणार? पैसे कमाविण्यासाठी तो देश ठीक आहे. माझ्याबरोबर ग्वातेमालात चल. तिथं खरीखुरी क्रांती चालू आहे.''

त्यावेळी ग्वातेमालामध्ये लॅटिन अमेरिकेतील एकमेव लोकशाही क्रांतिकारी$ राजवट होती. पण तेथेही अमेरिकन भांडवलदारांचे आक्रमण होतेच. अमेरिकन युनायटेड फ्रूट कंपनी ग्वातेमालातदेखील आपले पाय पसरवीत होती. फेब्रुवारी १९५३ मध्ये ग्वातेमाला सरकारने या कंपनीची सव्वादोन लाख एकर एवढी पडून असलेली जमीन ताब्यात घेतली तेव्हा अमेरिकेचे पित्त खवळले. त्यावेळचे ग्वातेमाला सरकार डाव्या विचारसरणीचे होते. त्यामुळे आधीच ते अमेरिकेच्या डोळ्यात सलत होते. युनायटेड फ्रूट कंपनीची जमीन जप्त होताच अमेरिकेने आपले लष्करी सामथ्र्य वापरून सरकारला गुडघ्यावर आणले.

ही खरी लढा देण्याची वेळ होती. चेने काही तरुण जमवून बंडखोर गट बनविण्याचे प्रयत्न केले, पण त्यात त्याला यश आले नाही. अमेरिकन विमानांचे बॉंबिंग सुरू झाले तेव्हा ब्लॅक आऊटच्या काळात चेने रक्षकाची जबाबदारी पत्करली. त्याला आघाडीवर जायचे होते. पण ते जमले नाही. अखेर अमेरिकेने आपला काबू ग्वातेमालावर पूर्णपणे बसविला. तेव्हा चे याला तेथून काढता पाय घ्यावा लागला.

ग्वातेमालाच्या या प्रकरणामुळे चेची खात्री पटली, की सशस्त्र क्रांतीशिवाय दुसरा तरणोपाय नाही. आणि साम्राज्यवादाविरुद्ध विजय मिळवायचा असेल तर पहिले पाऊल सशस्त्र क्रांतिकारकांनीच टाकले पाहिजे. परिस्थितीत योग्य तो बदल होण्याची वाट पाहात बसण्यात काहीच अर्थ नाही. या दरम्यान चेने माक्र्स, लेनिन आणि इतर माक्र्सवादी> विचारवंतांचे वाङ्मय वाचून काढले होते. आणि त्याच्या विचारांना शिस्तबद्ध बैठक प्राप्त झाली होती.

चे लिहितो, "ग्वातेमालात असताना क्रांतिकारक डॉक्टरची कर्तव्ये काय याविषयी टिपणे काढून विचार करू लागलो. परंतु नंतर युनायटेड फ्रुट कंपनीच्या आक्रमणानंतर मला एका मूलभूत गोष्टीची जाणीव झाली. क्रांतिकारी डॉक्टर बनण्यासाठी आधी क्रांती होणे आवश्यक आहे.' ग्वातेमालात जगणे अशक्य झाल्याने चे मेक्सिकोत गेला.

मेक्सिकोमध्येही युनायटेड फ्रूट कंपनीचे जाळे होतेच. कंपनीला धोका उत्पन्न करणारे जे जे म्हणून बंडखोर आढळतील त्यांना गुप्तपणे ठार मारण्याचे सत्र मेक्सिकोतील एफ.बी.आय. एजंटांनी आरंभिले होते. त्यामुळे तेथेही त्याला अत्यंत जपून राहावे लागत होते. मेक्सिको शहरीही क्रांतिकारी तरुणांचे अड्डे होतेच. अशाच एका अड्ड्यात चेची राऊल कास्त्रोशी गाठ पडली. दोघांची मैत्री जमली आणि फिदेल

मेक्सिकोत येताच राऊलने प्रथम त्याची गाठ चेशी घालून दिली.

चे लिहितो, "लॅटिन अमेरिकेत एवढे सर्वदूर भटकल्यावर आणि ग्वातेमालातील अनुभव घेतल्यावर कोठल्याही हूकूमशाहीविरुद्धच्या क्रांतीमध्ये भाग घेणाची माझी एका पायावर तयारी होती. परंतु मी जेव्हा फिदेलला भेटलो तेव्हा त्याने माझ्यावर जबरदस्त प्रभाव पाडला. अशक्य गोष्टीही शक्य करून दाखविण्याचा त्याला आत्मविश्वास होता. आपण करू ते अगदी बरोबर ठरेलच याची त्याला खात्री होती. आपण कूबामध्ये पोचूच याविषयी त्याला  शंका नव्हती. तेथे पोचल्यानंतर आपण लढा उभारू; आणि एकदा लढा उभारल्यावर त्यात नक्की विजयी होऊच, याची त्याला शंभर टक्के खात्री होती. त्याचा आशावाद अतिशय प्रखर आणि संसर्गी होता. त्याची एकदा गाठ पडल्यावर कृतिशील न होणे कठीण होते. आता तक्रार करायला जागा नव्हती. संघटना उभारणे, बळ वाढविणे आणि लढ्याला तयार होणे याशिवाय दुसरा मार्गच नव्हता.'

आग ओकणारी बंदूक सतत जवळ बाळगणारा चे कवी मनाचा अत्यंत संवेदनाक्षम असा तरुण होता. फिदेलच्या पहिल्याच भेटीत तो भारावून त्याने पुढील कविता केली –

उषेच्या जहाल भविष्यवेत्त्या ।  चल, निघू या,
काटेरी, नागमोडी वळणांच्या गुप्त रस्त्याने
तू ज्या हिरव्या भूमीवर प्रेम करतोस तिला मुक्त करण्यास । चल, निघू या,
अनंत अन्याय पुसून काढण्यास । आपल्या मस्तकात फुटतात बंडखोर तारे
मृत्यू वा विजय – शपथ घेऊन निघू या.
आणि जेव्हा पहिल्या गोळीच्या आवाजाने,
झोपेतून दचकून जागे झालेल्या तरुणीप्रमाणे । ती भूमी खडबडून उठेल,
तेव्हा आम्ही तुझ्या साथीला असू । निश्चयाने, हाती बंदुका घेऊन $!

वेगवेगळ्या परिस्थितीतून, देशातून एकत्र आलेले हे फिदेल, चे आणि त्याचे साथीदार. प्रत्येकाचा भूतकाळ वेगवेगळा असला, तरी एकाच भविष्यकाळाचे स्वप्न पाहून ते एकत्र आले. तोच भविष्यकाळ– ज्याचे स्वप्न आधीच्या अनेक कूबन बंडखोरांनी पाहिले होते. तोच भविष्यकाळ ज्याच्यासाठी निग्रो गुलामांच्या बंडांपासून मोनकादो बराकीवरील हल्ल्यापर्यंत लोकांची चळवळ विकसित झाली होती.  तोच भविष्यकाळ ज्यासाठी फिदेल विद्यार्थीदशेत असताना प्रयत्न करत होता आणि चे त्याच्या फिरस्तेपणाच्या अनुभवातून एक क्रांतिकारक म्हणून समृद्ध होत होता. माणसाला माणूस म्हणून जगता येईल अशी व्यवस्था निर्माण करण्याचे स्वप्न, जुलुमजबरदस्ती, दडपशाही, गुलामी, शोषण, दारिद्र्य नाहीसे करणारी व्यवस्था निर्माण करण्याचे स्वप्न, या साऱ्यांनी एकत्र येऊन पाहिले. २६ जुलै १९५३ चा मोनकादो बराकींवरील हल्ला म्हणजे या स्वप्नाच्या दिशेने टाकलेले एक दमदार पाऊल होते. २६ जुलैच्या अपयशातून क्रांतिलढ्याच्या पुढच्या यशाची बिजे पेरली गेली होती.

२६ जुलैच्या उठावातील सर्व क्रांतिकारकांना पकडून त्यांच्यावर खटले भरण्यात आले होते आणि खोटे आरोप शाबीत करून क्रांतिकारकांना नेस्तनाबूत करण्याचा बातिस्ताचा डाव होता.

मोनकादो प्रकरणाचा बंदोबस्त करण्यासाठी बातिस्ताने आपला खास दूत कर्नल शावियानो याला सांतिआगो येथे पाठविले. त्याने सर्व बंडखोर गुन्हेगार असल्याचे जाहीर करून असेही आरोप केले, की ऐन हल्ल्याच्या वेळी कास्त्रोच्या अनुयायांना आपली चूक कळून येऊन ते पळून जाऊ लागले, तेव्हा त्यांच्यावर कास्त्रोने आणि त्याच्या साथीदारांनी गोळ्या झाडल्या. या आरोपांवर अर्थातच कुणाचा विश्वास बसणे शक्य नव्हते.

आरोपींमध्ये १२० तरुण आणि दोन स्त्रिया होत्या. फिदेलला एकट्याला वेगळ्या तुरुंगात ठेवले होते. आणखी काही आरोपी होते. पण त्यांचे चेहरे विद्रुप झाल्याने पोलिसांनी त्यांना खटल्यात आणलेच नाही.

सप्टेंबर २१, १९५३ रोजी खटल्याला प्रारंभ झाला. ज्या रस्त्याने तुरुंगातून कोर्टात आरोपींना नेण्यात येणार होते, त्यावर एक हजार सैनिकांना बंदोबस्तासाठी ठेवले होते. सांतिआगोमध्ये आणि सर्व देशातच खटल्याविषयी कमालीची उत्सुकता आणि चिंता निर्माण झाली होती. सांतिआगोमधल्या तरुणांवर अत्याचार झाल्यामुळे तर तेथे खूपच धुमसते वातावरण निर्माण झाले होते.

खटल्याच्या सुरूवातीलाच सरकारी वकीलाने आरोप केले, की या हल्ल्याला माजी अध्यक्ष प्रियो सोकार्रास याने आर्थिक पाठिंबा दिला होता. फिदेल स्वत: वकील असल्याने आपण स्वत:च केस चालविणार असे त्याने जाहीर केले होते. वरील आरोप ऐकताच त्याने खिशातून एक छोटी वही काढली आणि ती न्यायाधिशाला सादर केली. त्यात हल्ल्यासाठी झालेल्या खर्चाचा तपशीलवार हिशेब होता. त्यासाठी लागलेले १६,४८० पेसो हे बंडखोरांनी स्वत: जमविले होते.

प्रत्येक बाबतीत खटल्यामध्ये फिदेलने आक्रमक धोरण घेण्यास सुरुवात केली. बारीक–सारीक प्रश्न विचारून त्याने सरकारी वकिलाला भंडावून सोडले. तेव्हा सरकारी पक्षाच्या लक्षात आले की, फिदेलची वकीली सरकारला चांगलीच जड जाणार आहे. दोन दिवस केस तहकूब होती. तिसऱ्या दिवशी फिदेलला कोर्टात आणलेच नाही. पोलिसांनी जेव्हा सांगितले, की फिदेल आजारी असल्याने तो कोर्टात येऊ शकला नाही, तेव्हा आरोपी मेल्बा हरनांदेच्हने आपल्या डोक्यावरचा घट्ट बांधलेला अंबाडा सोडून, त्यातून एक कागद काढला आणि न्यायाधीशाला सादर केला. फिदेलच्या हस्ताक्षरातील ती चिठ्ठी होती.

आपण पूर्णपणे निरोगी असून आपल्याला काही झालेले नाही असे फिदेलने चिठ्ठीत लिहिले होते. सरकार आपल्याला ठार मारण्याचा कट करत आहे म्हणून आपल्या आजारपणाबद्दल सांगितले जात आहे. कोर्टाने कुणालातरी पाठवून आपल्या "आजारा'ची चौकशी करावी अशी विनंती त्याने केली, कोर्टाने स्वत:च्या प्रतिनिधींकरवी कैद्यांना तुरुंगातून कोर्टात आणताना देखरेख ठेवावी, म्हणजे "पळून

जाण्याचा प्रयत्न करताना' त्याला ठार मारण्याचे निमित्त पोलिसांना मिळणार नाही. कोर्टाने हा अर्ज स्वीकारून फिदेलच्या प्रकृतीवरील वैद्यकीय अहवाल सादर करण्याचा सरकारला हूकूम सोडला.

वस्तुस्थिती ही होती, की या खटल्याला कूबामध्ये आणि अमेरिकेत भलतीच प्रसिद्धी मिळत होती आणि फिदेल त्या खटल्यात असणे सरकारला गैरसोयीचे वाटत होते. कोर्टाने पाठविलेल्या दोन डॉक्टरर्सनी फिदेलला तपासून त्याची प्रकृती चांगली असल्याचा निर्वाळा दिला. तरी त्याला खुल्या कोर्टात पुढे कधीच आणले नाही. उलट मेल्बा हरनांदेथ फिदेलची चिठ्ठी मिळवून तुरुंगाबाहेर कशी नेऊ शकली याची चौकशी सुरू झाली. कोर्टात जाताना प्रत्येक कैद्याची संपूर्ण झडती घेतली जाऊ लागली. फिदेलला त्या तुरुंगातून हलवून दुसरीकडे नेण्यात आले आणि सुमारे वीस दिवसांनंतर त्यासाठी दुसरीकडेच नर्ेेससच्या एका होस्टेलमध्ये गुप्त खटल्याची व्यवस्था करण्यात आली.

इकडे मूळ खटल्याला थोडी फार प्रसिद्धी मिळू शकत होती. पण त्यावर बातिस्ताचे वृत्तपत्रीय निर्बंध होते. खटल्यात साक्ष देताना हेदी सांतामारियाने डॉ. मुनोझ आणि इतर पंचवीस बंडखोरांना पोलिसांनी ठार मारल्याचे सांगितले आणि पोलिसी अत्याचाराची एक भयंकर गोष्ट सांगितली. हेदीचा भाऊ आबेल हाही तुरुंगात होता. एके दिवशी पोलीस तिच्या कोठडीशी आले. एकाने एका कागदाच्या गुंडाळीतून एक मानवी डोळा काढून तिला दाखविला व सांगितले की तो तिच्या भावाचा आहे. प्रियो सोकार्रास या हल्ल्याच्या मागे होता अशी कोर्टात कबुली देण्याचे तिने लिहून दिले नाही, तर दुसराही डोळा आणू अशी धमकीही पोलिसांनी दिली. तिने नकार दिला तेव्हा आबेलचा दुसराही डोळा तिच्यासमोर येऊन पडला. अनेक कैद्यांना असे हाल–हाल करून ठार केले.

फिदेलवरील खटल्याच्या बाबतीत संपूर्ण गुप्तता बाळगण्यात आली होती. खटल्याच्या खोलीत तीन न्यायाधीश, दोन वकील, कित्येक सशस्त्र सैनिक आणि सहा निवडक वार्ताहर याशिवाय कुणालाही प्रवेश नव्हता. उपहासाची गोष्ट अशी की वार्ताहरांना खटल्याचा एकही शब्द प्रसिद्ध करण्याची परवानगी नव्हती.

या निराशामय परिस्थितीतून फिदेल कास्त्रोने प्रचाराचा एक जोरदार दणका हाणला. आपल्या बचावाचे त्याने जे उत्कृष्ट पाच तासांचे भाषण केले ते त्याने प्रसिद्ध करण्याची व्यवस्था करून ठेवली होती. आपल्याला मृत्यूदंड होईल याची त्याला खात्री होती. पण आपली बाजू देशापुढे येऊन क्रांतिकार्य पुढे चालूच राहावे अशी त्याची इच्छा होती. त्याने नेहमीच्या पद्धतीने भाषण करून सबंध कोर्टाला गुंगवून टाकले. भाषणाच्या शेवटचे वाक्य होते, "मला दोषी ठरवून ठार करा. त्याने काहीच बिघडणार नाही. इतिहास मला दोषमुक्त करील! (Condemn me. It does not matter. History will absolve me..)

त्याच्या या भाषणातून "हिस्टरी वील अबसौल्व मी' (इतिहास मला दोषमुक्त करील) या ऐतिहासिक पुस्तकाचा जन्म झाला. फिदेलच्या बचावाचे मुख्य सूत्र हे होते की बातिस्ताने घटनेला धाब्यावर

बसविल्यामुळे घटनात्मक सरकार उलथून पाडण्याचा आरोप त्याच्यावर करताच येत नाही. बातिस्ता सरकारच्या घटनात्मक वैधतेला त्याने आधीच कोर्टात आव्हान दिले होते; पण कोर्टाने त्याचा अर्ज फेटाळून लावला होता हेही त्याने सांगितले. याच भाषणात त्याने भविष्यकाळातील कूबाविषयीचे आपले विचार सांगितले. त्यातच त्याच्या क्रांतिकारी विचारांचे सूत्र दिसून येते. मोनकादोसाठी त्याने जो जाहीरनामा तयार केला होता, त्याचेच विस्तृत विवेचन म्हणजे हे भाषण.

हॉस्पिटलमधील नर्सेस वसतीगृहाच्या भागातच हा खटला चालू होता. फिदेलने जेव्हा भाषणास सुरुवात केली तेव्हा हॉस्पिटलमधील कर्मचारी आणि कोर्टातील सशस्त्र सैनिक केवळ कुतूहल म्हणून ऐकू लागले. पुढे त्याच्या भाषणात जेव्हा रंग भरू लागला तेव्हा चांगले ऐकू यावे म्हणून लोक गर्दी करू लागले. सैनिकदेखील ज्या ठिकाणाहून चांगले ऐकू येईल अशा जागा आळीपाळीने बदलू लागले.

कास्त्रोने सांगितले की केवळ दहा सशस्त्र माणसांनिशी तो सांतिआगोचे रेडिओ स्टेशन ताब्यात घेऊ शकला असता. त्याच्याजवळ ओर्तोदोस्तो पक्षाचा लोकप्रिय नेता छिबासचे* एक टेप केलेले भाषण होते. ते रेडिओवर लावल्यास सबंध सातिआगो शहर पेटवून उठवण्यास पुरेसे होते.पण तसे केले असते तर सैनिक बराकीतून बाहेर पडले असते आणि बेसुमार रक्तपात झाला असता. हजारोंच्या संख्येने नागरिक मेले असते. म्हणून प्रथम बराकी ताब्यात घ्यायच्या आणि मग रेडिओ स्टेशन घ्यायचे असा त्यांचा इरादा होता. मधल्या अनपेक्षित गोष्टी घडल्या नसत्या तर त्याला यशाची खात्री होती.

"प्रचार असा केला जातो की आधुनिक शस्त्रांच्या उपलब्धतेमुळे जुलूमशाही आणि हूकूमशाही यांच्याविरुद्ध सामान्य जनता टक्कर देण्यासाठी उभी राहू शकत नाही. हे खरे नाही. लोकांनी अन्यायाविरुद्ध झडगण्याचे मनावर घेतले तर जगातील कोणतीही शक्ती, कोणतेही शस्त्र त्यांना नमवू शकत नाही" –

आपल्या बचावात आपणाला मुक्त करावे अशी मागणी फिदेलने केली नाही. तो म्हणाला, "माझे साथी तुरुंगात खितपत पडले असताना मला मुक्त करा अशी मागणी मी करू शकत नाही. त्यांना जाऊन मिळण्यासाठी मलाही तिकडेच पाठवा. ज्या राज्याचा अध्यक्ष एक गुन्हेगार आणि चोर आहे, त्या राज्यात प्रामाणिकपणा आणि सन्माननीय नागरिकांना मृत्यू किंवा तुरुंगवासाची शिक्षा मिळावी हे अपेक्षितच आहे. मला माहीत आहे, तुरूंगात आम्हाला अनेक अत्याचार सहन करावे लागतील. परंतु मला त्याचा धाक नाही. ज्या जुलुमी हूकूमशहाने माझ्या सत्तर बांधवांचे बळी घेतले त्याचीही भीती मला वाटत नाही' – शेवटी तो स्वर उंच नेऊन ओरडला, "मला दोषी ठरवा, मला ठार मारा. फिकीर नाही. इतिहास मला दोषमुक्त करील.' कोर्टात तर त्याने हे भाषण केलेच. पण तो तुरुंगात असतानाच हे जहाल भाषण गुप्तपणे छापून वाटण्यात आले.

फिदेलचा खटला संपण्याच्या आधीच मूळचा खटला संपलाही होता. बंडखोरांना खरे म्हणजे मृत्यूदंडाचीच सजा होणार होती. सरकारचा तसा प्रयत्न होता; पण सांतिआगो पोलिसांच्या

अत्याचारामुळे सबंध कूबाभर भयंकर प्रक्षोभ निर्माण झाला होता. त्यामुळे त्यांच्यावर विविध वर्षाच्या सजा ठोकण्यात आल्या.

नोव्हेंबर १, १९५४ रोजी बातिस्ताने अध्यक्षपदाच्या निवडणुका घेण्याचे जाहीर करून स्वत:ची उमेदवारीही जाहीर केली. तो बिनविरोध निवडून आला. त्याचे अध्यक्षपद चार वर्षांसाठी कायम होताच राजकीय कैद्यांच्या सुटकेची मागणी कूबात सर्वत्र सुरू झाली. अखेर १३ मे १९५५ रोजी फिदेल व त्याच्या साथीदारांना माफी जाहीर झाली.

शांततामय आणि लोकशाही मार्गाने कूबाची परिस्थिती सुधारणे अशक्य आहे, हे जरी खरे असले तरी ते अजून लोकांना पटलेले नसल्याने आपल्या कृतीने ही गो्ष्ट आपण लोकांच्या गळी उतरविली पाहिजे, या दृष्टीने फिदेलने हालचाली सुरू केल्या.

हावानाला येताच फिदेलने पुन्हा एक जाहीरनामा काढला : "आम्ही सुटलो खरे. पण आता विश्रांती नाही. आता पुन्हा संघटन आणि झगडा. सुटकेच्या पहिल्या दिवसापासून भ्रष्टाचार, दु:ख आणि दारिद्र्य यापासून देशाला मुक्त करण्यासाठी निकराचा लढा, हेच आमचे कर्तव्य. आपल्या देशाचा उज्ज्व भविष्यकाळ आता कोणी बदलू शकणार नाही.'

हावानात परतल्यावर कास्त्रोने राजकीय चळवळींची सर्व दारे ठोठावून पाहिली. पण त्याच्यासाठी सर्वच दारे बंद दिसली. एका दैनिकात तो जहाल लेख लिहू लागला तेव्हा बातिस्ता सरकारने ते वृत्तपत्र बंद करून टाकले. त्याला जाहीर सभा घेण्यास बंदी करण्यात आली. रेडिओ अथवा टेलिव्हिजनवरही बोलण्यास त्याला बंदी होती.

लोकशाही चळवळीचे सर्व मार्ग बंद झाल्याने सुटकेनंतर दोन महिन्यातच कास्त्रोने कूबा सोडून मेक्सिकोत जाण्याचे ठरविले. त्याचा भाऊ राऊल आणि मोनकादो खटल्यातले आणखी इतर काही तरूण मेक्सिकोत अगोदरच गेलेही होते.

पण कूबा सोडताना देशात खूप प्रसार असलेल्या एका बोहेमियन मासिकात एक जहाल लेख येण्याची व्यवस्था त्याने करून ठेवली होती. कास्त्रोने लिहिले होते –

""आम्ही परत येऊ ! स्वातंत्र्य आणि समता यांची ज्योत जेव्हा आम्ही आणू शकू तेव्हाच आम्ही परतू ; भ्रष्टाचार आणि भूक यांना हद्दपार करण्यासाठी आम्ही परत येऊ. लोकशाही मार्गाने शांततामय लढ्याचे सर्व दरवाजे आता लोकांना बंद झाले आहेत. आता एकच उपाय आहे बंदूक ––.''

## ८. क्रांतीच्या जुळवणीसाठी मेक्सिकोत

मेक्सिकोत जाताना फिदेल कास्त्रोने एकच योजना तयार केली होती. जमेल तेवढ्या कूबन क्रांतिकारकांना एकत्र जमवायचे. त्यांना गनिमी युद्धाचे शिक्षण द्यायचे. जमेल त्या मार्गाने पैसे गोळा करायचे. शस्त्रास्त्रे विकत घ्यायची. एक लहान बोट विकत घ्यायची आणि योग्य संधी साधून कूबाच्या किनाऱ्यावर उतरायचे. त्याच सुमारास २६ जुलै चळवळींच्यामार्फत कूबात सार्वत्रिक संप घडवून

आणायचा. सार्वत्रिक संप आणि सशस्त्र उठाव एकाच वेळी झाल्यास बातिस्ताचे भ्रष्ट सरकार कोसळून पडायला फार काळ लागणार नाही, अशी त्याची अटकळ होती.

परंतु ही सगळी कामे फार कठीण होती. मेक्सिकोत सर्व क्रांतिकारकांना एकत्र जमविणे हीच जिकीरीची बाब होती. कारण कास्त्रो व त्याच्या अनुयायांमागे मेक्सिकन पोलिसांचा ससेमिरा तर होताच. शिवाय अमेरिकन सी.आय.ए.चे हस्तक आणि बातिस्ताचे गुप्तहेरही त्यांच्या मागावर होते. या सगळ्यांच्या नजरा चुकवून त्यांना हालचाल करावी लागे.

खुद्द कूबामध्ये फिदेलच्या मोनकादो प्रकरणापासून स्फूर्ती घेऊन क्रांतिकारी हालचाली करणारे अनेक छोटे गट तयार झाले होते आणि ठिकठिकाणी ते उठावाचे अयशस्वी प्रयत्न करत होते. हावानामधील काही तरुण लष्करी अधिकाऱ्यांचा सत्ता काबीज करण्याचा कट बातिस्ताने मुळापासूनच उखडून हाणून पाडला होता. अनेक क्रांतिकारी गटांपैकी मोन्ते क्रिस्ती या एका संघटनेने फिदेलचेच तंत्र वापरून एका लष्करी ठाण्यावर अयशस्वी हल्ला चढविला. अशा तऱ्हेने कूबन द्वीपकल्पात एक तऱ्हेचे अस्थिर, अशांत आणि धुमसते वातावरण तयार झाले होते. फिदेलच्या योजनांसाठी ते आवश्यक होते. योग्य क्षणी आणि योग्य ठिकाणी ठिणगी टाकण्याचा अवकाश की अवघा कूबा पेटून उठेल असा फिदेलचा विश्वास होता.

मेक्सिकोत जमलेले सगळे क्रांतिकारक कफल्लक होते. कुणाजवळ दिवस भागविण्या–पुरतेदेखील पैसे नसत. तेथे आल्यावर फिदेलने प्रथम २६ जुलै चळवळीचा जाहीरनामा पुन्हा एकदा लिहून काढला. पण तो छापायला पैसे नव्हते. म्हणून त्याला आपला एक भारी कोट गहाण ठेवावा लागला. चळवळीसाठी पैसे उभारण्यासाठी फिदेल ऑक्टोबर १९५५ मध्ये अमेरिकेत गेला. प्रवासालाही पैसे त्याला उधार मागावे लागले. अमेरिकेत तो सात आठवडे राहिला. न्यूया र्क, फ्लॉरिडा राज्यात सभा घेऊन, भाषणे ठोकून, त्याने अमेरिकेत आश्रय घेतलेल्या कूबन्सकडून हजारो डॉलर्स जमविले. अर्थात या रकमेला त्याने स्पर्शही केला नाही. स्वत: दरिद्री, अर्धपोटी राहून सर्व रक्कम चळवळीसाठी वापरली.

कूबामध्येही २६ जुलै चळवळीच्या कार्यकर्त्यांनी गुप्तपणे पैसा जमविण्यास सुरुवात केली होती. फेब्रुवारी १९५६ पर्यंत सुमारे आठ हजार डॉलर्स जमले. तेव्हा फिदेलने प्रत्यक्ष कामाला सुरुवात केली. गनिमी शिक्षणासाठी व शस्त्रास्त्रे साठविण्यासाठी मेक्सिको शहराजवळचाच एक छोटासा मळा त्याने विकत घेतला. शस्त्रास्त्रे विकत घेण्यास सुरुवात केली. मिळतील त्या बंदुका, जुन्यापुराण्या मशिनगन्स या मळ्यात येऊन पडू लागल्या. कूबातून काही, अमेरिकेतून काही अशी गुप्तपणे शस्त्रे येऊ लागली. स्पेनचा हूकूमशहा फ्रॅकोविरोधी लढ्यातील स्वातंत्र्यसैनिक व गनिमी युद्धतंत्रात निष्णात असलेल्या कर्नल अल्बार्तो बायो (जन्म १८९२) या माजी स्पॅनिश कर्नलच्या हाताखाली बंडखोरांना शिक्षण देण्याची फिदेलने व्यवस्था केली. बायोने तीन वर्षांच्या लष्करी शिक्षणाचा अभ्यासक्रम तीन महिन्यात बसवला होता. १९५६ च्या प्रारंभी प्रशिक्षण सुरू झाले. नकाशे तयार करणे, दारूगोळा बनवणे, शस्त्रे वापरणे, हल्ले व बचाव, गनिमी लढाई, व्यूहरचना, याची तयारी, नंतर एका मोठ्या शेतावर नेमबाजी व

डोंगरकपारीतून प्रत्यक्ष सराव असे खडतर प्रशिक्षण चालू झाले.

हे गनिमी युद्ध शिक्षण जोरात चालू असताना कूबन गुप्तहेरांना त्याची खबर पोचली. त्यांनी मेक्सिकन पोलिसांना जागे केले. रातोरात बंडखोरांच्या मळ्यावर मेक्सिकन पोलिसांनी धाड घातली. बंडखोरांना जीवानिशी पळ काढावा लागला. सगळी शस्त्रास्त्रे पोलिसांच्या हाती पडली. या मोठ्या हानीने न डगमगता फिदेल पुन्हा दुप्पट जोराने कामाला लागला. पण आता अधिक गुप्तपणे कामे करावी लागत होती. पुन्हा पैशासाठी हिंडणे, जागा विकत घेणे, शस्त्रास्त्रे जमविणे, सगळे आले. यावेळी एकाच ठिकाणी मोठी जागा न घेता मेक्सिकोपासून दूर अशा तीन छोट्या छोट्या जागा घेऊन तेथे बंडखोरांना प्रशिक्षण सुरू झाले.

वेळ थोडा होता. शक्य तितक्या लवकर कूबात परतायचे होते. अनेक हालअपेष्टांना तोंड द्यायची तयारी करायची होती. त्यासाठी खडतर परिस्थितीत प्रशिक्षण चालू होते. अवजड शस्त्रांसह दूरदूरचे मार्चेस, नद्या, जंगले, पहाड पार करणे, उघड्यावर झोपणे, कमीत कमी अन्नावर दिवस काढणे; वगैरे तयारी सुरू होती. गुप्तहेर वास काढीत होतेच.

आपण सशस्त्र उठाव घडवून आणण्यासाठी समुद्रमार्गेच कूबात परतणार आहोत याबद्दल मात्र कास्त्रोने कधीच गुप्तता राखली नव्हती. कूबा सोडतानाच त्याने जाहीर केले होते, की आम्ही परतू आणि एकतर विजयी तरी होऊ, नाही तर हूतात्मे. वेळोवेळी तो या घोषणा करीत होता. शस्त्रूपासून आपल्या आपल्या योजना गुप्त ठेवल्या पाहिजेत, असा सल्ला त्याची मित्रमंडळी देत. "मी माझ्या मार्गाने जात आहे ़, असे बोलणे हे लष्करीदृष्ट्या चुकीचे असेल. पण हा मानसिक युद्धप्रकार आहे.' असे फिदेलचे उत्तर ठरलेले होते.

सगळी तयारी होत आली होती. पण योग्य असे एखादे मोठे जहाज काही मिळत नव्हते. कारण तेवढे पैसे नव्हते ़. त्याच सुमारास मेक्सिकोच्या वेराक्रूझ प्रांतात तक्सपान नदीत एक मोडतोड झालेल्या जुन्या लहानशा बोटीची दुरुस्ती सुरू असलेली कास्त्रोने पाहिली. आपल्या कामासाठी ही बोट वापरायला हरकत नाही, असे त्याच्या मनाने घेतले. पण पैसे नव्हते. १५ हजार डॉलर जमवून ती बोट विकत घेतली.

बोटीतून कूबाकडे प्रयाण करण्याची तयारी पूर्ण होत$आली आणि प्रयाणाचा दिवस जवळ येऊ लागला. एवढ्यात कास्त्रोच्या विद्यार्थीदशेतील एका सहकाऱ्याने त्याचा घात केला आणि पोलिसांना माहिती दिली. सुदैवाने या इसमाला कटाची फारशी माहिती नव्हती. एकदोघांना अटक होऊन थोडीशी शस्त्रे जप्त होण्यापलिकडे काही घडले नाही.

ही दुसरी धाड येताच या पुढे मुळीच वेळ न गमाविण्याचे कास्त्रोने ठरविले. मेक्सिकोत ठिकठिकाणी विखुरलेल्या २६ जुलैच्या निवडक क्रांतिकारकांना त्याने ताबडतोब एकत्र जमविले. तीस नोव्हेंबरला कूबाचा किनारा गाठायचे ठरले. त्याच दिवशी कूबात सार्वत्रिक उठाव घडवून आणण्याची जबाबदारी

फ्रँक पेयस्वर सोपविण्यात आली. त्याच दिवशी ओरियेत्ते प्रांताच्या दक्षिण किनाऱ्यावरील एका ठरलेल्या ठिकाणी २६ जुलैचे सुमारे शंभर कार्यकर्ते जीप्स, अन्न वगैरे घेऊन फिदेलच्या स्वागतासाठी हजर राहाणार होते.

## ९. कूबाकडे कूच

फिदेलने मिळविलेल्या बोटीचे नाव होते "ग्राम्मा'. या छोट्याशा बोटीत अवघ्या आठ लोकांच्या प्रवासाची सोय होती. अद्याप ती पूर्ण दुरुस्त झालेली नव्हती. पण आता एकही दिवस थांबणे धोक्याचे होते. बोटीवर अन्न, सैनिकी पोषाख, बंदुका आणि इतर शस्त्रे गुप्तपणे कोंबण्यात आली. आठ माणसे जाऊ शकतील अशा त्या बोटीत तब्बल ८२ बंडखोर दाटीवाटीने बसले आणि २५ नोव्हेंबर १९५६ च्या पहाटे दोन वाजता वादळी वाऱ्यांना टक्कर देत हे चिमुकले जहाज तक्स्पान नदीच्या मुखातून धिमे धिमे मार्ग काटत गुप्तपणे मेक्सिकन समुद्रात उतरले. सहा दिवसात प्रवास आटोपून बरोबर ठरल्याप्रमाणे ३० नोव्हेंबरला आपण कूबाच्या किनाऱ्यावर इच्छित स्थळी लागू असा कास्त्रोने हिशेब केला होता. पण समुद्रातल्या तुफानामध्ये ही लहानशी बोट योग्य मार्गाने वेगात चालविणे अशक्य होते. प्रवासात खूपच वेळ जात होता. वादळाने प्रचंड हिंदकळणाऱ्या बोटीच्या प्रवासाने क्रांतिवीर बेजार झाले होते. अखेर ३० नोव्हेंबरच्या उठावाची बातमी "ग्राम्मा'मधील क्रांतिकारकांनी बोटीतच ट्रान्झिस्टरवर ऐकली. फ्रँकच्या अंदाजाप्रमाणे संबंध कूबात सार्वत्रिक उठाव झाला नव्हताच. स्वत: फ्रँक ओरियेन्तेमधील सातिआगो दे कूबा या शहरी होता. तिथे मात्र चळवळीने चांगलेच यश मिळविले. काही तास चळवळीचा सबंध शहरावर ताबा होता. पण नंतर बातिस्ताचे सैनिक तेथे पोचताच त्यांना उठाव दडपून टाकण्यास फारसा वेळ लागला नाही.

दरम्यान आणखीनच एक संकट उभे राहिले. बोटीच्या तळातून हळूहळू पाणी वर येऊ लागले होते. प्रथम बारीकशा फटीतून पाणी येत असेल असे बंडखोरां‌ना वाटले. पण पाण्याचा वेग वाढू लागला तेव्हा ध्यानात आले, की एका मोठ्या नळाच्या छिद्रातून पाणी झराझरा आत येत होते. झाले! पाणी काढून टाकण्याची कसरत तर करावी लागलीच, त्याचबरोबर ज्याची ज्याची जरूर नसेल असे सर्व भारी सामान समुद्रात फेकून देऊन बोटीचा भार हलका करावा लागला.

३० नोव्हेंबरपर्यंत बोटीवरचे पाणी आणि अन्न संपले होते. बोट लागल्याने सर्व बंडखोर विकलांग झाले होते. दुसरे दिवशी निकराचा प्रयत्न करून बोट सरळ कूबन किनाऱ्याच्या दिशेने निघाली. रात्र झाली तरी हवे ते दीपगृह दिसेना. ही रात्रही वादळाची होती. लेफ्टनंट त्रोक बोटीच्या सर्वात उंच शिडीवर निरीक्षण करण्यासाठी चढला. बोटीला जोरदार हेलकावे बसत होते. त्यामुळे तो तोल जाऊन समुद्रात पडला. अंधारात तो काही सापडेना. अखेर त्याला वाचवले. पण त्यामध्ये तासभर वेळ गेला. बोट पुन्हा पुढे निघाली; तेव्हा कुठे दीपगृहाची प्रकाश शलाका नजरेस पडली. पण बोट एवढी हेलकावे खात होती की किनाऱ्यापर्यंत पोचायला दोन डिसेंबर १९५६ ची सकाळ उजाडली. बेलीक

किनाऱ्याजवळ बोट लागली.

कास्त्रो बोटीतून कूबाकडे यायला निघाला आहे अशी गुप्त बातमी बातिस्ताला आधीच लागली होती. त्यामुळे किनाऱ्यावर ठिकठिकाणी त्याने पहारेकरी ठेवले होते. एका पहारेकऱ्याने "ग्राम्मा' बघितली आणि बिनतारी संदेश धाडला. थोड्याच वेळात एक युद्धनौका तेथे हजर झाली. "ग्राम्मा'वर गोळीबार सुरू झाला. पण तोवर सर्वजण उतरले होते. दोन विमाने आली आणि त्यांनी बॉम्बवर्षाव सुरू केला. परंतु दलदलीतल्या झाडीमुळे बंडखोर वाचले. परंतु "ग्राम्मा' दिसल्यामुळे बंडखोर कुठे उतरले हे सैन्याला कळून चुकले.

बंडखोर पक्क्या जमिनीवर पोचले तोवर पूर्ण थकून गेले होते. तहान–भूकेने बेजार झाले होते. चिखलाने आणि शेवाळाने बरबटून निघाले होते. परंतु विश्रांती घेणे शक्य नव्हते. सिएर्रा माएस्त्राचा पहाडी भाग लगतच होता. तिकडेच आश्रय घ्यावा लागणार होता. विश्रांतीसाठी कुठेही थांबण्याचा अवकाश की बातिस्ताच्या फौजांनी केव्हाच घाला घातला असता. त्यामुळे तशाच थकलेल्या जर्जर अवस्थेतही विलक्षण मानसिक निर्धाराने झपाटलेल्या अवस्थेत बंडखोरा ा ंची ती फौज पुढे निघाली. वाटा माहीत नव्हत्या. त्यामुळे काही ठिकाणी तर फौजेने गोलगोल चकराच मारल्या. बंडखोरांनी सात दिवस समुद्रावर अर्धपोटी आणि सागरी आजाराच्या जाचात काढले होते. जमिनीवर ते तीन दिवस भयानक परिस्थितीत मार्गक्रमण करीत होते. अखेर मेक्सिको सोडल्यापासून बरोबर दहा दिवसांनी, म्हणजे ५ डिसेंबर रोजी क्रांतिकारकांची ती टोळी धडपडत, अर्धवट बेशुद्धावस्थेत, भुकेने जर्जर झालेल्या स्थितीत एका सुरक्षित ठिकाणी –"अल्जेमियो दे पिको' येथे पोचली.

दरम्यान अमेरिकन वृत्तसंस्थांनी हावानातून बातम्या पाठवल्याही होत्या, की बातिस्ताच्या नौदलाने आणि वायुदलाने "ग्राम्मा'ला समुद्रातच गाठून बुडविले आणि त्यात फिदेल कास्त्रो, राऊल आणि त्यांचे अडतीस साथीदार ठार झाले. या बातम्या प्रसिद्ध झाल्या तेव्हा ते थकलेले ८२ बंडखोर विश्रांती घेत होते.

२६ जुलैचा उठाव अयशस्वी झाला होता. किनाऱ्यावर बंडखोरांना मदत करण्यासाठी तयार असलेल्या २६ जुलैच्या कार्यकर्त्यांयना पकडले होते. बातिस्ताच्या लष्कराला आणि वायुदलाला फिदेलचा माग लागला होता आणि त्याची प्रचंड अत्याधुनिक लष्करी यंत्रणा कार्यान्वित झाली होती आणि अशा अवस्थेत दहा दिवसांच्या भंयकर जीवघेण्या प्रवासाने अर्धमेले झालेले ते ८२ बंडखोर अल्जेमियो–दे–पिको येथील एका उसाच्या झाडीत लपून विश्रांती घेत होते. त्यांच्याजवळ अगदीच तुटपुंजी शस्त्रे होती. अन्न जवळ जवळ नव्हतेच. भूक जबरदस्त लागली होती आणि फिदेल म्हणत होता, "आपण पोचलो. क्रांतीचा विजय निश्चित आहे.'

दुपारी बंडखोरांना जाग आली तेव्हा आकाशात जोरदार हालचाली सुरू होत्या. लष्करी आणि काही खाजगी छोटी विमानेही आकाशात जवळपास घिरट्या घालत असलेली दिसत होती. बंडखोरांना हा

काय प्रकार आहे याची फारशी जाणीव नव्हती. काहीजण तर अगदी उघड्यावर ऊस तोडून खात होते. पुढची घटना चे गेवाराच्याच शब्दात सांगितली पाहिजे.

चे सांगतो .... "तुकडीचा डॉक्टर म्हणून बंडखोरांच्या सुजलेल्या पायावर उपचार करण्याची जबाबदारी माझी होती. त्या दिवशीचा माझा शेवटचा पेशंट मला अजूनही आठवतो. त्याचा तो जगातला शेवटचा दिवस होता. मला अजूनही आठवते. थकला भागलेला व चिंताग्रस्त चेहऱ्याचा तो क्रांतिकारक पायात घालता येत नाही म्हणून हाती बूट घेऊन स्वत:च्या जागेकडे निघाला होता. त्याचा चेहरा अजून आठवतो. – कॉम्रेड मोत्ताने आणि मी एका झाडाला टेकून उभे होतो. थोडे अन्न–म्हणजे अर्धे सँडविच आणि दोन बिस्किटे ते हळूहळू चघळीत होतो. एवढ्यात एका बंदुकीचा आवाज आला. आणि काही सेकंदातच मशीनगनच्या गोळ्यांचा वादळी वर्षाव आमच्यावर होऊ लागला – "ती माझी पहिलीच वेळ होती. माझी बंदूक काही फारशी चांगली नव्हती. मीच मुद्दाम ती मागून घेतली होती. कारण वाटेमध्ये दम्याच्या जोरदार हल्ल्यामुळे मी हैराण झालो होतो आणि कुठे पडलो तर आपल्या जवळची चांगली बंदूक वाया जाईल असे वाटत होते.'

"नेमकं केव्हा, काय आणि कसं झाला हे आता स्पष्ट आठवत नाही. कारण स्मृती धूसर झाली आहे. परंतु फोस्तिनो पेरेथ मळ्याच्या कड्याला गुडघ्यावर वाकून त्याची मशीनगन चालवत असल्याचे मला स्पष्ट आठवते. माझ्याबरोबरच आणखी एक साथी पळत होता. आम्हा दोघांवरही एकदम मशिनगच्या गोळ्यांचा वर्षाव झाल्यासारखे वाटले. माझ्या छातीवर आणि मानेवर भयानक प्रहार झाल्यासारखे वाटले. माझ्या साथीदाराच्या नाकातून आणि तोंडातून रक्ताची धार लागली होती. अंगावर एक प्रचंड जखम झाली, "मेलो; मारलं त्यांनी' असं काही तो मोठ्याने ओरडला व झपाट्याने तो आपल्या बंदुकीतून गोळ्या सोडू लागला. मी जमिनीवर आडवा पडलो होतो. मीही असाच काहीतरी ओरडलो. बंदूक चालवता चालवताच फोस्तिनोने माझ्याकडे नजर टाकली आणि "हे काहीच नाही' अशा तऱ्हेचे काहीतरी तो ओरडला. पण माझा मृत्यू ठरलेला आहे हे त्याच्या डोळ्यात स्पष्ट दिसत होतं.'

"– मी जमिनीवरच पडून राहिलो. फोस्तिनोप्रमाणेच एक झटका येऊन जंगलाच्या दिशेने मी एकदा गोळ्या झाडून घेतल्या. सर्व संपल्यासारखे वाटत होते आणि सर्वोत्कृष्ट रीतीने मृत्यू कसा स्वीकारावा याचा मी विचार करू लागलो. जॅक लंडनची एक जुनी कथा मला आठवली. त्यामधील नायकाला ठाऊक झालेले असते की अलास्कातील बर्फाळ प्रदेशात मरणे हेच आता आपल्या नशिबी आहे. म्हणून तो एका झाडाला टेकून उभा राहातो आणि शानदारपणे मृत्यू स्वीकारण्याची तयारी करतो. तेच एक चित्र नजरेसमोर येते. मी एकटाच पडून होतो. मृत्यूची वाट पहात. तेवढ्यात अल्मेैदा माझ्याजवळ आला आणि त्याने मला पुढे सरकण्यास सांगितले. असह्य वेदना होत होत्या. पण सरकलो आणि आम्ही मळ्यात प्रवेश केला. अल्मैदाच्या नेतृत्वाखाली आम्हा सहाजणांचा गट तयार झाला आणि कसाबसा ऊसमळा ओलांडून आम्ही शेजारच्या जंगलात शिरलो. तेवढ्यात "आग आग' असा ओरडा झाला.

सगळा ऊस मळा धगधगताना दिसू लागला. रात्र पडेपर्यंत आम्ही चालत राहिलो आणि शेवटी पुढे जाणे अशक्य झाले तेव्हा एकमेकाला चिकटून उघड्यावर पडून राहिलो. रात्री डासांनी आमच्यावर हल्ला केला. भूक आणि तहान यांनी तर आम्ही अत्यंत बेजार झालो होतो...'

हा दिवस होता, ५ डिसेंबर १९५६. सशस्त्र उठाव करण्यासाठी म्हणून मेक्सिकोतून बोटीतून आलेल्या बंडखोरांची या पहिल्याच लढाईत अशी वाताहात झाली.

उसाच्या मळ्याला आगी लागल्यानंतर वेगवेगळ्या ठिकाणी असलेले सगळे गटागटांनी पांगण्याचा प्रयत्न करू लागले. काही बंडखोर बातिस्ताच्या सैनिकांनी वेढलेल्या सापळ्यात सापडून पकडले गेले. त्यांच्यापैकी अनेकांना ठार मारले. फारच थोडे कैदेत गेले. कोठल्याही गटाला इतरांचे काय झाले आहे हे माहीत नव्हते. तरीही सारेजण जिद्दीने तग धरून होते. जंगलातून लपून छपून चाल करीत, सिएर्रा माएस्त्राच्या दिशेने चालत होते.

## १०. सिएर्रा माएस्त्रात क्रांतिकारकांचा तळ

सिएर्रा माएस्त्रा हा दक्षिण कूबातील ओरियेन्ते प्रांतातील ईशान्य किनाऱ्यालगतचा प्रचंड पहाडी विभाग. घनदाट जंगलांनी वेढलेले, कूबातील सर्वात उंच डोंगर याच विभागात आहेत. सबंध कूबाची लोकसंख्या ७५ लाख तर या भागाची अवघी ५० हजार. सिएर्रा माएस्त्राच्या जंगली पहाडांचे फिदेलला प्रथमपासूनच आकर्षण होते. मोनकादोवरील हल्ला अयशस्वी झाला तर सिएर्रा माएस्त्रामध्येच माघार घ्यायची आणि तेथून गनिमी युद्ध पुढे चालवायचे अशी तेव्हाच त्याची कल्पना होती. त्याप्रमाणे तो सिएर्रा माएस्त्राच्या आश्रयाला गेलाही होता. पण पकडला गेला आणि योजना फसली.

आताही "ग्राम्मा'तून उतरल्याबरोबर कूबात सर्वत्र उठाव घडवून आणण्याची योजना फसली होती. पण आश्रयासाठी सिएर्रा माएस्त्रा होते आणि लढण्याची जिद्द होती.

बातिस्ताची विमाने त्या भागात अद्याप घिरट्या घालतच होती. सैनिकांची खास पथके उसांचे मळे धुंडाळून काढीत होती आणि अशा परिस्थितीत त्या पराभूत बंडखोरांचे गट बेजार अवस्थेत लष्कराला चुकवीत हिंडत होते. प्रत्येक गटाचे अनुभव दुसऱ्या गटापेक्षा अधिक खडतर, विचित्र, धोक्याचे आणि जिकीरीचे. भूक, तहान आणि डास हे बातिस्तांच्या विमानाएवढेच शत्रुत्व करीत होते. उसांवर भूक भागवणे, खडकांच्या खबदाडीतले पाणी चाटणे, खेकडे खाणे, जवळपास असलेल्या सैनिकांना चुकवत$सतत उंच पहाडाच्या दिशेने चालत राहाणे. पाय फाटले तरी.

युनिवर्सो आणि रेदोंदो यांच्याबरोबर फिदेल एका गुहेसारख्या खबदाडीत तीन दिवस दडून बसला होता. नंतर लपत छपत बाहेर पडला. पाच–सात दिवसांनी भुकेने जर्जर होऊन ते एका शेतावरील झोपडीत शिरले. तिथे त्यांचे चांगले स्वागत झाले. त्या म्हाताऱ्या शेतकऱ्याने फिदेलला ताबडतोब ओळखले आणि खाऊ–पिऊ घातले. फिदेल आणि त्याचे साथीदार बोटीतून येणार आहेत हे त्याला सांगण्यात आले होते. फिदेल जिवंत आहे हे पाहून म्हातारा खूष झाला. काही दिवसांनी त्यांचा मुलगा

गुलेर्मो$ गार्शिया हाही दोन बंदुका घेऊन क्रांतिकारकांना सामील झाला. गुलेर्मोनेच फिदेलची क्रेसेन्शो पेरेथची ओळख करून दिली. क्रेसेन्शोची २६ जुलै चळवळीला सहनुभूती होती. ओळख झाल्यावर त्याने फिदेलला सर्व तऱ्हेची मदत करण्याचे आश्वासन दिले. पेरेथ त्या भागात अत्यंत लोकप्रिय होता. त्यामुळे त्याची मदत कास्त्रोला महत्त्वाची होती.

दरम्यान चेच्या गटाची आणि कॅमिलोच्या तुकडीची एका अंधाऱ्या रात्री जंगलात गाठ पडली होती. एकमेकाला शत्रू समजून दोन्ही तुकड्यांनी बंदुका सरसावल्या तेवढ्यात ओळख पटली. नंतर हे दोन्ही गट बरोबरच भटकू लागले. पुढे राऊल कास्त्रोची बातमी त्यांना लागली आणि तोही त्यांना येऊन मिळाला.

फिदेल आसपासच भटकतो आहे हे कळल्यावर त्यांना आनंद झाला. पक्की बातमी कळल्यावर व खात्री पटल्यावर सगळ्यांची एका पहाडाच्या उतरणीवर गाठ पडली. चारी बाजूने बातिस्ताने वेढलेल्या जंगलात सगळ्यांनी एकमेकाला मिठ्या मारल्या आणि फिदेल म्हणाला, "चला, आता आपल्या लढ्याला सुरुवात होईल व आपण जिंकणार हे नक्की.'

सिएर्रा माएस्त्रामधील सर्वात सुरक्षित ठिकाण म्हणजे तेथील सर्वात उंच शिखर पिको तुर्कीनो. तिथे बातिस्तांचे सैनिक येणे शक्य नव्हते. त्यामुळे बारा जणांची ही तुकडी प्रथम ते शिखर चढून गेली.

पहिल्याच दिवसापासून फिदेल आणि त्याच्या साथीदारांनी हालचालीला सुरुवात केली. बातिस्ताचे सरकार उलथून त्या जागी न्यायी, समाजवादी सरकार स्थापन करणे हे ध्येय होते. ज्या मार्गाने हे शक्य होईल तो मार्ग स्वीकारण्याची तयारी होती. सध्या त्याला एकच मार्ग दिसत होता. सिएर्रा माएस्त्रामध्ये ते मुक्तपणे हालचाल करू शकतील असा तळ स्थापन करणे. हळूहळू या तळाची व्याप्ती वाढविणे आणि तसे करताना स्थानिक शेतकऱ्यांना सहानुभूतीने वागवून त्यांना आपल्या बाजूने वळविणे. बातिस्ताच्या सैनिकी तुकड्यांना एकटे दुकटे गाठून त्यांची शस्त्रे लंपास करून आपला शस्त्रसंभार वाढविणे, त्याच सुमारास शहरांमध्ये २६ जुलैची चळवळ अधिक तीव्र करणे. सशस्त्र बंडखोरांची ताकद वाढली की ते सैन्याच्या तुकड्यांवर हल्ले करून बातिस्ताला अधिक बेजार करतील आणि अशा तऱ्हेने बातिस्ताचे सरकार हळूहळू कोसळण्याच्या बेतास लागेल.

स्थानिक लोकांशी प्रेमाने आणि सहानुभूतीने वागून फिदेलने आणि बंडखोरांनी लवकरच त्यांचा विश्वास संपादन केला. बातम्या नेण्या–आणण्यासाठी त्यांचा चांगला उपयोग होऊ लागला. हळूहळू शहरातील २६ जुलैच्या कार्यकर्त्यांयपर्यंत फिदेलच्या आणि बंडखोरांच्या अस्तित्वाच्या बातम्या जाऊन पोचल्या. संदेशाची देवाण–घेवाण होऊ लागली. शहरांमधून बंदुका आणि माणसे येऊ लागली. पैसे येऊ लागले. याच पैशातून बंडखोर स्थानिक लोकांकडून अन्न विकत घेऊ लागले. बंडखोरांसाठी ठिकठिकाणी अन्नाचे साठे करून ठेवण्यात येऊ लागले. त्यामुळे हिंडताना बंडखोरांना बरोबर मोठी ओझी बाळगावी लागत नसत. काही शेतकऱ्यांची मुलेही बंडखोरांना सामील होऊ लागली. परंतु

फिदेलचा सक्त नियम होता, बरोबर शस्त्र आणल्याशिवाय कुणालाही बंडखोर सैन्यात दाखल करून घेतले जाणार नाही.

सिएर्रा माएस्त्राच्या डोंगराळ मुलुखात जमीनदारांच्या जुलमाने गांजलेले अनेक शेतकरी व कुळे आश्रय घेऊन स्थायिक झालेली होती. या डोंगराळ प्रदेशात सरकारी मालकीची किंवा खाजगी पड जमीन बरीच होती. तेव्हा या जमिनी कसून ते आपली उपजीविका चालवीत. बातिस्ताचे सैनिक त्यांना लुबाडत, छळत, त्याला तोंड देत स्वत:ची कमाई शाबीत राखण्याची त्यांची रोजच लढाई चाले. जमिनीसाठी ते अती भुकेले होते आणि जमिनीसाठी प्राणपणाने लढायला तयार होते. जमीनदारांकडून जमीन काढून घेतल्याशिवाय, जमीनदारांना पराभूत$केल्याविना जमीन मिळणार नाही हे उघड होते. त्यामुळे जमीनदारीविरोधी लढ्यात त्यांना ओढणे, त्यांना प्रशिक्षण देऊन गनिमी सेवेत सामील करून घेणे क्रांतिकारकांना शक्य झाले. क्रांतिकारकांची प्रामाणिक (खाद्यवस्तूंचे ते पैसे देत), निस्पृह आणि अगत्यशील वागणूक त्यांना सहज आपलेसे करून घेई. सिएर्रा माएस्त्रा प्रदेशातील क्रांतिकेंद्र त्यामुळे विस्तारत गेले.

## ११. गनिमी युद्धतंत्र

सिएर्रा माएस्त्रामध्ये जी गनिमी युद्धपद्धती विकसित झाली त्यावर चे गेवाराने पुढे एक पुस्तक लिहिले. अनेक देशांतील तरुण क्रांतिकारकांच्या हाती हे बायबलसारखे आले. याशिवाय चेने सिएर्रा माएस्त्रातील आपले अनुभव अत्यंत मोजक्या आणि प्रभावी भाषेत एका वेगळ्या पुस्तिकेत संक्षेपाने लिहून काढले. या अनुभवांच्या सुरुवातीला त्याने जी प्रस्तावना लिहिली त्यात त्याने क्रांतियुद्धावर आपल्या देशात जाण्यासाठी निघालेल्या एका मित्राला तीन वाक्यात सल्ला दिला आहे. या तीन गोष्टी म्हणजे सिएर्रा माएस्त्रामधील गनिमी युद्धाच्या अनुभवांचे सारच : सततची हालचाल, संपूर्ण अविश्वास,कायमचा पहारा.

**हालचाल**: कधीही एका ठिकाणी थांबू नये; एकाच ठिकाणी दोन रात्री घालवू नये. एका ठिकाणाहून दुसरीकडे अशी हालचाल कधीच थांबवू नये.

**अविश्वास** : सुरुवातीला स्वत:च्या छायेवरही विश्वास ठेवू नका. स्वत:चा मुक्त भूभाग ताब्यात येईपर्यंत मित्रवत खेडूत, माहिती पुरवणारे, वाटाडे, कॉन्टॅक्टर्स कुणावरही विश्वास टाकून गाफील राहू नका.

**पहारा** : डोळ्यात तेल घालून सतत जागरूक राहा. आजूबाजूच्या भागाचे बारकाईने निरीक्षण करून ठेवा; सुरक्षित जागीच मुक्काम ठोका आणि सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे छपराखाली कधीही झोपू नका; ज्या घराला  वेढा पडू शकेल अशा घरात झोपू नका.

पण हे तीन नियम कास्त्रो आणि चे यांनी बनविले ते अनुभवा अंती. त्यांनीही चुका केल्या, त्याची प्रायश्चित्ते भोगली. खेडुतांवर, वाटाड्यांवर विश्वास ठेवायला हरकत नाही, ते प्रेमळ असतात, क्रांतिकारकांना त्यांची सहानुभूती असते. पण> बातिस्ताच्या सैनिकांनी त्यांना पकडल्यावर आणि त्यांचे

हाल केल्यावर ते खेडुत बंडखोरांविषयीची माहिती घडाघडा सांगू लागतात, हे बंडखोरांना एक–दोन चांगले धडे मिळाल्यावरच उमजले.

बंडखोरांमध्ये सामील होणाऱ्यांमध्ये काही हेरगिरी करणारेही होते. बातिस्ताचा असाच एक हेर म्हणजे युतिम्यो. याने बंडखोरांचे बरेच नुकसान केले. तो फिदेलच्या जिवावरही टपला होता. पण अखेर तो पकडला गेला. सुरुवातीला बंडखोरांचा युतिम्योवर एक आदर्श शेतकरी क्रांतिकारक म्हणून पूर्ण विश्वास होता. युतिम्यो गरीब शेतकरी होता आणि जमीनदाराविरुद्ध  झालेल्या लढ्यात तो इतर शेतकऱ्यांबरोबर लढला. वाटाड्या म्हणून क्रांतिकारकांना तो खूपच उपयुक्त वाटत होता. काही दिवसांनंतर युतिम्यो सैनिकांकडून पकडला गेला. त्याला ठार मारण्याऐवजी एका अधिकाऱ्याने लाच दिली. फिदेलला ठार मारल्यास दहा हजार पेसो व सैन्यात अधिकाऱ्याची जागा देण्याचे त्याला आश्वासन देऊन सोडून दिले. युतिम्यो बंडखोरात परत आला, पण त्याचा संशय मात्र कुणाला आला नाही. युतिम्यो आल्यापासून विचित्र घटना घडू  लागल्या. एकदा युतिम्यो आपल्या आजारी आईला भेटण्यासाठी म्हणून परवानगी घेऊन कँप सोडून निघून गेला. दुसरेच दिवशी कँपच्या ठिकाणी विमानांनी येऊन बॉम्ब वर्षाव केला. केवळ प्रसंगावधानाने बंडखोर वाचले. सैपाकाच्या धुरामुळे विमानांना आपला पत्ता लागला असावा असे त्यांना वाटले. पण युतिम्योचा कुणाला संशय आला नाही. त्याच सुमारास जवळच्या एका खेड्यातील दहा माणसे बंडखोरांना येऊन मिळाली आणि त्यांची संख्या वाढली. युतिम्यो कँप सोडून निघून गेला असतानाच पुन्हा दोनदा बातिस्ताच्या सैनिकांनी बंडखोरांवर हल्ले केले, तेव्हा कुठे त्याचा संशय येऊ लागला. परंतु हा संशय येण्याअगोदर युतिम्योने फिदेलचा खून करण्याची संधी मिळवली होती. पण त्याला धैर्य झाले नाही. एके रात्री आपल्याजवळ ब्लँकेट नसल्याची युतिम्योने तक्रार केली आणि फिदेलचे ब्लँकेट मागितले. फेब्रुवारीमधील त्या रात्री अतिशय कडक थंडीच्या होत्या. फिदेल म्हणाला, "मी जर तुला ब्लँकेट दिले तर आपण दोघे गोठून जाऊ. त्यापेक्षा माझे दोन कोट व ब्लँकेट पांघरून एकत्रच झोपू.'

चे गेवारा लिहितो: "अशा रीतीने युतिम्योने क्रांतीच्या नेत्याच्या शेजारी झोपून रात्र काढली.फिदेलचे आयुष्य त्याच्या हातातील पिस्तुलावर होते. फिदेलचा खून करण्याची तो संधीच शोधत होता. परंतु त्याला धैर्य झाले नाही. एका देशद्रोह्याच्या मनातील विचित्र अनाकलनीय गुंतागुंतीवर धैर्य आणि भीती, सद्बुद्धी आणि सत्ता, पैसा आणि लालसा यांच्यामधील झगड्यावर त्या रात्री कूबन क्रांतीच्या अग्रदूताचे आयुष्य अवलंबून होते. सुदैवाने युतिम्योच्या मनावरील आणि बुद्धीवरील बंधने अधिक प्रभावी ठरली आणि काही विपरित न घडताच  पहाट उजाडली.''

पुढे एक–दोनदा बंडखोरांच्या ठिकाणांवर हल्ले झाल्यावर आणि युतिम्योला संशयास्पद रीतीने काही सैनिकांबरोबर हिंडताना पाहिल्यार त्याच्या द्रोहाची क्रांतिकारकांना खात्री पटली. अल्मैदा आणि त्याच्या गटावर युतिम्योला पकडून आणण्याची जबाबदारी सोपविण्यात आली. युतिम्योला पकडण्यास फार वेळ

लागला नाही. त्याच्या अंगावर लपविलेले पिस्तुल, दोन हातबॉंब आणि सुरक्षित प्रवासाचा सैन्याचा पास सापडला. पुरावा उघड होता. आपले काय होणार हे युतिम्योला कळून चुकले. फिदेलच्या समोर जाऊन तो गुडघ्यावर पडला आणि "मला ठार मारा, मी मरायच्याच लायकीचा आहे,' असे म्हणाला. आपली चूक त्याने कबूल केली.

पण युतिम्यो आणि त्याच्यासारखे काही अपवाद सोडल्यास बंडखोरांना अनेक तळमळीचे साथीदार येऊन मिळाले. स्थानिक मजूर–शेतकऱ्यांबरोबरच शहरातील तरुण–तरुणीही या क्रांतिकारकांना मिळाले. सेलिया सांचेथ ही सिएर्रा माएस्त्राशी प्रथम संपर्क जुळवणारी शहरातील २६ जुलैची आघाडीची कार्यकर्ती. सुरुवातीचे काही दिवस सिएर्रा आणि सातिआगो या दरम्यान तिने निरोप्याचे व वाटाड्याचे काम केले. पुढे ती सिएर्रातच राहिली. सेलिया सांचेथ्स खरे म्हणजे एका श्रीमंत डॉक्टरची मुलगी, पण २६ जुलै चळवळीशी तिचा जवळचा संबंध आला. मोनकादो प्रकरणानंतर एक वर्षात म्हणजे १९५४ साली ती चळवळीत सामील झाली आणि लवकरच चळवळीच्या आतल्या वर्तुळात तिने प्रवेश केला. "ग्राम्मा'मधील आघाडीसाठी तिला मेक्सिकोत जायचे होते. पण बरोबर कुणी स्त्री नको म्हणून फिदेल कास्त्रोनेच परवानगी नाकारली, "ग्राम्मा'च्या स्वागताची कूबात तयारी करणाऱ्यांमध्ये ती फ्रँक पेयसबरोबर आघाडीवर होती. पुढे भुमिगत झाली. सिएर्रात येऊन मिळाल्यानंतर तिने हाती बंदूक घेऊन लढयांमधून भागही घेतला. क्रांतिकारकांना तिचा उत्साह आणि तिची सहनशीलता स्फूर्तिदायी वाटत होती. सेलीया सांचेझ ही बुद्धिमान आणि धाडसी स्त्री प्रथमपासूनच फिदेल कास्त्रोच्या अत्यंत विश्वासातील सहकारी बनली. सिएर्रातील सर्व हालअपेष्टा तिने हसत हसत सहन केल्या.

सुरुवातीच्या काळात आजूबाजूच्या खेडुतांशी संबंध टाळणे आवश्यक होते. त्यांच्या नजरेस न पडता हालचाली कराव्या लागत. परंतु पुढे लवकरच बंडखोरांच्या हालचालींनी एक असा मुक्त विभाग निर्माण झाला, की तिथे बातिस्ताचे सैनिक शिरण्याचे धाडस करत नसत. चे गेवारा शेतकऱ्यांना वैद्यकीय मदत करी. त्यामुळे हळूहळू बंडखोर आणि ग्रामीण लोक यामध्ये जवळीक निर्माण झाली. बंडखोरांचे प्रेमाने स्वागत होऊ लागले आणि मुक्त संचारासाठी बंडखोरांना मोकळे रान मिळाले.

चळवळीची नीट आखणी करण्यासाठी फिदेलने फेब्रुवारी १९५७ च्या मध्याला सिएर्रा माएस्त्रामध्येच २६ जुलै च्या निवडक कार्यकर्त्यांची बैठक घेण्याचे ठरविले. आपल्या हालचालींना प्रसिद्धी मिळाली पाहिजे हेही त्याच्या मनाने घेतले. कोणत्याही एखाद्या चांगल्या अमेरिकन वार्ताहराला सिएर्रा माएस्त्रात गुपचूप धाडावे, त्याची सर्व व्यवस्था होईल असा निरोपही त्याने हावानात धाडला. त्याचवेळी न्यूया ॅर्क टाईम्सचा एक वरिष्ठ वार्ताहर हर्बर्ट मॅथ्यूज आपल्या पत्नीसह सुटीवर म्हणून सहज हावानाला आला होता. त्याला जेव्हा हा निरोप मिळाला तेव्हा त्याने तात्काळ तयारी दर्शविली आणि अनेक लटपटी खटपटी करून आपली बायको आणि २६ जुलैचे कार्यकर्ते यांच्यासह पोलीस आणि सैनिकी पहारे चुकवून सिएर्रा माएस्त्रात १७ फेब्रुवारी १९५७ रोजी प्रवेश केला.

मॅथ्यूज फिदेलबरोबर दिवसभर होता. मुलाखत संपल्यावर तो गुपचूप हावानाला परतला आणि तेथून थेट न्यूयाॅर्क. १० दिवसांनी फिदेलची मुलाखत न्यूयाॅर्क टाईम्समध्ये छापून आली. तो जिवंत असल्याची पहिली बातमी मॅथ्यूजनेच दिली. त्या मुलाखतीमुळे ताबडतोब फिदेल हा लॅटिन अमेरिकेतील अन्यायाविरुद्ध लढणाऱ्यांचा एक प्रतीक बनला.

परंतु फिदेल मेलेला आहे याची बातिस्ता सरकारला एवढी खात्री पटली होती, की मॅथ्यूजची मुलाखत म्हणजे काल्पनिक कादंबरीतील एक प्रकरणच आहे अशा तऱ्हेचे एक पत्रक बातिस्ताच्या संरक्षण मंत्र्याने काढले. दुसरे दिवशी न्यूयाॅर्क टाईम्सने फिदेल आणि मॅथ्यूज यांचा एकत्र घेतलेला फोटो छापला तेव्हा हा मंत्री गप्प बसला.

हर्बर्ट> मॅथ्युजने घेतलेली फिदेलची मुलाखत प्रसिद्ध झाल्यावर बातिस्ताने सुमारे दहा हजार सैनिक सिएर्रामध्ये त्याला शोधून मारण्यासाठी पाठविले होते. फिदेलच्या डोक्यावर एक लाख पेसोचे पारितोषिकही ठेवले. त्यामुळे बंडखोरांची परिस्थिती अधिकच बिकट झाली. काही बंडखोर शहरातील चळवळीत पाठविण्याची विनंती करू लागले. अशा परिस्थितीतही क्रांतिकारकांच्या हालचाली सुरू होत्याच.

क्रांतिकारकांचे मनोधैर्य वाढविण्यासाठी कास्त्रोने ला प्लाता येथील काही छोट्या सैनिकी बराकींवर हल्ला करण्याची योजना आखली. पहाटे-पहाटे बराकींना चारी बाजूंनी वेढा घालून योजनापूर्वक हल्ला चढवला. दोन सैनिक ठार झाले आणि पाच जखमी झाले आणि बराकी तासाभरात शरण आल्या. बंडखोरांपैकी एकालाही जखम झाली नाही. उलट त्यांना आठ बंदुका, एक मशिनगन आणि सुमारे एक हजार काडतुसे मिळाली. क्रांतिकारकांचा हा पहिलाच विजय होता. बातिस्ताला आणि कूबन जनतेला जाग आणून देणाऱ्या बंडखोरांची तुकडी अद्याप सिएर्रा माएस्त्रामध्येच जोरात काम करते आहे याची सर्वांना खात्री पटली. अंतिम विजयाची आशा दाखविणारा असा हा पहिलाच विजय.

## १२. हावानामधील घाला

हावानामधील आणि साऱ्या कूबामधील राजकीय परिस्थिती भयंकर तंग होत होती. भ्रष्टाचार पराकोटीला पोचला होता, हावाना म्हणजे श्रीमंत अमेरिकन प्रवाशांचे विलास स्थान बनलेले होते. कोवळ्या वयाच्या कूबन मुली तेथील वेश्यागृहात मिळतात म्हणून हावानाची सर्वत्र ख्याती होती. एकीकडे श्रीमंतांची इष्कबाजी तर दुसरीकडे जनतेची गळचेपी चालू होती. थोड्या संशयाने विद्यार्थ्यांयना पकडले जाई आणि तुरुंगात त्यांचे हाल हाल केले जात. सर्वत्र अत्यंत अशांततेचे वातावरण पसरले होते. बातिस्ताची दुष्कीर्ती अगदी शिगेला पोचली होती आणि जो तो मनातल्या मनात बातिस्ताशी लढण्याचे बेत आखीत होता. त्यांचे आशास्थान होते फिदेल व त्याचा लहानसा क्रांतिकारी गट.

मार्च १३, १९५७ रोजी दुपारी तीन वाजता हावानामधील अध्यक्षीय राजवाड्यासमोर एक मोठा ट्रक अचानक वेगात येऊन थांबला. शस्त्रधारी माणसांनी या ट्रकमधून भराभर खाली उड्या टाकल्या

आणि ते राजवाड्यात शिरले. समोरच्या पहारेकऱ्यांना काय प्रकार आहे हे कळण्याच्या आतच त्यांच्या छातीत बंदुकीच्या गोळ्या घुसल्या. बंडखोर आत शिरून सरळ पहिल्या मजल्यावरील बातिस्ताच्या ऑफिसात शिरले. पण दैवयोगाने बातिस्ता त्या वेळी तेथे नव्हता. काही मिनिटांपूर्वीच डोके दुखते म्हणून दुसऱ्या मजल्यावरील आपल्या झोपण्याच्या खोलीत तो गेला होता. तोवर सगळीकडे गडबड उडाली होती. बंडखोरांना दुसऱ्या मजल्यावर जाण्याचा रस्ता माहीत नव्हता. जादा सैनिक धावून आले व काही मिनिटातच राजवाड्यात शिरलेले पंचवीस बंदुकधारी तरुण जागच्या जागी रक्ताच्या थारोळ्यात मरून पडले. ते तरुण हावाना विद्यापीठातील एका जहाल क्रांतिकारी संघटनेचे सभासद होते. कास्त्रोच्या २६ जुलै चळवळीशी त्यांचा प्रत्यक्ष संबंध नव्हता. पण कास्त्रोला ते साहजिकच आपला स्फूर्तिदाता मानत.

राजवाड्यात मरून पडलेल्या एका तरुणाच्या अंगावरील कपड्यात एका कागदावर हावानातील एक सुप्रसिद्ध वकील डॉ. पेलायो याचे नाव लिहिलेले पोलिसांना सापडले. झाले! ताबडतोब पोलिसांच्या दोन गाड्या त्यांच्या घरी रवाना झाल्या. डॉ. पेलायो घरी नव्हता. तेवढ्यात कळले की, तो त्याच्या एका मित्राकडे गेला आहे. पोलीस तेथे पोचले. तेथून पोलिसांनी त्याला खेचून काढले आणि घरासमोरच रस्त्याशेजारी एका डबक्याजवळ एका पोलीस अधिकाऱ्याने त्याला सरळ गोळी घालून ठार मारले.

बातिस्तावरील मारेकऱ्यांच्या प्रयत्नांमुळे तर कूबात खळबळ उडालीच, पण डॉ. पेलायोच्या खुनामुळे सर्वत्र संतापाची लाटच पसरली. कारण डॉ. पेलायो हा वरच्या थरात वावरणारा एक प्रतिष्ठित सुप्रसिद्ध वकील होता आणि काहीही चौकशी न करता त्याला मारण्यात आले हे सगळ्यांना कळून चुकले होते. त्यामुळे हावानातील उच्च स्तरातही बातिस्ताविरुद्धचा असंतोष वाढीला लागला. सगळीकडे धरपकड सुरू झाली. दडपशाही अधिकच वाढली. ज्याला बातिस्ताविरोधी लढ्यात फिदेल कास्त्रोला सामील व्हायचे असेल त्याने आधी शस्त्र मिळवले पाहिजे, असा २६ जुलै चळवळीचा आदेश होता. त्यामुळे ठिकठिकाणी एकट्या दुकट्या पोलिसाचे मुडदे पडून त्यांच्या बंदुका लांबविल्या जाऊ लागल्या.

फिदेल कास्त्रोवरील बातिस्ताच्या सैनिकांचा दबाव कमी करण्यासाठी कॅलिस्को सांचेथ या तरुणाने मेक्सिकोतून आणखी एक सशस्त्र तुकडी कूबन किनाऱ्यावर उतरवण्याचा बेत आखला. एका बोटीतून सत्तावीस सशस्त्र तरुणांना घेऊन कॅलिस्को कूबात उतरला खरा. पण त्याच्या उतरण्याची जागा पोलिसांना आधीच माहीत झाली होती. हा गट जेव्हा उतरला तेव्हा "व्हिवा कास्त्रो' (कास्त्रोचा विजय असो) अशा घोषणा देत काही शेतकऱ्यांनी त्यांचे स्वागत केले. या शेतकऱ्यांनी त्यांच्या भोवती पक्के कोंडाळे केले तेव्हा कुठे बंडखोरांना कळून चुकले की ते शेतकरी नसून शेतकऱ्यांच्या वेशातील बातिस्ताचे सैनिक आहेत.

पण तोवर फार उशीर झाला होता. एक गोळीही न झाडता त्यांना शरण जावे लागले. सैनिकांचा नेता कर्नल कोले याने त्यांच्यापैकी सतरा जणांना जागच्या जागी गोळ्या घालून ठार केले. गोळागोळीला

सुरूवात होताच गडबड उडाली आणि दहा बंडखोर जीव वाचवून पळून जाण्यात यशस्वी झाले. आजूबाजूच्या डोंगरांमधून आणि गावांमधून ते भूमिगत कामे करू लागले. फिदेल कास्त्रो ज्या सिएर्रा माएस्त्रात हालचाल करीत होता त्याभोवतीचा लष्करी वेढा कायम होता. सशस्त्र तुकडी घेऊन मिळण्याचा कॅलिस्कॉ सांचेथ्सचा प्रयत्न जरी फसला तरी पेयसकडून सैनिकी कुमक पोचली.

फ्रँक पेयसने कबूल केलेली सशस्त्र तरुणांची तुकडी सैनिकांचे वेढे शिताफीने ओलांडून १६ मार्च रोजी सिएर्रा माएस्त्रामध्ये येऊन पोचली. फ्रँक हा फिदेलच्या अत्यंत जवळचा सहकारी होता. तो एक साधा शाळामास्तर होता. पण त्याचे व्यक्तिमत्व प्रभावी होते. निष्ठा असाधारण होती आणि कामाचा झपाटाही विलक्षण होता. तो अत्यंत धाडसी होता. एकदा भेटले, की लोक त्याला विसरत नसत. बंडखोरांमध्ये तो अत्यंत प्रिय होता. सांतिआगोमध्ये राहून त्याने बंडखोरांना अत्यंत मोलाची मदत केली. पुढे तीस जुलै रोजी बातिस्ताच्या पोलिसांना सांतिआगोमधील त्याच्या लपण्याचे ठिकाण सापडले व त्याला गोळी घालून ठार मारण्यात आले. सबंध सांतिआगो शहराने त्या दिवशी दुखवटा पाळला. सिएर्रा माएस्त्रामध्ये फिदेल आणि त्याच्या सहकाऱ्यांना तर अधिकच दु:ख झाले. कारण त्यांचा निकटचा सहकारी आणि लाख मोलाचा कार्यकर्ता गेला होता.

नव्याने आलेल्या तरुणांना सिएर्रा माएस्त्राच्या प्रखर कष्टमय जीवनाची जाणीव नव्हती. त्यांचे स्वच्छ कपडे, लवकर येणारा थकवा, प्रदेशाचे अज्ञान यामुळे ते मळक्या कपड्यांच्या आणि दाढ्या वाढवलेल्या जुन्या बंडखोरांहून एकदम वेगळे पडत. हळू हळू हे नवे लोकही रुळले, त्यांच्या दाढ्या वाढल्या, कपडे मळले, लांब लांब चाल करून जाण्याची सवय झाली, तहान, भुकेला तेही सरावले. हाल अपेष्टा सहन करून येणारी जिद्द त्यांच्यातही आली. लौकरच ते गनिमी युद्ध तंत्रातही तयार झाले. तक्रारी करण्याची सवय गेली. येईल त्या प्रसंगाला धैर्याने तोंड देण्याइतपत तयारी झाली. अजूनही बंडखोरांजवळ त्यांच्या एकूण संख्येपेक्षा शस्त्रास्त्रे कमी होती, पण क्रांतिकारकांच्या संघटनेत गुणात्मक बदल झालेला निश्चित दिसून येत होता.

काही दिवसांनी सांतिआगोहून काही शस्त्रेही चळवळीच्या कार्यकर्त्यांयनी पाठविली. मशिनगन्स, बंदुका, काडतुसे. बंडखोरांनी आता एक निश्चित भूभाग मुक्त केल्यासारखा झाला होता. घनदाट जंगलांनी व्यापलेल्या या भागात बातिस्ताच्या सैनिकांनी येण्याचे सोडून दिले होते. शेतकऱ्यांशी अधिक घनिष्ट संबंध ठेवून बंडखोरांनी आपल्या दळणवळणाची व्यवस्था चोख ठेवण्यास प्रारंभ केला. वेगवेगळे मार्ग मुक्रर करून त्या मार्गावर ठिकठिकाणची शेतकऱ्यांची घरे निवडणे व त्या घरांमध्ये शस्त्रांचा, अन्नाचा साठा करुन ठेवणे असा क्रम त्यांनी आरंभला. अशा तऱ्हेच्या गुप्त ठिकाणाचे जाळेच त्यांनी सिएर्रा माएस्त्रामध्ये निर्माण केले. ही घरे म्हणजे संदेशाची देवाणघेवाण करणाऱ्या अथवा शहरातून माल आणणाऱ्या दूताची विश्रांतीस्थळे झाली. याच सुमारास हेदी सांतामारिया शहरांमध्ये २६ जुलैच्या

कार्यकर्त्यांयनी गोळा केलेला पैसा घेऊन सिएर्रा माएस्त्रात आली. पैशांच्या उपलब्धतेमुळे शेतकऱ्यांकडून मदत घेणे आणि त्यांच्याबरोबर  चांगले संबंध ठेवणे अधिक सोपे झाले.

कोणतेही गनिमी युद्ध स्थानिक लोकांच्या मदतीशिवाय होणे अशक्य आहे हे फिदेल जाणून होता. सिएर्रा माएस्त्रामधील शेतकऱ्यांची परिस्थिती अत्यंत दरिद्री व लोकसंख्या विरळ होती. त्यामुळे त्यांची सामुदायिक प्रतिकारशक्ती व संघटना शून्य. अशा शेतकऱ्यांना एकत्र संघटित करणे हे मोठे कठीण काम होते. विशेषत: अत्यंत विरळ लोकसंख्येमुळे बातिस्ताचे सैनिक कोणत्याही एकट्या दुकट्या घरावर हल्ला करू शकत होते.

त्यामुळे शेतकऱ्यांना संघटित करण्यापेक्षा गनिमी सैन्य वाढवून शेतकऱ्यांच्या मदतीवर टिकाव धरणे हाच मार्ग फिदेलसमोर होता. चळवळ जसजशी वाढू लागली, तसतसा शेतकऱ्यांचा पाठिंबा वाढू लागला. शेतकऱ्यांची तरुण, बेकार मुले बंडखोरांना येऊन मिळू लागली. बातिस्ताच्या सैनिकांची सिएर्रा माएस्त्राच्या जंगलात घुसण्याची हिंमत संपली तेव्हा ते आजूबाजूच्या खेड्यातून जुलूम करू लागले. बंडखोरांचा साहाय्यक  असा कोणावरही आरोप करून, त्याच्या घरावर धाडी टाकून सर्रास खून करू लागले, तेव्हा शेतकरी अधिकच चिडले. बंडखोरांविषयीची त्यांची सहानुभूती वाढली. सैनिकांच्या हालचाली, त्यांची संख्या, त्यांच्याजवळील शस्त्रे या विषयीची इत्यंभूत माहिती ते बंडखोरांना आस्थेने पुरवू लागले. स्थानिक जनतेला प्रेमाने आणि आपल्या कामाने फिदेलने आपल्या बाजूला वळवून घेतले. यातच त्याने अर्धा विजय मिळवला होता.

नव्याने येऊन मिळालेले बंडखोर सिएर्रा माएस्त्राच्या परिस्थितीत रुळल्यावर आणि शस्त्रांची नवी कुमक मिळाल्यानंतर नवा आक्रमक पवित्रा घेण्याविषयीचे विचार बंडखोरांच्या डोक्यात घोळू लागले. एल्. उव्हेरो या सिएर्रा माएस्त्रामधील डोंगर भागातील एका लहानशा लष्करी तळावर हल्ला चढवून तो काबीज करावा अशी योजना फिदेलने मांडली. असा तळ जर आपण काबीज केला तर सबंध देशभर त्याचे पडसाद उमटतील आणि जिकडे तिकडे याच गोष्टीची चर्चा होईल. एल्. उव्हेरो या तळावर झपाट्याने हल्ला करायचा आणि शत्रूला चकित करून टाकायचे, सैनिकांना शरण आणायचे आणि त्यांना नवी कुमक मिळण्याच्या आत सापडतील तेवढी शस्त्रास्त्रे घेऊन लगबगीने सिएर्रा माएस्त्रात सुरक्षित ठिकाणी पळ काढायचा अशी फिदेलची योजना होती. २८ मे १९५७ रोजी हल्ला चढवायचा असे ठरले. तोवर या योजनेबाबत आत्यंतिक गुप्तता पाळायची होती.

हल्ल्याचे ठिकाण निश्चित झाल्यावर एकूण चढाईची बारीक तपशीलवार योजना फिदेलने आपल्या सहकाऱ्यांसह आखली. प्रथम या तळावर किती सैनिक आहेत, पहाऱ्याच्या किती चौक्या आहेत, त्या कुठे कुठे आहेत, त्यांची दळणवळणाची साधने कोणती, रस्ते कोणते, सैनिकांची बायकामुले कोणकोणत्या इमारतीत राहातात ही सर्व माहिती स्थानिक लोकांच्या मदतीने मिळवण्यात आली. त्यानंतर हल्ला कसा करायचा याचा संपूर्ण तपशील ठरविण्यात आला. तेव्हापासूनच प्रत्येक लढाईची

अगदी तपशीलवार योजना तयार करण्याची सवय फिडल कास्त्रोने लावून घेतली. कोणी, कोठे, किती अंतरावर उभे राहायचे, प्रत्येकाजवळ किती काडतुसे असावीत, कोणकोणत्या मार्गांनी हल्ल्याच्या लक्ष्यापर्यंत पोचायचे आणि कोणत्या रस्त्याला किती वेळात कुठे परतायचे हा सर्व तपशील तो तयार करीत असे.

## १४. एल् उवेरोच्या बराकींवर चढाई

एल् उवेरोच्या बराकी अगदी समुद्र किनाऱ्याला लागून होत्या. रातोरात सोळा किलोमीटर चाल करून बंडखोरांनी लष्करी तळाच्या तीनही बाजूंनी वेढा घालून उंचवट्यावर झाड्यांमध्ये दबा धरला. चौथ्या बाजूला समुद्र होता. आत एका इमारतीत स्त्रिया आणि मुले होती. या इमारतीवर कुठल्याही परिस्थितीत गोळी झाडायची नाही असा सक्त हूकूम होता.

सगळ्यांनी आपापल्या ठरलेल्या जागा घेतल्यावर फिदेलने एक गोळी झाडून हल्ल्याचा इशारा दिला. ताबडतोबीने तिन्ही बाजूंनी बंदु ूकांच्या आणि मशिनगन्सच्या गोळ्यांचा मारा सुरू झाला. सैनिकांना बंडखोरांच्या हालचालीचा अगोदरच सुगावा लागला असावा कारण ते तयारीतच असल्यासारखे दिसत होते. त्यांच्याकडून जोरात प्रत्युत्तर आले. सैनिक सहजासहजी घाबरून शरण येणार नाहीत असे दिसू लागले.  अल्मैदाच्या तुकडीने जीवावर उदार होऊन एका पहाऱ्याच्या चौकीवर चाल केली आणि ती ताब्यात घेतली. तेव्हा कुठे लढाईला वळण लागले. आणखी चौक्या पाडल्या आणि आतल्या बराकीतल्या सैनिकांचा प्रतिकार थंडावू लागला. शेवटी पावणेतीन तासांनातर बराकीमधून पांढरे निशाण फडकविण्यात आले आणि सैनिक शरण आले. लढाई मोठी हातघाईची झाली होती.

चे गेवारा म्हणतो, "उघड्या छातीच्या बंडखोरांनी निधडेपणाने कच्च्या संरक्षण फळीमागे असलेल्या शत्रूवर केलेला हा हल्ला होता. या विजयाने आमचे गनिमी सैन्य वयात आल्यासारखे आम्हास वाटले. या युद्धापासून आमचे नीतीधैर्य एकदम सहस्त्रपटींनी वाढले. आमचा निश्चय आणि विजयाच्या आशा आता द्विगुणित झाल्या. पुढचे वर्ष आम्हाला नंतर अतिशय जिकिरीचे गेले. परंतु विजयाचे रहस्य आता आमच्या हाती आले होते. एल् उवेरोच्या आमच्या या विजयामुळे मोठ्या लष्करी तळापासून दूर वसलेल्या लहान लहान बराकींचे भवितव्य संपुष्टात आले होते. लवकरच अशा बराकी शत्रूने बंद करून टाकल्या.'

एल् उवेरोवरील विजयी हल्ल्याचे सबंध कूबन द्वीपामध्ये जोरदार पडसाद उमटले. फिदेल कास्त्रो मोठ्या संख्येने सिएर्रा माएस्त्रामध्ये वावरत आहे एवढेच नव्हे तर बातिस्ताच्या सैन्याला आव्हान देण्याइतपत ताकद आता त्याने कमाविली आहे याची लोकांना खात्री पटली. सिएर्राच्या आसपासच्या लहान सहान चौक्या लष्कराने ताबडतोब बंद केल्याने बंडखोरांचा संचार अधिकच वाढला. मुक्त प्रदेशाची व्याप्ती वाढली. क्रांतिकारकांच्या वाढत्या प्रभावाने उत्तेजित होऊन  शहरातून व खेड्यातून बंदुका घेऊन सिएर्रा माएस्त्रामध्ये अनेक तरुण दाखल होऊ लागले.

गनिमी सैन्यामध्ये नव्याने भरती होणाऱ्यांची रीघ लागू लागली तेव्हा सैन्याची आधुनिक धर्तीवर संघटना करण्याची गरज भासू लागली. अधिकाऱ्यांना हूद्दे दिले गेले. सगळ्यात वरचा हुद्दा म्हणजे मेजर. चे गेवारा मेजर होता. सैन्याची संख्या वाढली तेव्हा त्यांच्या स्वतंत्र तुकड्या पाडून सिएर्रा माएस्त्राच्या वेगवेगळ्या भागात स्वतंत्र हालचाली करण्यास पाठविण्यात आले. ताकद वाढली तशा या तुकड्यांच्या हालचालीही वाढल्या. सिएर्राच्या बाहेर पडून तुकड्या बातिस्ताच्या सैनिकी तळावर हल्ले करू लागल्या.

गनिमी सैन्याची शिस्त आणि नीतीधैर्य किती पक्के होते याचे मार्मिक विवेचन चे गेवाराने केले आहे. तो म्हणतो, "सैन्याचे स्वरूप कसेही असो शिस्त आणि नीतीधैर्य यांच्या पायावरच त्याची ताकद अवलंबून असते. कूबन गनिमी सैन्याचे युद्धातील नीतीधैर्य विलक्षण होते आणि नेमका हाच गुण बातिस्ताच्या भाडोत्री सैन्याजवळ नव्हता.'

आता सिएर्रामधील बराच मुलूख बातिस्ताच्या सैनिकांपासून मुक्त झाला होता. मोठ्या भागावर आता फक्त बंडखोरांची हूकमत चालत होती. बंडखोरांनी ठिकठिकाणी स्थायी तळ स्थापन केले. चे गेवाराने तर एल् होंब्रितो या आपल्या तळावर ऑक्टोबर १९५७ च्या सुमारास एक जलविद्युत केंद्र स्थापण्याची तयारी चालवली. एक लहानसा छापखाना क्रांतिकारकांनी आणला होता. त्यामधून एक वृत्तपत्रही निघू लागले.

साल १९५७ संपत आले तेव्हा क्रांतिकारकांनी सिएर्रा माएस्त्राच्या बहूतेक भागात आपला पूर्ण अंमल बसविला होता. क्रांतिसैन्याची संख्या वेगाने वाढू लागली होती. सैन्याचे वेगवेगळे स्वतंत्र विभाग वेगवेगळ्या ठिकाणाहून निर्भयपणे हालचाली करू शकत होते. चळवळीची व्याप्ती वाढत होती. सिएर्राच्या नागरी विभागातही आता क्रांतिकारकांचाच अंमल होता.

बंडखोरांच्या वाढत्या ताकदीला बातिस्ताच्या लष्कराने आपल्या वैशिष्ट्यपूर्ण शैलीत जोरदार प्रत्युत्तर दिले. ही शैली म्हणजे नागरिकांवर जुलूम, जबरदस्ती, घरादारांची जाळपोळ, लुटालूट व रक्तपात. बंडखोर हाती सापडत नाहीत म्हणून आजूबाजूच्या खेड्यातून दहशत निर्माण करायची व तरुण मुलांना निवडून गोळ्या घालून ठार करायचे असा लष्काराने उद्योग आरंभिला. सैनिकांचे व स्थानिक जनतेचे संबंध कधीच चांगले नव्हते. नंतर तर आणखीच बिघडले. स्थानिक लोक व बातिस्ताचे सैन्य यांच्यात एक प्रचंड दरी निर्माण झाली. जुलुमाच्या धाकाने स्थानिक जनता सैनिकांना भीत असे तर बंडखोर यांच्यातच लपले आहेत याची खात्री पटून सैनिक स्थानिक लोकांना घाबरत. शक्य होईल तेव्हा सैनिकांना चुकीचे मार्ग सांगून भलतीकडेच फिरवणे, त्यांची शस्त्रे चोरणे, त्यांच्या हालचालींची माहिती बंडखोरांना पुरवणे हे उद्योग तरुण मंडळी करीत.

सिएर्रा माएस्त्रामधील बंडखोरांना निपटून टाकण्याची मोहीम बातिस्ताने आखली तेव्हा प्रथम सिएर्रामधील हजारो कुटुंबांना बाजूच्या शहरांमध्ये हलवण्याचे ठरवले. सिएर्रा निर्मनुष्य केले म्हणजे बंडखोरांना कुणाची मदत मिळणार नाही अशी कल्पना होती. असा हूकूम निघाल्याबरोबर लोक

खवळले. ज्यांना शक्य होते ते पुरुष आणि जवळजवळ सारे तरुण या गोष्टीला विरोध करू लागले आणि आपोआप बंडखोरांना सामील झाले.

स्त्रिया, मुले आणि म्हातारे यांची मोठी केविलवाणी अवस्था झाली. हाती लागेल ते सामान गाठोड्यात बांधून आपली जन्मभूमी सोडून या लोकांना सैनिकी पहाऱ्यात शहरांकडे दामटले. शहरात त्यांच्या पुनर्वसनाची अर्थातच काही व्यवस्था नव्हती. शहराच्या कडेला जागा मिळेल तेथे ही बेघर कुटुंबे जाऊन पडली. अन्न–पाणी नाही, राहाण्याची व्यवस्था नाही. भूकबळी पडू लागले. इकडे सैनिकांनी त्यांची घरेदारे जाळून टाकली होती.

निर्वासितांवरील जुलूमजबरदस्ती व त्यांच्या हालअपेष्टांमुळे कूबात सर्वत्र संतापाची लाट उसळली. आंतरराष्ट्रीय पातळीवरही हा प्रश्च चर्चिला जाऊ लागला तेव्हा शासनाने एकदम पवित्रा बदलला. निर्वासितांना आपापल्या गावी जाण्यास परवानगी देण्यात आली. परंतु ते सिएर्रा माएस्त्रामध्ये परत येतात तो त्यांच्या नजरेला पडली बॉंब वर्षावात उध्वस्त झालेली किंवा जाळपोळीने राख झालेली घरे. बातिस्ताला मनोमन शिव्या देत आणि संधी येईल तेव्हा सैनिकांशी लढण्याची मनोमन प्रतिज्ञा करीत त्यांनी त्या राखेवरच घरे बांधायला सुरुवात केली.

## १५. २६ जुलै चळवळीचे प्रभावी कार्य

२६ जुलै चळवळ कूबात व कूबाबाहेरही प्रभावी बनली होती. या चळवळीच्या २६ शाखा विविध अमेरिकी देशात प्रचारकार्यात गुंतलेल्या होत्या. बातिस्ताच्या जुलुमजबरदस्तीमुळे अमेरिकेत आश्रय घेतलेल्या कूबन्सकडून निधी जमवून कूबन क्रांतिकारकांना शस्त्रास्त्रे व इतर पुरवठा करीत होत्या. लॅटिन अमेरिकी देशातील क्रांतिकारी गटांबरोबर संपर्क साधून लढ्याची सांधेजुळणी करीत होत्या. नागरी प्रतिकार आंदोलन गावागावातील गटांमार्फत आपले प्रसारकार्य, निधी गोळा करणे, निरोपा–निरोपी व वस्तू पुरवणे असे कार्य करत होते. दहा–दहा जणांचा एकेक गट बांधून कामाची व्याप्ती ते वाढवत नेत. ट्रेड युनियन व विद्यार्थी संघटनेमार्फत भूमिगत केंद्रे स्थापन करण्यात आली होती व ते क्रांतिकारकांमध्ये भरती व अन्य मदत करीत होते. पोलीस व लष्करी जवानांकडून शस्त्रे पळवण्यासाठी छुपे हल्ले चालू होते. ओरतोदोस्तो पक्ष व कम्युनिस्ट पक्ष यांचा बातिस्ताविरोधी संघटना विस्तारण्यात मोठा वाटा होता. बातिस्ताविरोधी कारवाया वाढत होत्या, त्याबरोबर लष्कराची राक्षसी जुलूमजबरदस्तीही वाढत होती. केवळ संशयावरून मोठ्या संख्येने विद्यार्थी व चळवळे यांना तुरुंगात डांबून ठेवलेले होते. त्याविरोधात न्यायालयामार्गे दाद मागण्याचे जोरदार प्रयत्न चालू होते. बातिस्ताच्या मनमानी व क्रूर राजवटीमुळे उदारमतवादी बुद्धिमंत, व्यावसायिक, चर्च यांचाही बातिस्ता शासनाचा पाठिंबा मावळत चालला होता. व क्रांतिकारकांविषयीची सहानुभूती या वर्गातही वाढत होते. बातिस्ताची सेना ही केवळ भाडोत्री होती. क्रांतिकारकांनी जिवाच्या कराराने केलेल्या निकराच्या हल्ल्यांपुढे ती माघार घेत होती.

सिएर्रामध्ये दिवसेंदिवस बंडखोरांचा प्रभाव वाढत असतानाच शहरातील घातपाताच्या चळवळींनाही ऊत आला होता. २६ जुलै कार्यकर्त्यांनी हावानामधील एक पॉवर हाऊस उडवून लावले. दोन रात्र ही राजधानी अंधारात बुडून होती.

राजकीय पातळीवरही फिदेल कास्त्रोने आता आक्रमक धोरण स्वीकारले. बारा जुलै १९५७ रोजी त्याने सिएर्रा माएस्त्रामधून आपला पहिला जाहीरनामा प्रसिद्ध केला आणि बातिस्ता सरकार उलथून पाडण्यासाठी सर्वांना सहकार्य देण्याचे आवाहन केले.

जाहीरनाम्याचा भर होता सर्व क्रांतिकारी बंडखोर संघटना, नागरी संघटना व सर्व विरोधी राजकीय पक्ष यांची एक विस्तृत नागरी क्रांतिकारी आघाडी उभारण्यावर. लढ्याच्या यशस्वी पूर्ततेनंतर येणाऱ्या तात्पुरत्या सरकारसाठी अध्यक्षाची नेमणूक करणे, कोणताही लष्करी अंमल तात्पुरते सरकार म्हणून न स्वीकारणे, कूबातील अंतर्गत राजकारणात कोणत्याही परदेशाचा हस्तक्षेप न स्वीकारणे व लष्कराला राजकारणापासून अलग ठेवून एक वर्षाच्या आत निवडणुका घेणे हे जाहीरनाम्यातील प्रमुख मुद्दे होते. क्रांतीच्या यशानंतर नवे सरकार काय काय पावले टाकील याविषयीचेही ओझरते दिग्दर्शन या जाहीरनाम्यात होते. त्यातला महत्त्वाचा भाग होता शेती सुधारणेचा. सरकारी पडीक जमीनचे योग्य वाटप करणे, खंडकऱ्यांना व शेतमजुरांना मालकी हक्क देऊन अनधिकृत झोपडवासीयांना त्यांच्या जमिनीचा ताबा देणे हे मुद्दे त्यात आग्रहाने घालण्यात आले होते.

सशस्त्र चळवळीतील आणखी एक महत्वाची घटना म्हणजे ५ सप्टेंबर १९५७ चा शेनफुगो नाविक तळाचा उठाव. लष्करातील एका भूमिगत संघटनेने सर्व कूबन बेटभर एकदम लष्करी उठाव घडवून आणण्याची योजना आखली होती. ५ सप्टेंबर ही तारीख ठरविण्यात आली. पण ऐनवेळी उठाव स्थगित करण्यात आला. सर्वत्र तसे संदेश पाठविण्यात आले. शेनफुगो तळाला मात्र वेळेवर संदेश मिळाला नाही. निरोप मिळाला तेव्हा हालचालींना सुरुवात झाली होती व त्या परिस्थितीत उठाव थोपवून धरणे शक्य नव्हते. त्यामुळे शेनफुगोच्या गटाने उठाव तसाच पुढे नेण्याचे ठरविले.

उठाव तात्पुरता यशस्वी झाला आणि सबंध शहर क्रांतिकारकांच्या ताब्यात आले. २६ जुलैच्या कार्यकर्त्यांनीही उठवात भाग घेतला. परंतु क्रांतिकाराकांनी एक चूक केली. एकट्या शेनफुगो शहारातच उठाव झाला हे त्यांना कळून चुकले होते. त्यामुळे थोड्याच वेळात बातिस्ताचे सैन्य येऊन थडकेल याची त्यांना खात्री होती. अशा वेळी शस्त्रास्त्रे घेऊन जवळच्याच एस्कांब्रे पर्वताच्या जंगलांमध्ये शिरून तेथून गनिमी पद्धतीने आपला लढा चालू ठेवण्याचा प्रयत्न न करता शेनफुगो शहरातच रक्ताचा शेवटचा थेंब सांडेपर्यंत लढण्याचा त्यांनी निर्धार केला. परिणाम उघड होता. बातिस्ताचे सैन्य शेनफुगो शहराभोवती जमले व त्यांनी हल्ला चढवला. क्रांतिकारकांची भीषण कत्तल झाली.

**बंडखोर रेडिओ केंद्र** : २४ फेब्रुवारी १९५८. ६३ वर्षांपूर्वी याच दिवशी ओरिएन्ते प्रांतातल्या बैर

शहरातून स्वातंत्र्य लढ्याचा पुकारा झाला होता. २४ फेब्रुवारीला रात्री रेडिओवर अचानकच नवा आवाज आला. "बंडखोर रेडिओ केंद्र, आम्ही कूबातील मुक्त प्रदेश सिएर्रा माएस्त्रातून बोलत आहोत.' आवाज गप्प करण्याच्या बातिस्ताच्या प्रयत्नांवर मात करून कास्त्रो कूबन जनतेशी रेडिओवर संवाद साधू लागला. लढ्याची ध्येयधोरणे आणि क्रांतिकारी कार्यक्रम जनतेसमोर मांडून त्यांचा विश्वास वाढवू लागला.

**कास्त्रोचा जाहिरनामा** : १२ मार्च १९५८ रोजी कास्त्रोने जाहीरनामा काढून बातिस्ता हूकूमशाही उलथवून टाकणाऱ्या निकराच्या लढ्याचा पुकारा केला. सार्वत्रिक संप व लष्करी कारवाई अशी लढ्याची रणनीती होती. संपाचे नेतृत्व राष्ट्रीय कामगार आघाडी, राष्ट्रीय विद्यार्थी आघाडी, नागरी प्रतिकार आंदोलनाकडे होते तर २६ जुलै चळवळीच्या दलाकडे लष्करी उठावाचे नेतृत्व होते. १ एप्रिल १९५८ पासून करभरणाबंदी जाहीर केली होती. तर ५ एप्रिलपासून शासकीय, लष्करी किंवा न्यायिक पदावर राहाणे क्रांतिकारी शासनाने बेकायदा असल्याचे जाहीर केले.

**क्रांतिवीरांच्या आक्रमक मोहिमा** : सबंध १९५८ साल छोट्या–मोठ्या चकमकी, बातिस्ताच्या विमानदलाचे सिएर्रावर अव्याहत बॉम्बहल्ले, सैनिक आणि पोलिसांच्या अत्याचारांना ऊत, जाहीरनामे, प्रति जाहीरनामे, घोषणा अशा धामधुमीत गेले. बातिस्ताच्या लष्करी मोहिमांना तोंड देण्यासाठी गनिमी सैनिकांनीही आक्रमक मोहिमा सुरू केल्या. फिदेल कास्त्रो, चे गेवारा, राऊल कास्त्रो यांच्या नेतृत्वाखाली बंडखोरांच्या लहानशा फौजा वेगाने हालचाली करून लष्कराची त्रेधा उडवू लागल्या.

सार्वत्रिक संपाला मदत करण्यासाठी एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात फिदेलच्या गनिमी सैन्याने ठिकठिकाणी आक्रमक धोरण स्वीकारले. कॅमिलो शेनफुगोच्या तुकडीने ओरिएन्ते प्रांतातील बयामो गावाजवळ सिएर्रातून उडी घेतली आणि सैनिकी बराकीजवळ घातपाताचे सत्र आरंभिले. एप्रिल १ रोजी राऊल कास्त्रोच्या तुकडीने सिएर्रा दि क्रिस्तल येथपर्यंत धडक मारली आणि सिएर्रा माएस्त्रा व सिएर्रा दि क्रिस्तल यांना वेगळे करणाऱ्या खोऱ्यातून जाणाऱ्या टेलिफोनच्या विजेच्या तारा आणि रेल्वे लाईनी यांची नासधूस करण्यास प्रारंभ केला. देशातले वातावरण तंग होते. सार्वत्रिक संपाची अपेक्षा सर्वांनाच होती. फक्त दिवस माहिती नव्हता.

नऊ एप्रिलचा दिवस उजाडला. बरोबर अकरा वाजता हावानातील एक टेलिव्हिजन स्टेशन काबीज करून तेथून सार्वत्रिक संपाची घोषणा करायची व स्टेशन उडवून द्यायचे अशी योजना होती. ऐनवेळी टेलिव्हिजनवर घोषणा देण्याचा बेत फसला. ठिकठिकाणी गोळीबाराच्या फैरी ऐकू आल्या. थोड्या चकमकी, जीव घेऊन पळणारे तरूण आणि त्यांच्या मागे गोळ्या झाडत पाठलाग करीत असलेले पोलीस. अर्ध्या तासात हावानाच्या रस्त्यावर १४० तरुण मरून पडले. कोणीतरी पोलिसांना आधीच खबर दिली होती.

हावानातील संप फसला. इतर ठिकाणी मात्र बऱ्याच प्रमाणात संप यशस्वी झाला. विशेषत: जिथे

जिथे सपाट प्रदेशात फिदेलचे गनिमी सैन्य घुसले होते तिथे. परंतु योजनेप्रमाणे गनिमी सैन्य मैदानी प्रदेशात फार काळ राहाणार नव्हते. तीन चार ठिकाणी बातिस्ताच्या लष्करी तळावर जबरदस्त प्रहार करून आपल्या सामर्थ्याची चुणूक दाखवून बंडखोरांच्या तुकड्या लगेच जंगलात, पहाडात सुरक्षित स्थळी विजेच्या वेगाने परतल्या.

बंडखोरांना निपटून टाकण्याची अखेरची जोरदार मोहीम बातिस्ताने २४ मे १९५८ रोजी सुरू केली. आपली सर्व शक्ती त्याने या मोहिमेत ओतली. दहा हजाराचे सैन्य, विमाने, रणगाडे, रॉकेट्स, हाती येतील ती साधने त्याने वापरली. ही मोहीम कास्त्रोला अत्यंत कठीण गेली. बातिस्ताची तयारी पाहून कास्त्रोने दूर दूर गेलेल्या आपल्या तुकड्यांना सिएर्रा माएस्त्रात एकत्र केले. काही तुकड्या ओरिएन्ते प्रांताच्या अगदी दक्षिणेकडे घुसल्या होत्या. राऊल कास्त्रोची तुकडी सोडून सहा तुकड्या पिको तुर्कीनो या बंडखोरांच्या मुख्य तळाभोवती संरक्षणासाठी उभ्या ठाकल्या. या सहा तुकड्यांचे नेतृत्व होते स्वत: कमांडर फिदेल कास्त्रो आणि बाकीचे मेजर्स – अल्मेदा, कॅमिलो शेनफुगो, चे गेवारा, रामिरो वाल्देस आणि क्रेसेन्शो पेरेथ यांच्याकडे. तीस किलोमीटरची वर्तुळाकार साखळी  या तुकड्यांनी आपल्या मुख्य तळाभोवती धरली.

पिको तुर्कीनोच्या उतारावरील सान्तो दोमिन्गो या खेड्याजवळ लढाईला १९ जून रोजी तोंड लागले. चार दिवस घनघोर लढाई झाली. नंतर जोर कमी झाला.पण रोजची गोळागोळी सुरूच राहिली. विमाने येऊन बॉंब वर्षाव करून जात. परंतु तो जंगली प्रदेशच एवढा विचित्र होत की आपण नेमके कोणावर बॉंब टाकीत आहोत हे वैमानिकांना कळत नसे. २९ जूनला फिदेलने जोराची उचल घेऊन प्रतिहल्ला सुरू केला.

ही लढाई सबंध जून आणि जुलै महिनाभर चालू होती. पण एकदा सुरुवातीचा हल्ला पचवल्यावर कास्त्रोची ताकद वाढू लागली. कास्त्रोला जंगलाची आपल्या तळहातासारखी माहिती होती. आणि बातिस्ताच्या योजनेची खडा न् खडा माहिती मिळेल अशी व्यवस्था होती. या दोन्ही गोष्टी बातिस्ताच्या लष्काराजवळ नव्हत्या. लष्कर दूर दूर पसरले होते. विमानांचा आणि रणगाड्यांचा काहीच उपयोग होत नव्हता. पिछाडीहून येणारी रसद बंडखोर मोठ्या जिद्दीने आणि सातत्याने तोडत होते. बातिस्तांच्या सैनिकांचे रणधैर्य आधीच कमी. त्यात तहान–भूक, अनोळखी प्रदेश याने ते आणखीनच गर्भगळीत झालेले. ठार होणाऱ्यांची संख्या वाढू लागलेली. ऑगस्टच्या मध्यापर्यंत सिएर्राला वेढा घातलेल्या लष्कराचा नक्षा पार उतरला आणि सैन्य मागे परतले. क्रांतिकारकांनी ४४३ सैनिकांना कैद केले होते. त्यांना रेडक्रॉसच्या स्वाधीन केले. रणगाडे, मॉर्टर्स, तोफा, मशीनगन्स, बंदुका आणि दारूगोळा असा प्रचंड शस्त्रसंभार बंडखोरांच्या हाती पडला.

बातिस्ताचा सरळसरळ पराभव झाला होता. समोरासमोरच्या युद्धात फिदेलच्या छोट्याशा सैन्याने स्पष्ट विजय मिळवून आपले सामर्थ्य दाखवून दिले होते. फिदेलचा मार्ग स्पष्ट दिसत होता आणि

बातिस्ताच्या राजवटीचे भविष्य अटळ होते. जुलमी राजवट किती दिवस टिकणार एवढेच मोजायचे. परंतु बातिस्ताने अद्याप पराभव स्वीकारला नव्हता. अमेरिकन राजदूत अर्ल टी. स्मिथ यानेही वस्तुस्थितीकडे डोळेझाक केली होती. हावानामध्ये अमेरिकन दूतावासात बातिस्ताच्या भ्रष्ट पराभूत जनरल्स्ना अजूनही मेजवान्या दिल्या जात होत्या. खास शौर्य पदके दिली जात होती.

२० जुलैला सात क्रांतिकारी संघटनांची नागरी क्रांतिकारी आघाडी स्थापन करण्यात आली. कम्युनिस्ट पक्षानेही संपूर्ण शक्तीनिशी क्रांतिकारी लढ्यात उतरण्याचे ठरवले.

## १७. अखेरची चढाई

ऑगस्टमध्ये क्रांतिकारकांनी अखेरचा पवित्रा घेण्याचे ठरविले आणि योजना आखल्या. दूरवरच्या तीन महत्त्वाच्या ठाण्यांवर हल्ले करण्याचे ठरले. ओरिएन्ते प्रांतातील सांतिआगो–दे–कूबा, मध्य कूबातील सिएर्रा–दे–एस्कांब्रे जवळील लास विल्लास व कूबाच्या अगदी दुसऱ्या टोकाचे पिनार–देल–रियो. लास विल्लासवर चाल करून जाण्याची कामगिरी गेवारावर सोपविण्यात आली. पिनार–देल–रियो कॅमिलो शेनफुगोच्या तुकडीने घ्यायचे होते. लास विल्लासकडे जाताना कूबाच्या दोन भागांना जोडणारे सर्व रस्ते पद्धतशीरपणे तोडणे, वाटेत जे जे क्रांतिकारी गट सापडतील त्यांच्याशी संपर्क जोडणे व मुक्त झालेल्या प्रदेशात क्रांतिकारक सत्ता स्थापन करणे ही कामगिरी चे गेवारावर सोपवण्यात आली.

ऑगस्ट ३०, १९५८ रोजी चे गेवारा प्रत्येकी ऐंशी क्रांतिकारकांच्या दोन तुकड्या घेऊन लास विल्लासकडे निघणार होता. परंतु त्यांच्या ट्रक्ससाठी येणारे पेट्रोल शत्रूच्या हाती पडले. पुन्हा एकदा गेवाराची बंडखोर तुकडी पायावर आली. पुढचा सबंध शेकडो मैलाचा प्रवास त्यांनी पायी केला. ऑगस्ट–सप्टेंबरमधील हवामान अत्यंत वाईट होते. घनघोर वादळे आणि तुफान पाऊस. मोठे रस्ते तर टाळायचे होते. त्यामुळे नद्या, नाले, ओढे पार करत, दलदलीतून मार्ग काढीत जड शस्त्रास्त्रे, रॉकेटस् खांद्यावरून वाहून नेत पुढे जावे लागले. बंडखोरांच्या अपार नीतीधैर्याची ही अखेरची परीक्षा होती. ओरिएन्ते प्रांत ओलांडल्यावर नागरी वस्त्यांना टाळून जावे लागे. वाटेत विश्रांती घेणे मुष्कील कारण गस्तांचा भयानक सुळसुळाट. मध्ये एका ठिकाणी चुकून एका लष्करी तुकडीशी गाठ पडली आणि चकमक उडाली. दोन क्रांतिकारक ठार झाले. चे गेवारा आता ओरिएन्ते प्रांत सोडून लास विल्लासच्या दिशेने निघाला आहे ही माहिती शत्रुला कळली. तेव्हापासून शत्रू सैनिकही पाठीवर होते. बातिस्ताची विमानेही डोक्यावर घिरट्या घालू लागली. थोडे मोकळ्यावर आले की बॉंबवर्षाव. शत्रू सैनिकांशी चकमकी टाळणे अशक्य होते. अशा स्थितीत स्थानिक लोकांचा पाठिंबाच आश्रयाला होता. पण कधी कधी तेही लोक दगा देत. चकमकीमध्ये आणि बॉंबवर्षावात जखमी झालेल्या माणसांनाही बरोबर बाळगावे लागे. दलदलीमुळे अनेकांचे बूट फाटलेले. त्यामुळे अनवाणी चालावे लागले. पायांचे भयंकर रोग होऊ लागले आणि अशाही परिस्थितीत चालीचा वेग मंदावता येत नव्हता. कारण शत्रू पाठीवरच होता असे नव्हे तर चारी बाजूने होता.

अशा तऱ्हेने थकलेले, जर्जर झालेले आणि संख्येने कमी झालेले क्रांतिसैनिक अखेर सहा ऑक्टोबरला सिएर्रा दे एस्क्रांबेच्या एका सुरक्षित स्थळी पोचले आणि हा छोटासा "लाँग मार्च' संपुष्टात आला. हा मार्च हेही एक लोकविलक्षण धाडस होते आणि केवळ जिद्द आणि अपार मानसिक सामर्थ्य या जोरावरच क्रांतिकारक हे धाडस पूर्ण करू शकले. कॅमिलोच्या तुकड्याही आणखी पुढे पिनार-देल-रियो ला जाण्यासाठी तिथे येऊन पोचल्या. कॅमिलो फिदेलला लिहितो : "गेल्या एकतीस दिवसात आम्ही फक्त अकरा वेळा खाल्ले; एकदा तर घोड्याचे कच्चे मांस मीठाशिवायच खाल्ले.'

लास विल्लास प्रांतातील सिएर्रा एस्क्रांबे या पहाडीत पोचल्यावर चे गेवारा आणि कॅमिलो यांनी विश्रांती घेऊन हळूहळू आपल्या हालचालींना प्रारंभ केला.

तीन नोव्हेंबरला बातिस्ताने अध्यक्षीय निवडणुका घेण्याचे एक नाटक ठरवले होते. हे नाटक आहे हे साऱ्याच लोकांना माहीत होते. अध्यक्षीय उमेदवार होता बातिस्ताचा पित्तू डॉ. आंद्रे अगेरो. सत्ता अर्थातच बातिस्ताच्या हाती राहाणार होती. चे गेवाराच्या तुकडीकडे काम होते आजूबाजूच्या शहरांचे दळणवळण तोडणे आणि निवडणुकीविरुद्ध प्रचार करणे. विरोधी प्रचारामुळे निवडणुकांना मतदान फारच कमी होऊन निवडणुका म्हणजे खरोखरचा फार्स झाला. चे आणि कॅमिलो या दोघांच्याही सेनेची संख्या वाढली होती व क्रांतिकारकांच्या तुकड्या लास विल्लास प्रांतात सर्वत्र संचार करू लागल्या. शहराशहरातील २६ जुलैच्या कार्यकर्त्यांयना निवडून त्यांना तोडफोडींच्या कारवायांचे शिक्षण देण्यासाठी चे ने छोटी छोटी शिबिरे घेतली. जो तो तरुण आता डोंगराकडे धाव घेताना दिसू लागला होता. जनप्रक्षोभाला प्रचंड भरती आली होती आणि बातिस्ताचे दिवस भरत आले होते.

## १८. विजयाकडे आगेकूच

इकडे दक्षिणेकडे ओरिएन्ते प्रांतात फिदेल आणि राऊल कास्त्रोने आपापल्या तुकड्यांसह सात नोव्हेंबरला सांतिआगो-दे-कूबा शहरावर चाल करून जाण्यास सुरुवात केली. राऊलच्या फौजांची संख्या आता दोन हजारांवर गेली होती. शत्रूच्या खड्या फौजांना समोरासमोर तोंड देण्याची आता बंडखोरांची तयारी होती आणि सबंध जनमत त्यांच्या बाजूला होते व बातिस्ताच्या सैन्याचे मनोधैर्य एवढे रसातळाला गेले होते की, गोळागोळी सुरू होताच तासाभरातच सैनिक पाय काढू लागत. वाटेतली लहान-मोठी शहरे सहज काबीज करीत फिदेल आणि राऊल कास्त्रो वेगवेगळ्या दिशांनी सांतिआगोकडे चाल करीत होते. सांतिआगो काबीज करताच तात्पुरते सरकार स्थापन झाल्याची घोषणा करता आली असती. पण फिदेल सांतिआगोला पोचण्यापूर्वीच जर कोणी बातिस्ताच्या लष्कराचे कंबरडे मोडले असेल तर ते गेवाराने सान्ता क्लारा येथे.

नोव्हेंबर-डिसेंबरच्या दरम्यान गेवारा आणि कॅमिलो यांच्या तुकड्या फौजा म्हणवून घेण्याइतपत वाढल्या होत्या. लास विल्लास प्रांतातील जवळजवळ सर्व दळणवळण हळूहळू या दोघांनीही बंद पाडले होते. रस्ते तुटले होते, पूल पडले होते आणि टेलिफोनच्या तारा तुटल्या होत्या. रेल्वेरूळ ठिकठिकाणी

कापण्यात आले होते. लास विल्लास हा कूबाच्या मध्य विभागातील प्रांत.  त्यामुळे सबंध द्वीपाचे दोन तुकडे झाले. ओरिएन्ते प्रांताला मदत करण्यासाठी बातिस्ताजवळ हवाई किंवा नाविक मार्गाशिवाय दुसरा इलाज राहिला नाही. शत्रू बेजार झाल्याचे स्पष्ट दिसत होते. शत्रूसैन्यात प्रचंड गोंधळ उडाला होता. स्वत:ची कातडी वाचवण्याकडे सर्वांचे लक्ष लागले. एकमेकांना मदत करून संयुक्तपणे बंडखोरांना तोंड देण्याचे भानही लष्कराच्या वेगवेगळ्या तुकड्यांना राहात नव्हते.

अखेर चे गेवाराच्या फौजांनी लास विल्लासची राजधानी सान्ता क्लारा या दीड लाख लोकवस्तीच्या शहरावर मोर्चा बळावला. शहरातील २६ जुलैच्या कार्यकर्त्यांनी लष्कराला आधीच सळो की पळो करून सोडले होते. २९ डिसेंबर रोज्ी घनघोर लढाईला तोंड लागले. तिकडे सांतिआगो शहरालाही फिदेलच्या फौजांनी पक्का वेढा दिला होता.

सान्ता क्लाराचे संरक्षण मोर्चे पक्के होते. लष्कराजवळ रणगाडे होते. परंतु चे गेवाराने कडव्या क्रांतिकारकांची आत्मनाशी पथके तयार केली होती. सान्ता क्लारा भोवतालच्या मोर्चावर प्रथम या पथकातील जीवावर उदार झालेले तरुण त्वेषाने तुटून पडले. त्यांचा आवेश बघूनच सैनिक गर्भगळीत झाले. रेल्वे स्टेशन, पॉवर हाऊस, पोलिस स्टेशन – असे एकेक मोर्चे भराभरा क्रांतिकारकांच्या ताब्यात येऊ लागले. तीस डिसेंबरला सान्ता क्लाराचे रेडिओ स्टेशन पडले. चे गेवाराने मोठ्या अभिमानाने सारे सान्ता क्लारा क्रांतिकारकांच्या ताब्यात आल्याची रेडिओवर घोषणा केली. शहरातील बराकी पडू लागल्या.

असा पाडाव चालू असताना बातिस्ताचा एक जनरल हेलिकॉप्टरने फिदेलच्या भेटीसाठी आला. बातिस्ताचे दिवस संपले होते, त्याला आता फक्त जीव वाचवायचा होता. बातिस्ताला देशाबाहेर निघून जाण्याची सवलत दिली व लष्कराची रचना कायम ठेवण्याचे फिदेलने आश्वासन दिले तर बातिस्ता रक्तपात टाळण्यासाठी युद्ध थांबवायला तयार आहे, असा निरोप जनरल कँतिलोने आणला होता. फिदेलला अर्थातच या दोन्हीही अटी अमान्य होत्या. लॅटिन अमेरिकेतील लष्करे किती भ्रष्टाचारी आहेत हे त्याला चांगले ठाऊक होते आणि बातिस्ताला तर त्याला न्यायासनासमोर खेचायचे होते.

चे गेवाराचा सान्ता क्लाराच्या मध्यभागी असलेल्या पक्क्या किल्ल्याला वेढा पडला असतानाच आतील अधिकाऱ्यांनी शरणागती पत्करली. पण शस्त्रे टाकण्यास ते टाळाटाळ करू लागले. इकडे फिदेलने चे गेवाराला हावानावर चाल करून जाण्याचा संदेश दिला. पण चे गेवारा हावानाकडे वळण्यापूर्वीच त्या राजधानीत एक वेगळेच नाटक घडत होते.

एक जानेवारी १९५९ च्या पहाटे दोन वाजता हावानाजवळ कँप कोलंबिया विमानतळावर एकच गर्दी उडाली होती. गेवारा हावानावर चाल करून येत असल्याच्या बातम्या थडकल्या तेव्हा बातिस्ताचा सर्व परिवार आपापल्या बॅगा, नोटांनी भरलेल्या ट्रंका, जडजवाहीर घेऊन विमानतळावर हजर होता. अनेक

बडे लष्करी अधिकारीही सहकुटुंब हजर होते. उड्डाणासाठी अमेरिकन विमाने जय्यत तयार होती. बातिस्ताने सारे लष्करी अधिकार जनरल कॅतिलोकडे सुपूर्द केले. तो विमानात बसला व विमानाने डोमीनिकन रिपब्लिकच्या दिशेने झेप घेतली. बातिस्ताची जुलुमी राजवट संपली होती.

बातमी शहरात पसरताच हावानातील लोक आनंदाने जल्लोष करीत रस्त्यावर आले. द्युतगृहे, पोलीस स्टेशन्स, फॅशनेबल क्लब्स् यांच्या जाळपोळीला सुरुवात झाली.

बातिस्ताने पलायन केल्याची बातमी कास्त्रोला सकाळी ९ वाजता मिळाली. खरे म्हणजे बातमी आनंदाची होती. पण फिदेल अस्वस्थपणे येरझारा घालत होता. बातिस्ता पळो वा न पळो, क्रांती यशस्वी होणारच होती. आता बातिस्ता आणि त्याच्या भोवतीचे टोळके पळून गेले होते. त्यांना शिक्षा करता येणार नव्हती आणि बातिस्ताने जनरल कँतिलोला पित्तू नेमले होते. लष्करावर अद्याप त्याचाच ताबा होता.

ताबडतोब त्याने सर्वत्र क्रांतिफौजांना संदेश धाडले. लढाई चालू ठेवा. लष्कराची संपूर्ण शरणागती पत्करा. हावानातून काहीही बातमी येवो. त्याचबरोबर त्याने सर्वत्र नागरी संपाचीही हाक दिली. पण नासधूस न करण्याचे लोकांना आवाहन केले. आणि स्वत:च्या फौजांना आज्ञा सोडल्या – "सांतिआगो चलो'.

क्रांतिसैन्याच्या जोरापुढे आणि नागरी संपाच्या दहशतीमुळे सर्वत्र लष्करी तुकड्या आता भराभर शरण येऊ लागल्या. फिदेल कास्त्रो दोन जानेवारी रोजी सांतिआगो शहरात शिरला. शहरातील सारे पावणेदोन लाख लोक त्याचे स्वागत करण्यासाठी रस्त्यावर आले. बंदुकीची एकही गोळी न झाडता मोनकादो बराकी शरण आल्या. कास्त्रोचा तो मोठा भावरम्य, वचनपूर्तीचा क्षण होता.

त्या दिवशी पहाटे दीड वाजता फिदेलने सांतिआगो शहरातील प्रचंड गर्दीपुढे त्या ऐतिहासिक मोनकादो बराकीतील एका उंच चौकीवरून आवेशपूर्ण भाषण केले. फिदेलने आपले वचन पूर्ण केले होते. "स्वातंत्र्य मिळवू किंवा हूतात्मे होऊ.'

बरोबर पाच वर्षे, पाच महिने आणि सात दिवसांपूर्वी फिदेलने वयाच्या सत्ताविसाव्या वर्षी बातिस्ताची जुलुमी राजवट उलथून पाडण्याच्या ईर्षेने याच मोनकादो बराकींवर हल्ला केला होता. तेव्हा त्याच्याबरोबर उणेपुरे दोनशे जवान होते. हल्ल्यातून अवघे सत्तर जवान वाचले होते. तीन वर्षांनंतर ब्याऐंशी क्रांतिकारकांसह मेक्सिकोतून कूबाच्या किनाऱ्यावर फिदेल उतरला. पहिल्याच दिवशी शिरकाण होऊन त्यातले अवघे एकवीस बंडखोर सिएर्रा माएस्त्रात शिल्लक राहिले. या एकवीसजणांनीच पंचवीस महिन्यांच्या अवधीत आपली ताकद बरीच वाढवली आणि आम जनतेच्या पाठिंब्याच्या जोरावर बातिस्ताच्या तीस हजार संख्येच्या सुसज्ज सैन्याचा पराभव केला होता ! विजयाचा आणि वचनपूर्तीचा क्षण यापेक्षा किती अधिक नाट्यमय असू शकेल?

सांतिआगो शहर ताब्यात घेतल्यावर फिदेलला हावानाला जाण्याची आता घाई नव्हती. आपल्या

एक हजार फौजेसह आठशे मैलांवरील हावानास जाण्यासाठी कास्त्रो मजल दरमजल करीत निघाला. आपल्या मागे गर्दी खेचत, भाषणे देत, कूबा, नवा कूबा कसा असेल याविषयीची आपली स्वप्ने लोकांना सांगत तो निघाला. लोक त्याच्याशी हस्तांदोलने करीत होते, त्याला मिठ्या मारीत होते, जयजयकार करीत होते. कूबात आता नव्या युगाचा उदय झाल्याचे स्पष्ट दिसत होते. फिदेल कूबाचा नवा नेता होता.

इकडे क्रांतिसैन्याने सारी शहरे ताब्यात घेतली होती. फिदेलने डॉ. मॅन्युअल उरुती यांची अध्यक्षपदी आधीच नेमणूक केली होती. प्रधानमंत्र्याची आणि इतर मंत्र्यांचीही नेमणूक झाली. क्रांती यशस्वी झाली होती.

परंतु आता फिदेल कास्त्रोची भूमिका काय होती ? तो स्वत:ला फक्त क्रांतिसैन्याचा प्रतिनिधी म्हणवून घेत होता. राजकीय सत्तेविषयी थोडीदेखील आस्था दाखवत नव्हता आणि अपार प्रसिद्धीच्या झोतात अगदी धिमे धिमे हावानाच्या दिशेने मजल मारीत होता. अखेर तो हावानाला पोचला तेव्हा त्याचे देवदुर्लभ स्वागत झाले. हावानातील जनता त्याला भेटायला उत्सुक झाली होती. राजवाड्यातील एका गच्चीवरून त्याने छोटेसे भाषण केले. आपल्या आयुष्यातील सर्वात महत्त्वाचे भाषण त्याने कँप कोलंबियातील (बातिस्ता राजवटीचे प्रतीक) प्रचंड गर्दीपुढे करण्यासाठी राखून ठेवले होते.

राजवाड्यातून फिदेल जेव्हा कँप कोलंबियात पोचला तेव्हा गर्दीतून कबुतरांचे थवेच्या थवे आकाशामध्ये सोडून देण्यात आले. त्यातले एक कबुतर दाढीवाल्या फिदेलच्या खांद्यावर बसले तेव्हा गर्दीने त्याच्या नावाचा एकच जल्लोष केला. जुलूम जबरदस्तीने बेजार झालेल्या कूबामध्ये आता नवे, शांतीचे, न्यायाचे आणि समृद्धीचे युग उजाडत असल्याचे ते सुचिन्हच लोकांना वाटले.

भाग – २

# कूबाची समाजवादी समाजनिर्मितीकडे वाटचाल

## १. क्रांतिकारी शासनाची स्थापना

कूबाला अमेरिकेची वसाहत बनवून अमेरिकन कंपन्या व त्यांचे हस्तक कूबन जमीनदार हे कूबन जनतेची ५० वर्षे अमर्याद लूट आणि क्रूर दडपणूक करीत होते. हे गुलामीचे जोखड झुगारून टाकण्यासाठी कूबन जनतेने क्रांतिकारी लढा दिला व १ जानेवारी १९५९ रोजी कूबामध्ये बातिस्ताची हूकुमशाही उलथवून फिदेल कास्त्रोच्या नेतृत्वाखाली क्रांतिकारी शासन सत्तेवर आले. त्याचे जनतेने अभूतपूर्व स्वागत केले. हूकुमशहा बातिस्ता व त्याचे सगेसोयरे यांनी कूबातून पलायन करून अमेरिकेत आश्रय घेतला. क्रूर, जुलुमी हूकूमशाही नेस्तनाबूत केल्यावर न्याय्य–लोकशाही शासनाची स्थापना, जनतेची कत्तल करणाऱ्या सत्ताधाऱ्यांना शिक्षा आणि शेतकऱ्यांना जमीन वाटप याचे आश्वासन क्रांतीच्या नेत्यांनी दिलेले होते. हजारो निरपराध शेतकरी, स्त्रिया, विद्यार्थी यांचे निर्घृणपणे खून पाडणारे जमीनदार, लष्करी अधिकारी, सैनिक, पोलीस व बातिस्ताचे जुलमी सहकारी (जे कूबातून पळून गेले नव्हते) यांची जनता न्यायालयात जाहीर चौकशी करण्यात आली व खुनी गुन्हेगारांना फाशीची शिक्षा फर्मावण्यात आली. तेव्हा अमेरिकेने "मानवी हक्कांची पायमल्ली' अशी ओरड सुरू केली. हेच अमेरिकी शासन उघडपणे बातिस्ताच्या अनामुष राजवटीला उचलून धरून हजारो निरपराध कष्टकऱ्यांचे खून पाडण्यास उत्तेजन देत होते, तेव्हा मानवी हक्काची त्यांना आठवणदेखील झाली नव्हती.

क्रांतिकारी सरकार स्थापन झाले ते जनतेला लोकशाही हक्क, जगण्याचा हक्क, कामाचा हक्क मिळवून देण्यासाठी. राष्ट्राची सारी निसर्गसंपत्ती व उत्पादनाची साधने हडप करून ताब्यात घेतलेली होती बड्या अमेरिकी कंपन्यांनी आणि कूबन जमीनदारांनी. अमेरिकन कंपन्यांनी हडप केलेली हजारो हेक्टर जमीन सरकारजमा करून शेतजमिनीचे वाटप सुरू केल्यावर तर अमेरिकेने खवळून कूबाची पुरी आर्थिक नाकेबंदी करण्यासाठी कूबातील साखर आयात बंद केली. अमेरिकेबरोबरच्या साखर व्यापारावर कूबाची अर्थव्यवस्था पूर्णपणे अवलंबून असल्याने या कोंडीतून सुटण्यासाठी सोविएत युनियन व अन्य समाजवादी देशांशी व्यापारकरार करून कूबन सरकारने मार्ग काढला. हा निर्णय सोपा नव्हता. कारण अमेरिकेच्या प्रसार यंत्रणेच्या पकडीमधील कूबामध्ये अमेरिकेने कम्युनिस्ट द्वेषाचा प्रचंड वर्षाव केलेला असल्याने कूबामध्ये कम्युनिस्ट देशांबाबत पूर्वग्रहदूषित वातावरण होते. क्रांतिकारी लढ्यातील जिवंत अनुभवातून गेलेले तरूण वीर क्रांतिकारी विचारसरणी आत्मसात करू शकले होते पण ते मोजकेच होते. आमजनतेने हूकूमशाही नष्ट करायला आपापल्यापरीने मोठी मदत केली असली तरी त्यांचे प्रदीर्घ लढ्यातून होते तसे राजकीय शिक्षण झालेले नव्हते. त्यामुळे कम्युनिझमचा खरा अर्थ जनता जाणत नव्हती व कम्युनिझमविरोधी कलुषित वातावरण होते. तसेच क्रांतीनंतर न्याय्य समाज–अर्थव्यवस्था

उभारण्यासाठी खाजगी मालकीहक्क संबंधातील आमूलाग्र बदल आणि या स्थित्यंतरासाठी जनतेने केवढी जबाबदारी घ्यायला हवी व त्यागाचीही तयारी ठेवायला हवी, याबाबतची व्यापक जाण नव्हती. क्रांतीनंतरच्या नव्या शासनाकडून अपेक्षा मात्र खूप उंचावलेल्या होत्या. फिदेल, चे गेवारा आदी नेत्यांनी लोकविलक्षण धडाडी, संघटन–कसब व त्यागाच्या बळावर क्रांतिकारी लढा यशस्वी केला होता. त्यामुळे जनतेच्या दृष्टीने फिदेल हा महान नेता बनला आणि समाजाच्या प्रगतीची धुरा त्यानेच सांभाळावी ही जबाबदारी त्याच्या खांद्यावर येऊन पडली. जनतेला ताठ मानेने "जगण्याचा हक्क' मिळवून देण्यासाठी उत्पादनांच्या साधनांचे राष्ट्रीयीकरण, नफेखोरीचे उच्चाटन व नियोजन आणि कम्युनिस्ट राष्ट्रांची मदत घेणे अनिवार्य होते.

कूबातील क्रांतीमध्ये सहभागी झालेले सर्व राजकीय पक्ष, चर्च, मध्यमवर्गीय हे सारे समाजसत्तावादी परिवर्तनाला अनुकूल होते असे नाही. प्रारंभीच्या काळात शासन संस्थेमध्ये कम्युनिस्टांपासून जनता पक्षापर्यंत सर्वांना प्रतिनिधित्व होते. परंतु हळूहळू धोरणात्मक मतभेद पुढे येऊ लागले. चर्च, मध्यवर्गीय यांना कारखाने, व्यापार यांचे राष्ट्रीयीकरण मान्य नव्हते. तेव्हा अनेक मध्यमवर्गीय कूबा सोडून गेले आणि शासन संस्थेचा चेहरा बदलत जाऊन जनतेच्या आकांक्षापूर्ती करू शकणारे समाजसत्तावादी सत्तेवर राहिले.त्यांनी क्रांतीकारी धोरणांचा पाठपुरावा केला.

कूबाला नेस्तनाबूत करण्याच्या अमेरिकेच्या धोरणामुळे सोविएत युनियनकडून लष्करी मदत घेणेही अपरिहार्य झाले. कूबा व समाजसत्तावादी देश अधिकाधिक जवळ आले. अमेरिकेच्या षड्>यंत्री कारवायांमुळे जनतेमध्ये अमेरिकाविरोध वाढून कम्युनिझमबाबतची प्रतिकूलता कमी झाली.

१५ एप्रिल १९६१ च्या हावाना येथे भरलेल्या दहा लाखांच्या विराट सभेत कूबाचे नेते फिदेल कास्त्रो यांनी घोषणा केली, ""कूबा हे समाजसत्तावादी राष्ट्र आहे. यापुढे राष्ट्रविकासासाठी आम्ही समाजवादाच्या रस्त्याने जाणार! प्रत्यक्ष अनुभवानेच आम्हाला हा मार्ग घेण्यास उद्युक्त केले आहे. आजपर्यंत जगात तेरा समाजसत्तावादी राष्ट्रे होती. आता आम्ही चौदावे समाजसत्तावादी राष्ट्र म्हणून मोठ्या अभिमानाने समाजसत्तावादी राष्ट्रांच्या समूहात प्रवेश करीत आहोत. समाजसत्तावादाचा विजय असो!''

""**समाजसत्तावादी कूबा चिरायू होवो!**''

देशातील नैसर्गिक संपत्ती व उत्पादनाची साधने याचा वापर जनहित विचारात घेऊन करण्यासाठी क्रांतिकारी शासनाने नियोजनाची कास धरली. खाजगी मालकीहक्क नष्ट करून आर्थिक विकासाचा पाया तयार झाला तरी समाजवादी धोरणे प्रत्यक्ष राबवण्यासाठी अन्य आवश्यक घटक म्हणजे उच्चशिक्षित तंत्रज्ञ, विशेषज्ञ, व्यवस्थापक, लोकाभिमुख शासकीय यंत्रणा आणि कामगार–शेतकरी–कर्मचारी यांचा उत्स्फूर्त सहभाग. क्रांतीनंतर अनेक तंत्रज्ञ व अधिकारी देश सोडून गेल्याने विशेषज्ञांची मोठी कमतरता भासू लागली. नोकरशाही चौकट कशी बदलायची हा यक्षप्रश्न होता.

कष्टकऱ्यांच्या सहभागासाठी श्रेणीबद्ध व्यवस्थापकीय यंत्रणा व निर्णयप्रक्रिया आमूलाग्र बदलणे महत्त्वाचे होते. त्यासाठी नवा संस्थात्मक पाया घालणे, लोकांचे शिक्षण, कसब व कुवत वाढवणे आणि आजवर गुलामीच्या जोखडाखाली बांधलेल्या परावलंबी जनतेला जबाबदारी घेण्यास तयार करणे गरजेचे होते. ही प्रक्रिया काहीशी दीर्घकालीन होती. लोकसहभागी व्यवस्थापनासाठी पुढाकार घेण्यात नोकरशाहीला रस नव्हता. जनतेचे राजकीय शिक्षण, कुवत व कसब जबाबदारी घेण्याएवढे वाढलेले नव्हते. अशा सर्व अडचणींनी घेरल्यामुळे फिदेल कास्त्रोनी त्यातून मध्यम मार्ग काढण्याचे ठरवले. त्याने स्वत:च प्रत्यक्ष लोकांशी संवाद साधण्याची, त्यांचे प्रश्न समजून घेऊन त्याप्रमाणे धोरणांना आकार देण्याचा आणि प्रांजळपणे लोकांपुढे अडचणी मांडण्याची पद्धत स्वीकारली. क्रांतीनंतर ४० वर्षांनतरही फिदेल कास्त्रो याच पद्धतीने लोकांबरोबर विचारविनिमय करीत आहे. कूबाच्या शासनव्यवस्थेत कम्युनिस्ट पार्टी, पार्टीची मध्यवर्ती समिती, कास्त्रो व अन्य नेते यांना निर्णायक स्थान आहे. समाजवादी समाजउभारणीच्या दिशेने परंतु प्रत्यक्षात उभ्या राहाणाऱ्या नव्या बिकट समस्यांना तोंड देत, तडजोडी करत ते धोरणे ठरवीत आहेत. त्यांची अंमलबजावणी करण्यात नोकरशाही चौकटीमुळे अडचणी येत आहेत. प्रलयंकारी संकटांमुळे कूबामध्ये सतत आणीबाणीचीच परिस्थिती आहे. तरीही जनतेच्या व नेत्यांच्या असीम त्यागामुळे व समाजवादी समाजनिर्मितीच्या जाज्वल्य ईर्षेमुळे कूबा समाजवादाची कास धरून आहे.

### २. अमेरिकेच्या अघोरी हल्ल्यांशी दोन हात

अमेरिकेने कूबाची आर्थिक नाकेबंदी केली एवढेच नव्हे, तर घातपाती कारवाया, बॉंब हल्ले व प्रत्यक्ष लष्करी कारवायाही सुरू केल्यामुळे नव्या शासनाला षड्>यंत्री व क्रांतीविरोधी कारवायांबाबत अधिक दक्ष व कडक भूमिका घेणे भाग होते. मालमत्ताधारी श्रीमंत वर्ग व उच्चशिक्षित, व्यावसायिक व अधिकारी वर्गाचा अर्थातच क्रांतिकारी शासनाला विरोध होता. त्यामुळे या वर्गातले अनेक संपत्तीधारी अमेरिकेत स्थलांतरित झाले. अमेरिकन साम्राज्यवाद्यांशी हातमिळवणी करून क्रांतीविरोधी कारवायात सामील झाले.

कूबावर अज्ञात विमाने अज्ञात स्थळांहून येऊन भुरटे हल्ले करू लागली. त्यांनी उसाची शेते$आगलावे बॉंब टाकून बेचिराख केली. शहरांवर हल्ले करून गरीब बालबालिकांचे बळी घेतले. साथी फैलावून डुकरे, गुरे यांचा बळी घेतला.

आणि कूबा ह्या भुरट्या हल्ल्यांविरुद्ध दंड थोपटून उभा राहिला. काही विमाने पाडण्यात आली. विमानांच्या अवशेषांवरून आणि वैमानिकांच्या खिशात सापडलेल्या कागदपत्रांवरून ती विमाने अमेरिकन होती आणि अमेरिकेतील विमानतळांवरून निघाली होती, हे स्पष्ट झाले. कूबाने तक्रार केली, युनोत तक्रार नेली. पण अमेरिकन सरकारने कानावर हात ठेवले. क्रांतिकारी शासन उलथवण्यासाठी अमेरिकेने कास्त्रो आणि इतर नेत्यांच्या खुनाचे प्रयत्न केले. सी.आय.ए.नेच अमेरिकी विमान अथवा

जहाज उडवून किंवा कूबन निर्वासित घेऊन अमेरिकेकडे चाललेले जहाज बुडवून या घातपाताचा ठपका कूबन शासनावर ठेवून ते निमित्त करून कूबावर सरळ लष्करी हल्ला करण्याच्या योजना आखल्या. अमेरिकेत आश्रय घेतलेले कूबन जमीनदार, व्यापारी, बँकर, राजकीय पुढारी व बातिस्ता सेनेतील अधिकारी व सैनिक यांच्याशी संधान बांधून त्यांच्या साहाय्याने कूबात "प्रतिक्रांतिकारक' उठाव करण्याचा कट रचला.

**बे ऑफ पिग्ज – अमेरिकेची नाचक्की** : १७ एप्रिल १९६१ रोजी अमेरिकन जहाजातून, अमेरिकन वायुदलाच्या संरक्षणाखाली, अमेरिकन शस्त्रास्त्रांनी सज्ज झालेली, अमेरिकेमध्ये अमेरिकन लष्करी तज्ज्ञांच्या हाताखाली शिक्षण घेतलेली, अमेरिकन भांडवलदारांचे बूट चाटणारी, "महान क्रांतिकारक कूबन दले' गुप्तपणे कूबाच्या किनाऱ्यावर उतरविण्यात आली. "कूबन जनतेवर दडपशाही करणाऱ्या कम्युनिस्टधार्जिण्या कास्त्रोला कंठस्नान घालून कूबन जनतेच्या हितकर्त्याला – बातिस्तासाहेब किंवा तसल्याच कुठल्यातरी लष्करशहाला गादीवर बसविण्याच्या उच्च हेतूने(!) प्रेरित होऊन', ही मंडळी कूबाच्या किनाऱ्यावर उतरली.

परंतु दक्ष ग्रामीण सेनांनी  हे आक्रमण थोपवून धरले. लगोलग हावानाहून रणगाडे व लष्करी कुमक आली. कूबन विमानांनी बोटीवर बाँबवर्षाव सुरू केला. आक्रमकांजवळ १६ अमेरिकी विमाने होती. पण ती दूरवरून निकरागुवाहून येत आहेत असे नाटक वठवले जात असल्याने त्यांचा फारसा उपयोग झाला नाही.  ही सहा हजार महान "क्रांतिकारकांची' फौज अवघ्या तीन दिवसात धुळीस मिळाली. डुक्कर उपसागराच्या (Bay of Pigs) किनाऱ्यावर उतरलेल्या या डुकरांना पकडून त्यांची कोंडवाड्यात रवानगी करण्यात आली.  कित्येक महिने जय्यत तयारी करून पैसा आणि जहाजे–विमाने व शस्त्रास्त्रे पुरवून कूबावर हल्ला करणाऱ्या अमेरिकन "सामर्थ्या'चा साफ फज्जा उडाला.

**कूबा अण्वस्त्रसज्जतेकडे** : कूबातील क्रांतिकारी शासन नष्ट करण्यासाठी अमेरिका कोणत्याही थरापर्यंत जात असल्याने संरक्षणासाठी अधिक जोरदार तयारी कूबाने सुरू केली. सोविएत युनियनशी संरक्षणाच्या प्रश्नावर चर्चा सुरू झाली. तेव्हा संरक्षणाचा खात्रीशीर उपाय म्हणजे अण्वस्त्रधारी सोविएत युनियनने भूमिका घ्यायची की कूबावरचा हल्ला म्हणजे सोविएत युनियनवरचाच हल्ला मानला जाईल. यासाठी कूबामध्ये अण्वस्त्रधारी अग्निबाणांचा तळ उभारण्याचा निर्णय घेण्यात आला. कूबामध्ये मिग विमाने, युद्ध नौका, विमानवेधी अग्निबाण व शस्त्रास्त्रे दाखल झाली. अण्वस्त्र तळाची बांधणी सुरू झाली. अणुबाँब वाहून नेणारी बाँबर्स, अग्निबाण अशी अण्वस्त्र सज्जता अमेरिकेच्या प्रांगणात सुरू झाल्यावर अमेरिका हादरली. केनेडींनी सोविएत युनियनला क्षेपणास्त्रे ताबडतोब हलविण्याचा इशारा दिला.

अमेरिकन नौदलाने कूबापासून आठशे मैलाच्या अंतरावर एक साखळी निर्माण करून सोविएत जहाजे रोखण्यास प्रारंभ केला आणि ख्रुश्चोवने कूबातून क्षेपणास्त्रे काढून घेण्याचा निर्णय जाहीर केला. ""कूबाचे संरक्षण करण्यासाठी कूबामध्ये अण्वस्त्रे नेल्यामुळे अणुयुद्ध दाराशी आले असे अमेरिकेला

वाटेल आणि सतत अणुयुद्धाची धमकी देणाऱ्या अमेरिकेला अणुयुद्धाचे गांभीर्य उमगेल असा आमचा तळ उभारण्यात हेतू होता'', असे ख्रुश्चोवने डिसेंबरमध्ये सुप्रीम सोविएतपुढे भाषण करताना सांगितले. अण्वस्त्रयुगात सोविएत छत्रावर विसंबून राहाण्याच्या मर्यादा कूबाला कळून चुकल्या.

**या प्रसंगातून कास्त्रोच्या संपूर्ण स्वायत्त अशा संरक्षण धोरणाचा उदय झाला**. त्यानुसार सर्व जनतेची कूबाच्या रक्षणासाठी सतत सज्जतेत राहाण्याची तयारी करण्यात आली. आम जनता दक्ष असल्यामुळे अमेरिकेच्या षड्>यंत्री कारवाया चटकन उघडकीस आणणे सहज शक्य होते. त्यामुळे मोठ्या घातपाती कारवाया, नेत्यांचा खून वा लष्करी आक्रमण अमेरिकेला शक्य झाले नाही. पण अशी दक्ष व्यवस्था निर्माण करण्यासाठी कूबन जनतेला मोठी किंमत द्यावी लागली. कारण सी.आय्.ए.ने कूबातील डोंगराळ–आडविभागात विशेषत: लास विल्लास व पिनार देल रिओ या जिल्ह्यातून मोठ्या जमीन मालकांना हाताशी धरून क्रांतिविरोधी बंडाळी व घातपात करण्यासाठी पैसा व शस्त्रे पुरवून गुंडटोळ्या उभ्या केल्या. शेतकऱ्यांना सतावून त्यांना धाकदपटशाने किंवा फसगतीनेही अशा टोळ्यात सामील करूनत्या टोळ्या धुमाकूळ घालू लागल्या. त्यांचा बिमोड करण्यासाठी टोळ्यांमध्ये सामील झालेल्या शेतकऱ्यांनाही अटक करून तुरुंगात रवानगी करण्याची वेळ आली. अशा शेतकरी कुटुंबांची वाताहात टाळण्यासाठी त्यांच्या कुटुंबियांना सांभाळणे, त्यांचे प्रशिक्षण करणे हे जिकीरीचे व खर्चिक काम शासनावर येऊन पडले. सी.आय्.ए.च्या संचारामुळे अविश्वास पेरला जाऊन कुटुंबस्वास्थ्य व समाजस्वास्थ्यालाही मोठा धक्का पोचत राहिला आणि राजकीय कैद्यांचा प्रश्न जाचत राहिला व त्यापायी नाहक खर्चाचा बोजा पडला.

सत्ताधारी, संपत्तीधारी, सधन वर्गातले कूबन अमेरिकेमध्ये आश्रयासाठी गेले. कूबातील जुलूमजबदरस्तीची (त्यांच्या मालमत्तेचे राष्ट्रीयीकरण झाले होते) अतिरंजित, खोटी चित्रे ते अमेरिकेत रंगवत. परंतु त्यांनी श्रमिकांना लुबाडून जमवलेल्या संपत्तीचा वापर क्रांतिकारी राजवटीने जनतेला काम, किमान वेतन, शिक्षण, आरोग्य सुविधा पुरवण्यासाठी केला. लोकसहभागाने व सहमतीने विकासाचे निर्णय होत होते. त्यामुळे अमेरिका किंवा अमेरिकेत परागंदा झालेल्या कूबन धनिकांच्या म्हणजेच जनतेच्या शत्रूच्या कारवायांना जनता प्रतिसाद देणे शक्यच नव्हते. उलट सततचा अपप्रचा◌ार, आर्थिक नाकेबंदी व अतिक्रमणे यामुळे कूबातील अमेरिकाविरोध वाढलाच. जनता एकदिलाने नवसमाजनिर्मिती व त्यांच्या रक्षणासाठी सज्ज राहिल्यानेच अण्वस्त्रधारी अमेरिकेच्या प्रांगणात असूनही कूबामध्ये समाजवाद मूळ धरू शकला व टिकला.

**कूबाची अमेरिकेला धडकी** : अमेरिकेसारख्या महाबलाढ्य अण्वस्त्रधारी देशावर कूबा या छोट्याशा देशाला इतके टरकून राहाण्याची पाळी कां आली? कूबातील क्रांतिकारक शासन उलथून टाकण्यासाठी अमेरिकेने आकांडतांडव कां केले? एक तर अमेरिकन बड्या कंपन्यांची कूबात मोठी गुंतवणूक होती व कूबाची लूट करून अमेरिकन उद्योगपती, व्यापारी आपल्या तुंबड्या भरत होते. क्रांतीमुळे त्यांनी हे

चराऊ कुरण गमावले होते. दुसरे, कूबाप्रमाणे अन्य दक्षिण अमेरिकी देशांमध्येही अमेरिकन कंपन्यांची मोठी मालमत्ता होती व जुलूमी हूकुमशाहांना हाताशी धरून या देशांचीही नागवणूक अमेरिका करीत होती. कूबाप्रमाणेच बोलीविया, अज~तिना, निकारागुआ, मेक्सिको आदी देशांत असंतोष खदखदत होता. क्रांतिकारी लढे उभे राहात होते. कूबाचा क्रांतिलढा व त्यात मिळवलेले अभूतपूर्व यश याने अन्य क्रांतिलढ्यांना स्फूर्ती मिळत होती. याशिवाय समाजवादी कूबा क्रांतिकारकांना साहाय्य देऊन त्यांचे बळ वाढवत होता. या देशांमधून क्रांती यशस्वी होण्याची शक्यता कूबातील समाजवादाच्या यशस्वी वाटचालीमुळे वाढत होती. क्रांती झाल्यास अमेरिकन कंपन्या मोठी चराऊ कुरणे गमावणार होत्या. तिसरे, खुद्द अमेरिकेमध्ये निग्रो, विद्यार्थी, स्त्रिया, कामगार व अन्य चळवळींनाही कूबा चालना देत होता. अमेरिकन साम्राज्यशाहांना कूबा खंबीरपणे टक्कर देतो ही गोष्ट विशेषत: बे ऑफ पिग्जचा पराभव अमेरिकेला नामुष्कीचा वाटत होता. त्यामुळे कूबाला नेस्तनाबूत करण्याचा अमेरिकेने विडा उचलला होता. पण अमेरिकेच्या दादागिरीपेक्षा कूबन जनतेचा व फिदेलसारख्या क्रांतिकारक नेतृत्वाचा समाजसत्तावादंी समाज उभारण्याचा निग्रह व आत्मविश्वास वरचढ ठरला. त्या मनोनिग्रहाच्या जोरावरच कूबा आजही टिकून आहे.

अमेरिकेच्या ५५ वर्षांच्या अधिराज्याच्या काळात अमेरिकेने कूबाची काय अवस्था करून टाकली होती? स्वतंत्र कूबाचा क्रांतिवीर –फिदेल कास्त्रो याच्या शब्दात ते जिवंतपणे साकारले आहे.

"क्रांती घडून आली त्या वर्षी म्हणजे १९५८ साली, कूबाच्या ६० लक्ष लोकवस्तीपैकी ६ लक्ष लोक साफ बेकार होते... ३० लक्ष लोकांच्या घरात वीज नव्हती. ३५ लक्ष लोक झोपड्यातून व झोपडपट्ट्यांतून राहात होते... शहरातील कुटुंबांना केवळ राहात्या घरांसाठी भाडे म्हणून आपल्या उत्पन्नाचा तिसरा हिस्सा घरमालकाच्या पदरात टाकावा लागे... ३७.५ टक्के लोक अक्षरशत्रू होते. खेडेगावातील ७० टक्के बालकांसाठी शाळामास्तरच नव्हते. १ लाख लोकांना क्षयाने ग्रासले होते. ग्रामीण भागातील ९५ टक्के मुलांना जंताचा त्रास होई. बालमृत्यूचे प्रमाण जबरदस्त होते आणि जनतेचे जीवनमान अगदीच निकृष्ट होते. ८५ टक्के छोटे शेतकरी उत्पन्नाचा ३० टक्के भाग खंड म्हणून भरत. एकंदर जमीनमालकांपैकी १।। टक्के जमीनमालकांच्या हाती एकूण जमिनीपैकी ४६ टक्के जमीन होती. सार्वजनिक सेवा, वीज आणि टेलिफोन या सर्व गोष्टी अमेरिकन मक्तेदार कंपन्यांच्या मालकीच्या होत्या आणि जनतेला लुटून त्या जबरदस्त नफा कमवीत होत्या. बँकेचा धंदा, आयात–निर्यात व्यापार आणि तेलधंदा बहूतेक संपूर्णपणे अमेरिकन कंपन्यांच्या हाती होता... अमेरिका आणि कूबा यांच्यामधील १९५० ते १९६० या काळातील व्यापारात अमेरिकेला १ अब्ज डॉलरचा फायदा झाला....'

हे वास्तव लक्षात घेऊन फिदेल कास्त्रोने १९५३ साली मोनकादो बराकीवरील हल्ल्यानंतरच्या खटल्यातील "इतिहास मला दोषमुक्त करेल' या ऐतिहासिक भाषणामध्ये क्रांतीच्या ज्या उद्दिष्टांवर भर

दिला होता ती म्हणजे जमिनीचे फेरवाटप, औद्योगीकरण व सर्वांना निवारा, रोजगार, शिक्षण आणि आरोग्य. समाजसत्तावादाची कास धरल्याने ही उद्दिष्टे साधणे शक्य झाले.

**भांडवली नफेखोरीचे अडथळे व समाजसत्तावादी विकासप्रेरणा** : १९५९ साली कूबामध्ये एका बाजूला हजारो हेक्टर जमीन पडीक होती, त्याच बरोबर लाखो कामकरी बेकार होते. कारण जमीनदार व अमेरिकी कंपन्या$अधिक नफा उकळता येईल तेवढीच जमीन कसत होते. आणि त्यावर मर्यादितच रोजगार निर्माण होत होता. कोणत्याही देशातील साधनसामग्रीचे मूल्यमापन व वापर हे तेथील मालकीसंबंधांवरून ठरते. खाजगी नफा हेच उत्पादनाचे उद्दिष्ट असेल तर अनेक दुर्गम भाग, सुप्त संपत्ती, मनुष्यबळ वापरात आणणे जर मालमत्ताधारकांना भरपूर नफा देणार नसेल तर त्याची दखलच घेतली जात नाही.> उदा. ब्रिटिश काळात भारतामध्ये तेलक्षेत्रे सापडणारच नाहीत असे ठामपणे मांडले जात होते. कारण आखाती तेल एवढे स्वस्त होते की भारतात तेल शोधनाचा खर्च करण्यात खाजगी कंपन्यांना रस नव्हता. व्यापक राष्ट्रीय धोरणाच्या चौकटीमध्ये स्वातंत्र्यानंतर समाजवादी देशांच्या मदतीने भारतामध्ये तेल–शोधन सुरू झाले आणि बरेच$तेलसाठे सापडले. परंतु हे धोरण १९९१ मध्ये बदलल्यावर तेल–शोधन बंद पडून आयातीवरचे अवलंबन वाढत चालले आहे. चीनमध्येही १९४९ च्या समाजसत्तावादी क्रांतीपूर्व काळात तेलाचे साठे नाहीत, १९% जमीनच कसाऊ आहे असे मानले जात होते. परंतु क्रांतीनंतर समाजवादी शासनाने तेल–शोधन हाती घेऊन भरपूर तेल साठे शोध>ले व विकसित केले. सिंचन सुविधा वाढवून तसेच पडजमिनी सुधारून लागवडीखालील क्षेत्र वाढवले. अन्नधान्यात स्वयंपूर्णता गाठण्याच्या दृष्टीने मनुष्यबळाचा उपयोग करून अधिक जमीन उत्पादनाखाली आणली. सामूहिकीकरण करून उत्पादकता वाढवली. त्याचप्रमाणे कूबामध्ये तत्कालीन बेकार मनुष्यबळाचा उपयोग करून सिंचन सुविधा विकास, पडजमीन लागवडीखाली आणणे, रस्ते बांधणे, आदी विकासाची कामे पुरी केली. भारतामध्ये अशी कामे पुरी करण्याची निकड नाही असे नाही. लाखो बेकार आहेत व हजारो विकासाची कामे पडून आहेत. पण ही विकासाची कामे हाती घेतली जात नाहीत कारण भांडवली अर्थव्यवस्था.

इंग्लिश–युरोपीय भांडवलदारांनी अमेरिकेमध्ये (यू.एस.ए.) वसाहत स्थापली व मोठा भांडवलसंचय केला तो अमेरिकेतील मूळ रहिवासी –इंडियन्स यांना नेस्तनाबूत करून व त्यांच्या जमिनी, जंगले, खाणसंपत्ती बळकावून, आफ्रिकेतील आदिवासींना गिरफदार करून, त्यांना गुलाम म्हणून शेतावर राबवून आणि इंग्लंडमधील शेतकऱ्यांना शेतावरून उठवून देशोधडीला लागलेल्या शेतकऱ्यांना अमेरिकेत "मजूर' (Labour) म्हणून नेऊन शेतात व कारखान्यात राबवून. अंकित देशांना लूटून व कामगारांचे शोषण करून भांडवलदार भांडवलसंचय करतात व खाजगी नफे वाढवतात. भांडवली समाजाला बेकारांच्या फौजेची गरज असते. तेथे कामाचे स्वरूप हे केवळ पोटार्थी असते. त्यामुळे पगाराचे गाजर आणि नोकरी गमावण्याचा चाबूक मारून काम करून घेतले जाते. बेकारांच्या फौजा समाजात असल्या

की वेतनपातळी कमी राखून भांडवलदारांना जादा नफा कमावता येतो.

समाजसत्तावादी देशात जमीन, खाणी, कारखाने आदी सर्व उत्पादनाची साधने राष्ट्राच्या मालकीची केली जातात. ऐदी, ऐतखाऊ मालक वर्ग – जो नफा–व्याज–खंड अशा विनाश्रम मिळवलेल्या उत्पन्नावर ऐषाराम करतो – तो बांडगुळी संपत्तीधारक वर्ग नष्ट केला जातो. उत्पादनाची साधने श्रमिक जनतेच्या मालकीची होऊन श्रमिकांनी श्रम करून निर्माण केलेले उत्पादन श्रमिकांच्या जीवनावश्यक गरजा भागवण्यासाठी वापरले जाते. उत्पादनाचा एक हिस्सा भांडवली गुंतवणुकीसाठी राखून ठेवला जातो व त्यातून कारखाने, शेती सुधारणा, सर्व जनतेसाठी घरे, शाळा, इस्पितळे, रस्ते इ. पायाभूत सुविधांसाठी वापरला जातो. त्याचा छोटासाही हिस्सा ऐतखाऊ वर्गाच्या खिशात जाणार नसतो. त्यामुळे समाजसत्तावादी शासन जनतेच्या उत्स्फूर्त सहभागाने उत्पादक गुंतवणूक वाढवू शकते. सर्व प्रौढांना उत्पादक काम देऊ शकते. बेकारी नष्ट करू शकते. उत्पादन–व्यवस्थेत संतुलन राखण्यासाठी नियोजनाचा आधार घेतला जातो. ही धोरणे राबवून कूबाने घडवलेल्या सामाजिक–आर्थिक परिवर्तनाचा धावता परामर्श पुढे घेतला आहे.

### ४. समाजवादी समाज–अर्थव्यवस्थेकडे आगेकूच

**शेती** : शेती हा कूबाचा मुख्य व्यवसाय. १९५९ साली क्रांती झाली त्यावेळी शेतीची काय परिस्थिती होती? एकूण ९० लाख हेक्टर जमिनीपैकी २८ लाख हेक्टर जमीन साखर कारखान्यांच्या ताब्यात होती. नऊ बड्या कंपन्यांच्या मालकीची प्रत्येकी २६००० हेक्टरहून अधिक जमीन होती. ५०% जमीन एक टक्का बड्या अमेरिकन कंपन्या व कूबन जमीनदारांच्या मालकीची होती, तर ७१ टक्के शेतकरी, कुळे यांच्याकडे फक्त ११ टक्के जमीन होती. १९ लाख हेक्टर जमीन कसवणुकीखाली, तर ३९ लाख हेक्टर जमीन कुरणाखाली होती. साखर हे नगदी उत्पादन म्हणजे कूबन अर्थव्यवस्थेचा कणा. (मूल्य ४५ कोटी पेसो) मांस (बीफ, पोर्क, मटण, चिकन – २ कोटी पेसो), तंबाखू व कॉफी ही इतर नगदी उत्पादने. १९५८ मध्ये एकूण खाद्यपदार्थाचे उत्पादन – तांदूळ (४ कोटी पेसो), बीन, भाजी, दूध, मासे, मांस मिळून एकूण ९ कोटी पेसो तर खाद्यपदार्थांची आयात १७ कोटी पेसोंची होती. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत साखरेच्या भावात प्रचंड चढउतार होत असल्याने राष्ट्रीय उत्पन्नात प्रचंड चढउतार होई. (तक्ता १)

कूबन जनतेमधील बहूसंख्य गरीब शेतकरी, पिळलेली कुळे, शेतमजूर किंवा बेकार होते. एकूण २२ लाख कामकऱ्यांमध्ये सुमारे ५.२ लाख शेतमजूर, २.२ लाख शेतकरी–कुळे, साखर कारखान्यात हंगामीच काम असल्याने २.२ लाख अर्धबेकार व ३.६ लाख पूर्ण बेकार होते. म्हणजेच २५% जनता बेकार–अर्धबेकार होती. बेकारी व दारिद्र्यामुळे भात–बीन हे रोजचे जेवण. दूध, मांस, अंडी, ब्रेड हे सणासुदिनी. रोगराई पाचवीलाच पुजलेली. याउलट राजधानी हावानामधील कूबन जमीनदार, व्यापारी, अधिकारी, सत्ताधारी यांची राहाणी आलीशान होती. अमेरिकी कारखानदार, अधिकारी, पर्यटक यांचे

हावाना हे चंगळस्थान. त्यांच्या सरबराईसाठी द्यूतगृहे, मदिरागृहे, वेश्यागृहे यांनी हावाना नटलेले होते.

एकाच देशातल्या जनतेची ही परस्परविरोधी दोन चित्रे. एका बाजूला संख्येने मोठ्या कष्टकरी वर्गाची हलाखीची परिस्थिती, तर दुसरीकडे त्या कष्टांवर पोसलेली ऐतखाऊ चिमुटभरांची चंगळखोरी! कूबाच्या सर्वसामान्य जनतेने बातिस्ताबरोबरच या शोषणाच्या व्यवस्थेलाही विरोध करत क्रांतिकारकांना आधार दिला. कूबन क्रांतिकारकांनी बातिस्ताच्या जुलमी राजवटीबरोबरच ही जुलमी शोषक व्यवस्थाही उलथून टाकण्याचे स्वप्न पाहिले होते. नव्या शोषणविरहित व्यवस्थेचे चित्र समोर ठेवले होते. क्रांतीनंतर पहिली पावले उचलली ती शेतीसुधारणेसाठी. जमीनदारीचे उच्चाटन, जमिनीचे फेरवाटप, पतपुरवठा, नवीन पीकपद्धती, संशोधन या साऱ्याकडे क्रांतिकारी सरकारने लक्ष दिले.

**जमीनसुधारणा कायदे** : कूबामध्ये जमीनधारणेत अतीव विषमता असल्याने जमीन धारणा सुधारणा कायदे हे क्रांतिकारी बदलातील पहिले महत्त्वाचे पाऊल होते. १९५९ च्या कायद्याने जमीनधारणेची कमाल मर्यादा ४०० हेक्टर ठरवण्यात आली आणि सुमारे ३००० जमीन मालकांकडील ४५ लाख हेक्टर जादा जमीन शासनाने क्रमश: ताब्यात घेतली. सर्वप्रथम बातिस्ता शासनातील अधिकारी व अन्य बातिस्ता समर्थकांची जमीन, त्यानंतर मोठी कुरणे, १९६० साली अमेरिकी साखर कारखान्यांची १२.५ लाख हेक्टर जमीन व कूबन साखर कारखान्याची १४ लाख हेक्टर जमीन ताब्यात घेतली. पिकाखाली नसलेली जमीन व कमाल मर्यादेवरील अन्य जमीन मिळून ६०% जमीन सामाजिक नियंत्रणाखाली आणली गेली. २ लाख शेतकरी व कुळे यांना जमीन वाटण्यात आली (२६.८ हेक्टर किमान आकार). या शेतकऱ्यांना सहकारी सोसायटी, पत सोसायटी अशा विविध संस्थात संघटित करून त्यांना कमी व्याजदरात पतपुरवठा, यंत्रसामुग्री–सेवा, पशु–सेवा, बांधलेले भाव अशी व्यवस्था करून उत्पादन वाढीस उत्तेजन देण्यात आले. शेतीसुधार संस्थेच्या (Institute of Agrarian Reform) प्रशासनाखाली प्रामुख्याने कुरणांखालील जमीन (९ लाख हेक्टर) व पडीक जमीन आली. शेतीसुधार संस्थेने पडीक जमीन टप्प्याटप्प्याने भात, कापूस, सोयाबीन, बटाटे आदी पिकांखाली आणली. उसाखालील ८ लाख हेक्टर जमीन शासकीय मार्गदर्शनाखाली सहकारी संस्थांत संघटित करण्यात आली. कर्जपुरवठा, उत्पादनाचे नियोजन करण्याच्या व सहकार्य वाढवण्याच्या दृष्टीने राष्ट्रीय शेतकरी संघटनेच्या छत्राखाली सर्व शेतकरी एकत्रित आणण्यात आले.

१९६१मध्ये शेतीसुधार संस्थेच्या अखत्यारीतील जमीन व सहकारी संस्थांखालील जमीन शासकीय शेतीखाली (granja) एकत्रित करण्यात आली. या २६६ ग्रान्खांच्या नियंत्रणाखाली २५ लाख हेक्टर जमीन व १ लाख कामगार आले. ग्रान्खांच्या नियंत्रणाखालील मोठ्या आकाराची शेते कसण्यासाठी ट्रॅक्टर, कृत्रिम खते व कीटकनाशके मोठ्या प्रमाणात वापरली जाऊ लागली. ही यांत्रिकी व रासायनिक शेती सोविएत रशियातील आयातीच्या आधारे उभारल्याने परावलंबी राहिली.

**शेतीसुधारणा कार्यक्रमातील अडचणी** : अधिकाधिक जमीन पिकाखाली आणून उत्पादन वाढवण्याचा

प्रयत्न करण्यात आला.  प्रारंभीच्या काळात बेरोजगार मनुष्यबळ उपलब्ध असल्याने पडीक जमीन शेतीखाली आणण्यासाठी कामकरी उपलब्ध होते. पण क्रमश: त्यांचा तुटवडा पडून पडीक जमीन लागवडीखाली आणणे फार खर्चिक बनू लागले. निर्यातीसाठी साखरेचे उत्पादन वाढवण्यासाठी उसाखालचे क्षेत्र वाढवले. पण ऊसतोडणीच्या वेळी मजुरांची कमतरता निर्माण होऊन ऊस तोडणे कठीण झाले. तेव्हा ऊस–तोडणी यंत्रे आयात केली. पण शेतात त्यांचा वापर करण्यात अनेक अडचणी उभ्या राहिल्या. प्रयोगाद्वारा यंत्रात सुधारणा करून ऊस–तोडणीचे यांत्रिकीकरण केले. उसाचे उत्पादन ५० लाख टनावरून १०० लाख टनांपर्यंत नेण्याचे उद्दिष्ट ठेवले. पण ते ९२ लाख टनांवर गेले नाही. बेकारी हटवल्याने सामान्य जनतेचे उत्पन्न वाढून मांसाची मागणी एकदम वाढल्याने सुरुवातीच्या काळात जादा गुरे कापली गेली व पुढील वर्षात मांसाचा तुटवडा निर्माण झाला. कुरणांची उत्पादकता वाढवण्यासाठी फ्रेंच शास्त्रज्ञाने विकसित केलेली नवी पद्धत व्यापक प्रमाणात राबवली. पण कूबाच्या भिन्न हवामानात ती यशस्वी न झाल्याने ही धडक योजना नुकसानकारक ठरली. उत्पादन वाढवण्याच्या प्रयत्नात पावसाची अनिश्चितता, अवर्षण, झंझावाती वादळे अशा आपत्तीमुळे उत्पादनातील हेलकावे टाळणे दुष्कर होते. १९५९ पर्यंत सिंचन सुविधांचा अभाव होता. त्या वाढवून उत्पादन पातळी सुधारली. दूध, अंडी, मांस  आदी उत्पादन वाढवण्यासाठी खास योजना राबवल्या. सुधारित वळू आयात करून कृत्रिम रेतनकेंद्रे खोलून गायींची पैदास वाढवली. दूध, अंडी, मांस  आदी उत्पादन वाढवण्यासाठी खास योजना राबवल्या.

बड्या कंपन्यांची जमीन ताब्यात घेतल्यावर तेथील व्यवस्थापक, तंत्रज्ञ कूबा सोडून गेले. तांत्रिक मार्गदर्शन, आकडेवारी संकलन व हिशेब व्यवस्थापन यांची लगोलग तरतूद न झाल्याने आरंभीच्या काळात उधळमाधळ व अकार्यक्षमतेचे प्रश्न उद्भवले. तंत्रज्ञ व हिशेबनीसांची उपलब्धता वाढली तसे पीक संयोजन, खर्च³उत्पन्न ताळेबंद यांचा आधार घेणे शक्य होऊन कार्यक्षमता वाढवणे शक्य झाले.

कसणाऱ्याला जमीन हा क्रांतीचा अग्रहक्काचा कार्यक्रम होता. सिएरा माएस्त्रामधील क्रांतीलढ्यात सामील झालेले शेतकरी स्वत:च्या हक्काची जमीन मिळावी यासाठी लढ्यात उतरले होते व त्यांना शेतीमध्ये स्वायत्तता राखायची होती. त्यामुळे शेतीचे सामुहिकीकरण (commune)करण्याबाबत आग्रह धरला गेला नाही. व्यक्तिगत शेती सुमारे २०% कसाऊ जमिनीवर राहिली. त्यातील निम्मी सहकारी संघटनांखाली आली होती. शेतकऱ्यांना जमीन विक्रीस परवानगी नसल्याने, त्यांच्या मुलांना शेतीत रस नसल्यास अशी जमीन शासनाकडे जमा करण्याची तरतूद करण्यात आली. शेतीविकास–योजना कार्यक्रमात शेतकऱ्यांनी सामील होण्यासाठी खास उत्तेजनात्मक तरतुदी करून खाजगी शेतांपर्यंत नियोजन पोचवण्याचे प्रयत्न केले.

१९६३ मध्ये जमीनधारणा नियमन अधिक कडक केले. कारण मोठे जमीन मालक  जमीन पडीक टाकणे, अफवा पसरवणे, प्रतिक्रांतिकारकांना आसरा देणे अशा अनेक घातपाती कारवायांत गुंतत होते.

बे ऑफ पिग्जसारख्या अमेरिकी हल्ल्यांची केव्हाही शक्यता असल्याने देशातील अशा प्रतिक्रांतिकारी अड्ड्यांचा मोठा धोका होता. तेव्हा ऑक्टोबर १९६३ मध्ये ६७ हेक्टरवरील (सुमारे ११००० शेतमालकांची) २० लाख हेक्टर जमीन सरकारजमा करण्यात आली. उसाचे एकचएक पीक मोठ्या क्षेत्रावर घेतल्याने व रसायनांचा प्रचंड वापर केल्याने जमिनीची खराबी आणि किडींचा प्रश्न गंभीर होऊ लागला. तेव्हा सुधारणा कार्यक्रम हाती घेऊन पिकात विविधता आणण्याचा प्रयत्न सुरू केला. गहू (१००%), बीन (९०%) व तांदूळ (५०%) याबाबत आयातावलंबन फार मोठे होते. कूबात गहू पिकू शकत नाही पण तांदूळ व बीन, भाजीपाला यांचे उत्पादन वाढवण्याचा कार्यक्रम हाती घेतला. १९६० ते १९९० या तीस वर्षांचा आढावा घेतला तर आढळून येते की शेती उत्पादनात चढउतार मोठ्या प्रमाणात असल्याने उत्पादनवाढ लक्षणीय दिसत नाही. परंतु तरीही श्रमिक ग्रामीण जनतेला पूर्वी भात व बीनवर जगावे लागे, त्यांना दूध, अंडी, मांस, भाजीपाला उपलब्ध होऊन पुरेसा पोषक आहार मिळू लागला. दुधाचा पुरवठा मुलांसाठी अग्रहक्काने राखून ठेवून ७ वर्षांखालील प्रत्येक मुलाला रोज एक लिटर दूध मिळेल अशी वितरण व्यवस्था केली. दरडोई दररोज ३००० कॅलरी व ७५ ग्रॅम प्रोटिन्स मिळतील एवढी अन्नधान्याची उपलब्धता निर्माण केली. उपलब्ध उत्पादनाचे समानतापर वाटप करण्याची व्यवस्था केली आणि सर्वांनी किमान उत्पन्नपातळी गाठल्याने पुरेसा व चौरस आहार सर्व जनतेला उपलब्ध झाला. भारतातही विषमता दूर करून राष्ट्रीय संपत्तीचा वापर सर्व श्रमिक जनतेच्या गरजा पुरवण्यासाठी केला तर सर्व जनतेला चांगले जीवनमान मिळेल एवढी उत्पादनक्षमता भारतात आहे. पण भांडवलशाही अर्थव्यवस्थेमुळे अतीव श्रीमंती, श्रीमंतांची चैनचंगळ व उधळपट्टी आणि त्याबरोबर बेकारी, गरिबी व कुपोषण मोठ्या प्रमाणात आहे.

ग्रामीण उत्पादन व्यवस्थेतील बदलांमुळे सर्व ग्रामीण श्रमिकांना रोजगार मिळाला आणि किमान उत्पन्नाची शाश्वती व निवृत्ती वेतनाची सोय करण्यात आली. ग्रामीण जीवनात क्रांतीकारी बदलाचे वारे शिक्षणाच्या प्रसारामुळे पोचले. शिक्षणामुळे विकासाची नवी दालने ग्रामीण जनतेला खुली झाली. याशिवाय आरोग्यसेवा सर्वांना मिळेल अशी व्यवस्था केली. क्रांतीपूर्व काळात ७५% ग्रामीण जनता झोपड्यात राहात होती. घरे, रस्ते, वीज–पाणीपुरवठा अशा सुसज्ज वसाहतींमुळे ग्रामीण जीवनमान सर्वांगाने उंचावले. अशा सर्वांगीण सुधारणांमुळे कष्टकऱ्यांच्या जीवनात मूलगामी बदल झाला. सिएर्रा माएस्त्राला कास्त्रो स्वत: भेटी देऊन, लोकांशी संवाद साधून अडचणी दूर करत. फिदेलची अस्सीम आस्था व निष्ठा आणि स्वप्नातही न पाहिलेल्या शाळा, रस्ते, रेडिओ, दवाखाने, पुस्तके डोंगरकपारीतल्या पाड्यातही पोचल्याने कूबन शेतकरी कृतज्ञतेने भारावून गेला.

**औद्योगिक विकास** : कूबातील प्रमुख उद्योग म्हणजे साखर कारखाने. देशाच्या औद्योगिक उत्पादनात साखरेचा वाटा ४०% होता. अमेरिकेला साखर निर्यात करून अमेरिकेतून औद्योगिक वस्तू व खाद्यवस्तूंच्या आयातीवर कूबा परावलंबी होता. वीज, रेल्वे, टेलिफोन कंपनी, तेल कंपन्या, बँका व

अनेक साखर कारखाने व इतर उद्योग अमेरिकन कंपन्यांच्या मालकीचे होते. जून १९६० मध्ये अमेरिकी तेल शुद्धीकरण कारखान्यांनी सोविएत खनिज तेलाचे शुद्धीकरण करण्याचे नाकारल्याने त्यांचे राष्ट्रीयीकरण केले. अमेरिकेने साखर आयात बंद केल्याने कूबाने प्रत्युत्तर देऊन जुलै १९६० मध्ये अमेरिकन साखर कारखान्यांच्या जमिनीचे राष्ट्रीयीकरण केले. २१ साखर कारखाने, तीन तेल कंपन्या, वीज, टेलिफोन कंपनी व ऑक्टोबरमध्ये रेल्वे कंपन्या, बँका, वाहतूक कंपन्या व २८७ कारखान्यांचे राष्ट्रीयीकरण केले. नागर विभागातील घरांचा ताबा शासनाने घेतला. ऑक्टोबर १९६० मध्ये अमेरिकेने कूबाला होणाऱ्या निर्यातीलाही बंदी घातली तेव्हा सोविएत युनियनबरोबर आयात–निर्यात, कर्ज विषयक करार केले. १९६१ मध्ये परदेशी राहाणारे कूबन व भ्रष्टाचारी उद्योगपती यांचे कारखाने ताब्यात घेतले आणि सुमारे ७५% औद्योगिक उत्पादन सार्वजनिक क्षेत्रात आले. १९६४ पर्यंत ९५% उद्योगांचे राष्ट्रीयीकरण झाले. हे उद्योग चालवण्यात दोन मोठ्या अडचणी उभ्या राहिल्या. बहूतेक तंत्रज्ञ व व्यवस्थापक देश सोडून गेले किंवा काहींच्या राष्ट्रीयीकरणविरोधी वर्तनामुळे त्यांना काढून टाकावे लागले. त्यामुळे तांत्रिक व व्यवस्थापकीय त्रुटी निर्माण झाल्या. सर्व कारखाने कच्चा माल व सुटे भाग, यंत्रे यासाठी केवळ अमेरिकन आयातीवर अवलंबून होते. सोविएत युनियनला साखर निर्यात करून विविध गरजेच्या वस्तूंची आयात सुरू झाली तरी अमेरिकेतून आयात केला जाणारा कच्चा माल, सुटे भाग तेथे मिळणे शक्य नसल्याने औद्योगिक उत्पादन खंडित झाले. कूबाचा तिसरा प्रश्न म्हणजे ऊर्जेचा. कोळसा, जलविद्युत यांचा अभाव व तेलसाठे मर्यादित असल्याने इंधनाची चणचण भासू  लागली. याशिवाय १९६०–६१ मध्ये अमेरिकेच्या हल्ल्यामुळे देश रक्षणासाठी सर्व जनतेला सज्ज राहाणे गरजेचे होते. सैनिकी प्रशिक्षणात व संरक्षण जबाबदारीत कामगार गुंतल्यामुळे या काळात औद्योगिक उत्पादनात खंड पडला व उत्पादन घटले.

औद्योगिक विकासामध्ये भर दिला तो देशात मिळणाऱ्या कच्च्या मालाच्या औद्योगिक वापरात वाढ, निर्यातीवरील अवलंबन कमी करणे आणि प्रादेशिक विकास साधण्यासाठी विकेंद्रित उद्योगीकरण यावर. औद्योगिक विकास साधण्यासाठी प्रशिक्षित कसबी कामगार, तंत्रज्ञ, हिशेबनीस आदींची मोठ्या संख्येने गरज होती. तातडीने किमान प्रशिक्षण करण्यासाठी कामगारांसाठी १ ते ६ महिन्यांचे खास प्रशिक्षण वर्ग सुरू करून कारखान्यांमध्ये व्यावहारिक शिक्षण व सायंकाळी सैद्धांतिक पाठ (५०–२०० तास) घेतले जात. यांत्रिकीकरणामुळे बेकारी वाढते म्हणून कामगारांचा यांत्रिकीकरणास विरोध असे. पण आता शासनाने सर्वांना काम देण्याची जबाबदारी घेतल्याने कापडउद्योग, चामडेउद्योग आदींमध्ये यांत्रिकीकरण सुरू करण्यात आले व त्यामुळे बेकाम झालेल्या कामगारांना नवीन कसबाचे शिक्षण देण्यासाठी खास जनता विद्यालये सुरू करण्यात आली. खास तांत्रिक शिक्षणासाठी तंत्रविद्यालये, विद्यापीठ यामध्ये १२–१८ महिन्यांच्या अभ्यासक्रमासाठी कामगारांना पाठवण्याची सोय करण्यात आली. या सर्व कार्यक्रमात मुख्य अडचण होती ती शिक्षकांची. तांत्रिक महाविद्यालये, विद्यापीठे व सोविएत युनियनमध्ये

शिक्षण आदी मार्गे ही चणचण काही वर्षात दूर करणे शक्य झाले. त्याआधारे औद्योगिक उत्पादन व व्यवस्थापन यामधील कार्यक्षमता वाढवता आली. औद्योगिक उत्पादनाचा पाया रुंदावणे व उत्पादन वाढवणे क्रमश: शक्य झाले.

**राहाणीमान** : क्रांतीनंतर सर्व जनतेला रोजगार व किमान राहाणीमान देण्याच्या दृष्टीने ताबडतोबीने उचललेली पावले म्हणजे घरांची भाडी निम्म्यावर आणली. घराभाड्यामध्ये पूर्वी कामगारांचे ३३ टक्के उत्पन्न खर्ची पडत असे. क्रांतीपूर्वी ४०% नागर श्रमिक झोपडपट्टीत राहात होते. वीज, पाणी, मैलाव्यवस्था अशा कोणत्याच सुविधा त्यांना उपलब्ध नव्हत्या. नवीन घरबांधणी कार्यक्रमाद्वारा त्यांच्या निवास व्यवस्थेत आमूलाग्र बदल घडवण्यात आला. वीजदर व टेलिफोन दर कमी केले व नागरी जनतेवरील निवास–खर्चाचा बोजा कमी केला. अकुशल औद्योगिक कामगारांचे मासिक वेतन ८० ते १५० पेसोच्या दरम्यान आणि तंत्रकुशल, शिक्षित कामगार–कर्मचाऱ्यांचे वेतन १५०–५०० पेसोच्या दरम्यान, मंत्र्यांचे ७०० पेसो, डॉक्टर–इंजीनिअरचे ७००–९०० पेसो असे ठेवून उत्पन्नातील तफावत कमी करण्यात आली. १९५८ च्या तुलनेने १९६२ पर्यंत कामगारांच्या वेतनात ५० टक्क्यांनी वाढ झाली. जीवनावश्यक वस्तूंच्या किमती किमान जीवनमान सर्वांना उपलब्ध होईल अशा रीतीने कमी ठेवल्या.

कुळांना जमिनी मिळाल्याने खंडाचा मोठा भार दूर होऊन शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढले. तसेच बेकारांना रोजगार मिळाल्यामुळे ग्रामीण जनतेने किमान उत्पन्न पातळी (मासिक ६०–७० पेसो) गाठली. प्रारंभीच्या काळात ग्रामीण वेतन पातळी नागर कामगारांच्या वेतनाच्या ५० टक्के होती ती १९८० पर्यंत ८६ टक्के एवढी उंचावली. किमान वेतन व निवृत्ती वेतन यांची सार्वत्रिक व्यवस्था झाल्याने सर्व जनतेच्या हाती किमान क्रयशक्ती आली. अशा रीतीने राष्ट्रीय उत्पन्नाचे न्याय्य वाटप सुरू केले. पण त्याबरोबर प्रश्न होता तो उत्पादन वाढीचा. ग्रामीण गरिबांचे उत्पन्न वाढल्याने शेतकरी, शेतमजूर यांचे पाव, मास, अंडी, दूध इ. वस्तूंचे सेवन वाढले व अन्नाचा नागरी पुरवठा कमी झाला. कपडे, पादत्राणे इ. वस्तूंची मागणी वाढली. परंतु शेती व औद्योगिक उत्पादनवाढीत वर पाहिल्याप्रमाणे अनेक अडचणी होत्या. औद्योगिक विस्तारासाठी यंत्रे, सुटे भाग, इंधन तेल, आयातीची गरज होती तसेच पडजमीन लागवडीखाली आणण्यासाठी व शेती उत्पादन वाढीसाठी यंत्रे, रासायनिक खते आयात करणे जरूर होते. वरील गरजांमुळे उपभोग्य वस्तूंच्या आयातीवर मोठी मर्यादा पडत होती. त्यामुळे खाद्यपदार्थ व कपडे, पादत्राणे, साबण आदी वस्तूंची टंचाई निर्माण झाली. अत्यंत कडक रेशनव्यवस्थेद्वारा सर्वांच्या किमान गरजा भागवण्याची व्यवस्था करण्यात आली. अशा खडतर जीवनाला तोंड देण्याची नागरी जनतेची तयारी करायची हे नेतृत्वापुढे मोठे आव्हान होते. कामगारांशी सतत संवाद साधून, अडचणी मोकळेपणाने मांडून हे सहकार्य मिळवणे साधले.

कडक रेशनव्यवस्था जारी झाली तरी टंचाईच्या परिस्थितीमुळे १९६० सालच्या राष्ट्रीयीकरणामधून

सुटलेल्या छोट्या खाजगी उद्योगधंद्याना झटपट नफा कमावण्याची संधी दिसू लागली. शेतीमाल विक्रीसाठी जरी खुली बाजारपेठ नसली तरी ग्राहकांना शेतकऱ्यांकडून १० किलोपर्यंत मास खरेदीस मुभा होती. त्यामुळे नागरी सधन मोटारवाले शासकीय नियंत्रित किमतीच्या १।।–२ पट किमतीला शेतकऱ्यांकडून मांस, मध इ. विकत घेऊन ३/४ पट किमतीला त्यांची विक्री करू लागले. उपहारगृहे/खानावळी/बार चालवणे मोठे फायदेशीर बनल्याने क्रांतीनंतर हे व्यवसायधंदे नव्याने सुरू झाले. खाजगी धंदे व काळा व्यापार वाढल्याने शासकीय दुकानातून रेशनवर माफक किंमतीत उपलब्ध असलेल्या मालाचा तुटवडा पडू> लागला. शेतकरीही काळ्या व्यवहारात गुंतू लागले. खाजगी उद्योगव्यवसायात नफेखोरी (३०–५०%) व पिळवणूक बोकाळू लागली. १९६८ मध्ये सुमारे ३३% किरकोळ व्यापार खाजगी होता. वरील समस्यांची १९६८ साली पाहाणी करून ते ताब्यात घेण्यासाठी खास योजना राबवण्यात आली. ५५६०० छोट्या व्यापार–धंद्यांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. परंतु जोवर टंचाई आहे तोवर लोकांच्या राजकीय जाणिवा प्रगल्भ झाल्याविना भांडवली नफेखोरी वृत्ती डोके वर काढून बेकायदेशीर खाजगी उद्योग आणि खरेदी–विक्री यावर संपूर्ण आळा घालणे कठीण आहे.

**नियोजन** : मोठी शेती व उद्योग या उत्पादनांच्या साधनांचे राष्ट्रीयीकरण केल्यावर जनतेच्या गरजा भागवण्याच्या दृष्टीने उत्पादनाचे अग्रक्रम ठरवणे, डामडौल–चैनचंगळीला आळा घालणे, समुचित भांडवली गुंतवणूक व आयात धोरण आखणे याकरता नियोजनाची कास धरणे पायाभूत होते. सरकारची प्रमुख उत्पन्नाची साधने म्हणजे राष्ट्रीयीकृत शेती, उद्योग, व्यापारातील उत्पन्न व खाजगी शेती–उद्योग उत्पन्नावरील कर ही होती. कराची प्रामाणिकपणे व चोख वसूली करून कराचे उत्पन्न मोठ्या प्रमाणात वाढविण्यात आले. प्रारंभीच्या काळात आकडेवारी व इतर माहितीचा अभाव, तंत्रज्ञ, हिशेबनीस, गणकयंत्रे यांचा अभाव इ. अडचणीमुळे सर्वंकश संकलित योजना आखणे शक्य नव्हते. त्यामुळे विविध उत्पादनाच्या गरजा विचारात घेऊन केंद्रीय योजना आयोगामार्फत विविध उद्योग व शेतीसाठी उत्पादनाची लक्ष्ये ठरवण्यात येत. प्रत्येक क्षेत्रासाठी भांडवल, कच्चामाल पुरवठा, कामगार, आदीची तरतूद याचा मेळ घालून तयार केलेल्या प्राथमिक योजनांची विविध उत्पादक घटकांबरोबर चर्चा करून नियोजन आयोगाद्वारा त्याला अंतिम स्वरूप देण्यात येई. वित्तीय व्यवस्थेबाबत विविध उत्पादन घटकांना स्वायत्तता देण्यात आलेली नव्हती. शासकीय शेतीचे सर्व उत्पन्न राष्ट्रीय बँकेद्वारा राष्ट्रीय अंदाजपत्रकात जमा होई. बँकेद्वारा दर तीन महिन्यांनी उत्पादनाच्या प्रगतीचा आढावा घेऊन गुंतवणूक निधी, पगार व अन्य खर्चाचे पैसे उपलब्ध केले जात. उद्योगांचा सर्व वाढावा (र्ीीीश्रिीीरी) अंदाजपत्रकात समाविष्ट होई. कामगारांचा कामाचा उत्साह टिकवण्यासाठी अधिक उत्पादन देणे, जादा वेळ काम करणे अशा कामगिरीसाठी सामाजिक मान्यता, शैक्षणिक संधी अशा प्रकारे उत्तेजन दिले जाई. नियोजनात गरजेप्रमाणे लवचिकता राखली होती. तोडणीच्या हंगामाच्या वेळी विद्यार्थी गट शेतकऱ्यांच्या मदतीला जात व त्याबरोबर साक्षरता खेडोपाडी पोचवण्याचे काम करत. विविध शेते, कारखाने यांना

फिदेल कास्त्रो आवर्जून भेटी देऊन श्रमिकांशी प्रत्यक्ष संवाद साधून समाजउभारणीच्या कामाचा उत्साह वाढविण्यासाठी आणि अडीअडचणीतून मार्ग काढण्यासाठी लक्ष घालत.

राष्ट्रीय उत्पन्नाच्या २५% उत्पन्न भांडवली गुंतवणुकीसाठी वळवलेले होते. राष्ट्राच्या अंदाजपत्रकातील सुमारे २/३ खर्च हा सामाजिक–आर्थिक विकास योजनांसाठी होता. शासकीय खर्च किमान राखला होता. नागरी–सेवा दले उभारून लष्करी खर्च कमी करण्यात आला होता. देश संरक्षणाच्या आव्हानाला तोंड देण्यास सर्वच शेतकरी–कामगार कायमच सज्ज असतात. सामाजिक सुरक्षा निधीद्वारा निवृत्तीवेतन, आरोग्य सेवा, आयुर्विमा या सुविधा शेतमजुरांंसह सर्वांना उपलब्ध केल्या. भांडवली गुंतवणूक वाढवून त्यातून पडीक जमीन लागवडीखाली आणणे व बेरोजगारी कमी करणे, उद्योगांचा विस्तार करून रोजगारवाढीतून बेरोजगारी नष्ट करण्याचे उद्दिष्ट साधलेे. आर्थिक विकासाबरोबर व्यावसायिक विभागणीतही बदल झाले. १९५० साली ४२% कामगार शेतीवर अवलंबून होते व १७% उद्योगात होते. १९८० साली शेतीवरील अवलंबितांचे प्रमाणे २४% झाले तर उद्योगातील कामगारांचे प्रमाण २९% झाले. औद्योगीकरणाबरोबर नागरीकरणही झपाट्याने वाढले. १९५० साली सुमारे निम्मी जनता नागर विभागात होती, ती १९७० साली ६०%, १९९० साली ७५% व २००० साली ८०% एवढी वाढली.

**शिक्षण** : १९५९ साली कूबातील बहूसंख्य ग्रामीण जनता अशिक्षित होती. १–२ वर्षांचे शालेय शिक्षण घेतले तरी थोड्याच काळात ते अक्षरओळख विसरून जात. १०वर्षे वयावरील लोकसंख्येत २५% कधीच शाळेत न गेलेले, तर ५०% अर्धवट शाळा सोडलेले होते. शाळेत हजेरीपटावर नाव असले तरी त्यातील निम्मे शाळेत जातच नसत. प्राथमिक शिक्षण पुरे केलेल्यांपैकी फक्त २०% माध्यमिक शाळेत पोचत. शिक्षकांची गैरहजेरी, कामचुकारपणा व शिक्षण खात्यातील भ्रष्ट कारभार, वशिलेबाजी यामुळे शालेय शिक्षणाचा दर्जा निकृष्ट होता. क्रांतीमुळे शिकलेले लोक "करियर'साठी मोठ्या संख्येने अमेरिकेत स्थलांतरित झाले. त्यामुळे शिक्षक, डॉक्टर, इंजीनिअर आदींची मोठी चणचण निर्माण झाली. तरीही शैक्षणिक मोहीम हाती घेण्याचा निश्चय करून कास्त्रोंनी आवाहन केले की, १०वी पर्यंत$शिक्षण घेतलेल्या युवक–युवतींनी ग्रामीण भागात शैक्षणिक मोहिमेत सामील व्हावे. या मोहिमेद्वारा लिहायला–वाचायला शिकवायचे आणि आरोग्य व पोषक आहारविषयक माहिती पोचवायची होती. डॉक्टर, इंजीनिअर, प्राध्यापक यासह पाच हजार शिक्षित ताबडतोब पुढे आले. डोंगरदऱ्यात उघडलेल्या खास वर्गात त्यांचे प्रशिक्षण करून त्यांना शिक्षक म्हणून गावोगावी पाठविण्यात आले. प्रत्येक वर्गात ५० विद्यार्थी, मुलांसाठी दिवसा व प्रौढांसाठी सायंकाळी वर्ग सुरू करण्यात आले. या प्राथमिक मोहिमेनंतर १ जानेवारी १९६१ रोजी ""१००% साक्षरता'' मोहीम हाती घेण्यात आली. २६८४२० शिक्षक या मोहिमेत सामील झाले. त्यातील १२० हजार प्रौढ स्वत:ची नोकरी सांभाळून दररोज दोन तास फावल्या वेळात शिकवीत. शाळेतील १३–१५ वर्षांची एक लाख मुलेही या मोहिमेत उतरली. मे महिन्याच्या

सुट्टीत १५ दिवसांचे प्रशिक्षण पुरे करून ऑक्टोबरपर्यंत खेडेगावी शेतकऱ्यांकडे राहून त्यांनी कामात मदत केली व लिहायला-वाचायला शिकवले. मुलांच्या या प्रयत्नात जेथे उणिवा, अडचणी आढळल्या त्या भरून काढण्यासाठी १३००० शिक्षित कामगार-कर्मचारी खेडोपाड>ी पोचले. १५ लाख प्राथमिक पाठ्यपुस्तके वाटण्यात आली. शिक्षणप्रसाराबाबत शिक्षक तर उत्साहात होतेच; परंतु अशिक्षितांतही शिकून उपयोग होईल असा विश्वास निर्माण झाल्याने ते मोठ्या उमेदीने लिहायला-वाचायला शिकले. साक्षरता मोहिमेअखेर निरक्षरांचे प्रमाण २४% वरून ३.९% पर्यंत उतरले. ग्रामीण भागात ४७६ हजार तर शहरात २३१ हजार निरक्षर लोक साक्षर बनले. ही मोहीम म्हणजे शिक्षण प्रसाराचा प्रारंभ होता.

त्यानंतर ट्रेड युनियन व कूबन स्त्री संघटना, शेतकरी संघटना यांच्या सहकार्याने शैक्षणिक कार्यक्रम सर्वत्र चालू राहिले. नवनवी पुस्तके व साहित्य लोकांपर्यंत पोचत राहिले. वाचनाची गोडी निर्माण करण्यासाठी "वाचनाचा आनंद' हे सोप्या भाषेत महत्त्वाच्या बातम्या देणारे मासिक घरोघरी मोफत पोचविण्यात आले. कारखान्यात शिक्षण-सुविधा उघडल्या. सर्व मुले शाळेत शिकू लागली. प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकांच्या प्रशिक्षणासाठी अनुरूप असे खास अभ्यासक्रम सुरू करण्यात आले. तसेच मोठ्या संख्येने बालवाड्या उघडून स्त्रियांना नोकरी करण्यास फुरसत दिली. याशिवाय माध्यमिक शिक्षण घेतलेली मुले सहा आठवडे शेतावर राहून शेतकऱ्यांना मदत करत व त्या काळात टी.व्ही.च्या शैक्षणिक कार्यक्रमाद्वारा त्यांचे शिक्षण चालू ठेवले जाई. शिक्षण प्रसारासाठी टी.व्ही.च्या माध्यमाचा पद्धतशीरपणे व परिणामकारक असा उपयोग कूबामध्ये मोठ्या प्रमाणात करण्यात येतो. लाखो पुस्तकांचे प्रकाशन हा शैक्षणिक कार्यक्रमांचा महत्त्वाचा भाग आहे. प्रतिवर्षी २००० नवीन पुस्तकांच्या लाखो प्रती प्रसारात येतात. याशिवाय विज्ञान-तंत्रज्ञानाचे उच्चशिक्षण व संशोधन यावर लक्ष केंद्रित केलेले आहे. शिक्षणसंस्थांतून विद्यार्थ्यांयना सैनिकी शिक्षणही दिले जाते.

राष्ट्रीय उत्पन्नाच्या सुमारे ७ % उत्पन्न शैक्षणिक विस्तार कार्यक्रमासाठी गुंतवण्यात येते. याशिवाय कामगार-कर्मचारी, अन्य शिक्षित यांनी कामाऐवजी शिक्षणात भाग घेतल्याने जे उत्पादन बुडाले त्याचा अप्रत्यक्ष खर्च विचारात घेतला तर ११% उत्पन्न या मोहिमेसाठी खर्ची पडले. या सार्वत्रिक मोहिमेमुळे अगदी डोंगरकपारीतल्या मजुरालाही शिकण्याची संधी मिळाली. त्यामुळे ३-४ वर्षात तांत्रिक व विज्ञान शिक्षण, उच्च शिक्षण व संशोधन यांच्या प्रगतीसाठी विस्तृत पाया तयार झाला. आज ६-७ वर्ेष वयोगटातील सर्व मुले शिकत आहेत. ती मोठ्या संख्येने उच्च शिक्षणापर्यंतही पोचत आहेत. (तक्ता २)

प्राथमिक शाळेत एका शिक्षकामागे १३ विद्यार्थी, माध्यमिक शाळेत ११ तर उच्च माध्यमिक शाळेत ५ विद्यार्थी एवढे शिक्षकांचे प्रमाण आहे. तांत्रिक व पुस्तकी शिक्षणाबरोबरच सांस्कृतिक विकास - नाट्य - नृत्य - साहित्य यालाही शासन उत्तेजन देते. प्राथमिक पातळीपासून प्रारंभ करून विद्यापीठ अखेरचे कलाशिक्षण देशभरचे विद्यार्थी घेतात. शेतकामात सहभाग, क्रीडा-खेळ-व्यायाम अशा चौफेर

शिक्षणावर भर देऊन सर्वार्थाने शिक्षित/जबाबदार नागरिक निर्माण करण्याची निश्चित दृष्टी शैक्षणिक कार्यक्रमामध्ये आहे.

स्त्रीमुक्तीच्या दृष्टीकोणातूनही शैक्षणिक मोहीम मोठी लाभदायक ठरली. क्रांतीच्या काळात मोजक्याच स्त्रिया लढ्यात सामील होत्या. काही स्त्रिया क्रांतिकार्यास मदत करीत होत्या. पण बहूसंख्य स्त्रिया पारंपरिक कोशातच अडकलेल्या होत्या. अनेकजणी घराबाहेर एकट्या पडलेल्या नव्हत्या. शैक्षणिक मोहिमेत त्या दूरदूरच्या खेड्यात पोचल्या, शेतात काम करून, शिकवण्याची जबाबदारी घेतल्याने पारंपरिक पुरुषप्रधान दडपणातून बाहेर पडण्यास मोठी मदत झाली. मुलींना या मोहिमेत ओढण्यास प्रारंभी विरोधही होत होता. पण एकदा मोहीम सुरू झाल्यावर पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांनीही समर्थपणे जबाबदारी पेलली. त्यांचा आत्मविश्वास वाढला आणि समाजाची दृष्टीही बदलली. स्त्रियांसाठी खास शैक्षणिक योजना आखल्या गेल्या. क्रांतीपूर्व काळात मोठ्या संख्येने वेश्या व्यवसाय व मोलकरणी म्हणून काम करीत असलेल्या स्त्रियांना त्याचा मोठा फायदा झाला. विविध प्रकारचे कसब/शिक्षण घेऊन या स्त्रिया बालसंगोपन, आरोग्य–सेवा, वाहतूक, बँका इ. नोकरी–व्यवसायात सामील झाल्या.

**आरोग्य** : शिक्षणाप्रमाणेच कूबामध्ये आरोग्य सुधारणा कार्यक्रमावर मोठा भर देण्यात आला. क्रांतीनंतर ३५% डॉक्टर देश सोडून गेले, अमेरिकेहून औषधपुरवठा बंद झाला. पण आरोग्याबाबतच्या धोरणाची दिशाच बदलून कूबाने वेगाने प्रगती साधली. भांडवली व्यवस्थेत भर असतो रोगी बरा करण्यावर. कारण औषधकंपन्यांची बाजारपेठ व डॉक्टरांचा धंदा त्यावर अवलंबून असतो. समाजवादी व्यवस्थेत भर आहे तो आजार टाळण्यावर व नागरिक निरोगी बनवण्यावर. यासाठी साथीच्या रोगांवर मात करणे अग्रक्रमाचे. ट्रेड युनियन्स, स्त्री संघटना, स्थानिक पातळीवरील क्रांतीबचाव समित्या (Committee for Defence of the Revolution) व इतर जनसंघटना यांचे साहाय्य घेऊन लसीकरणाच्या देशव्यापी मोहिमा राबविल्या. (देवी, क्षय, पोलिओ इ.) डास निर्मूलन मोहिमाद्वारे मलेरिया नियंत्रणाखाली आणला तर पिण्याचा पाणीपुरवठा सुधारून पोटाचे व अन्य$रोग आटोक्यात आणले. आहार, आरोग्यशिक्षण, व्यायाम, खेळ यावर भर देऊन प्रकृती सुदृढ बनवण्यावर लक्ष केंद्रित केले. आज २५% जनतेचा कोणत्यातरी खेळात नियमितपणे सहभाग आहे. आवश्यक त्या वैद्यकीय सुविधा खेड्यापाड्यात पोचवून बाळंतपण व इतर सोयी गावोगावी पोचल्याने बालमृत्यूचे प्रमाण कमी होण्यास मदत झाली. १९६० साली बालमृत्यूचे प्रमाण १००० मागे ६५ होते ते वरील मार्गांनी कमी करत १९९९ साली ७ पर्यंत उतरवले. आरोग्यसेवा सार्वत्रिक करण्यावर खास भर देऊन १७६ लोकसंख्येमागे एक डॉक्टर व त्याच्या दीडपट नर्सेस उपलब्ध करून देण्यात आल्या. स्त्रियांमध्ये शिक्षणाचा प्रसार व नोकरीची संधी यामुळे स्त्रिया चूल व मूल या वर्तुळातून बाहेर पडल्या. सेवानिवृत्ती वेतन व सामाजिक सुरक्षा व्यवसायामुळे मुलांवरील अवलंबित्व दूर झाले तसेच मुले अकाली मरण्याचा धोका मोठ्या प्रमाणात कमी झाल्यामुळे जननदरात झपाट्याने बदल झाला. १९५५ ते ९० या काळात

जननदर ४.७ पासून १.६ पर्यंत उतरला. (तक्ता ३)

कूबामध्ये देशांतर्गत आरोग्य व्यवस्थेत मोठ्या सुधारणा घडवून आणल्या एवढेच नाही, तर लॅटिन अमेरिकन देशांना वैद्यकीय मदत करण्यासाठी सुमारे २६०० कूबन डॉक्टर आंतरराष्ट्रीय मोहिमात सहभागी होत आहेत. वैद्यकीय संशोधनामध्ये लसींच्या संशोधनावर मोठा भर आहे. (उदा. कावीळ (ब), कॉलरा, मेनिनजायटिस) लहान मुलांना रोगसंसर्ग होऊ नये म्हणून उपाय, रक्ताभिसरण आणि एकूण तंदुरुस्ती राखण्यास (rejuvenation) मदत करणारी औषधे अशा विविध उपाययोजनांद्वारे रोगनिवारण व प्रकृती निरोगी राखण्यावर लक्ष केंद्रित केलेले आहे. परिणामी व्याधी व क्लेश किमान, आजारामुळे कामाचे दिवस वाया जाणे किमान व औषधखर्च कमीतकमी करणे शक्य झाले.

**नागरी सेना दल** : (militia) देशाच्या संरक्षणासाठी १९५९ मध्ये नागरी सेनादल उभे करण्यास प्रारंभ झाला. १९६० साली त्यामध्ये २ लाख शेतकरी, कामगार आदी सामील झाले. सायंकाळी आणि रविवारी सैनिकी प्रशिक्षण चाले. नागरी सेनादलाचे प्रशिक्षण व संघटन चे गेवाराच्या मार्गदर्शनाखाली होत होते. याशिवाय डॉक्टर, इंजीनिअर यांची दलेही उभारली होती. नागरी सेनादलात सामील होऊन क्रांतिकार्यात सहभागी होणे हे मध्यमवयीन स्त्रिया, परंपरेने कनिष्ट सामाजिक स्थान असलेले निग्रो* यांनाही शक्य असल्याने आम कूबन जनतेला या सेनादल चळवळीचे मोठे आकर्षण वाटे. नागरी सेनादले व विविध जनसंघटना- स्त्री संघटना, क्रांतिकारी तरुणांची दले यास संलग्नित "दक्षता समिती' संघटित केलेल्या होत्या. प्रत्येक वस्तीत, मोहल्यात, कारखान्यात, सहकारी संघटनांमध्ये या समित्या प्रतिक्रांतिकारक व्यक्तींच्या हालचाली, परकीय हस्तकांच्या प्रसार आदी कारवायांवर लक्ष ठेवत व त्याविरुद्ध जरूर ती कारवाई केली जाई. अशा रीतीने विविध घातपाती कारवाया व कट-कारस्थाने उघडकीस आणून सी.आय.ए. च्या हस्तक्षेपापासून बचाव करणे शक्य झाले. कारण बहूसंख्य श्रमिक जनता मोठ्या उत्साहाने व अभिमानाने सेनादल व अन्य नागरी संघटनांमध्ये सहभागी होती.

**स्त्रीमुक्तीसाठी नवी धोरणे व संघटन** : कूबाच्या समाजवादी सरकारसमोर आणखी एक आव्हान होते - स्त्रियांचे आर्थिक-सामाजिक स्थान बदलण्याचे. कूबन समाजातील स्त्रियांची परिस्थिती इतर देशांतल्या स्त्रियांसारखीच होती. चूल आणि मूल या चाकोरीला स्त्रिया बांधलेल्या होत्या. अनेक मुले बालपणीच दगावत. १०-१५ बाळंतपणांच्या फेऱ्यात अडकलेल्या स्त्रिया झिजून मृत्यूमुखीही पडत. मुले सांभाळत असतानाच चूल कायम पेटती राहावी, यासाठी घराबाहेर पडून कामही करावे लागायचे. ज्या स्त्रियांना काम मिळायचे, त्यांना पुरुषाच्या निम्मेच वेतन मिळायचे. क्रांतीपूर्व काळात कूबामधील स्त्रियांची परिस्थिती किती भयानक होती हे पुढील आकडेवारीवरून येईल.

१९४० साली सुमारे १ लक्ष स्त्रिया अकुशल कामगार म्हणून अपुऱ्या वेतनावर म्हणजे दरमहा २५ डॉलर्सपर्यंतच्या वेतनावर पूर्ण वेळ काम करीत होत्या व ७००० स्त्रिया घरकाम किंवा किरकोळ हस्तोद्योग करून प्रपंचाला हातभार लावीत होत्या. ४,५४,००० स्त्रिया पूर्ण बेकार होत्या, कामधंदा

शोधीत भटकत होत्या. कधी कधी जुजबी अर्धवेळाचे काम मिळे, ते नसले म्हणजे भिक्षा मागणे किंवा शरीरविक्रय करणे एवढाच पर्याय असे. कूबाची राजधानी हावाना म्हणजे स्पॅनिश, इटालियन व अमेरिकन श्रीमंतांचे नंदनवन. हावानामध्ये कोवळ्या तरुण मुली स्वस्त किमतीत पर्यटकांच्या "सेवेत' हजर केल्या जात. अशा गुलामीच्या खाईत, व्याधीग्रस्त अवस्थेत हजारो स्त्रिया अगतिकतेपोटी ढकलल्या जात होत्या. शिक्षण नाही म्हणून कमी वेतन, नाहीतर बेकारी. बेकार म्हणून वेश्याव्यवसाय. अशा तऱ्हेने स्त्रियांचे सर्व बाजूने शोषण होत होते.

कूबन समाजातील सर्व तऱ्हेचे शोषण संपवण्याचे, समतेचे उद्दिष्ट समोर ठेवलेल्या क्रांतिकारी सरकारने स्त्रियांच्या प्रश्नांकडे गांभीर्याने लक्ष दिले. क्रांतीनंतर एका वर्षातच म्हणजे १९६० साली कूबन महिला फेडरेशनची स्थापन केली गेली. स्त्रियांच्या प्रश्नांवर उपाय शोधण्यासाठी बोलावलेल्या परिषदेला हजारो पुरुषही उपस्थित राहिले आणि स्त्रियांना समान अधिकार देण्याला सर्वसामान्य कूबन जनतेचाही मोठा पाठिंबा आहे, हे दिसून आले. या सभेमध्ये स्त्रियांना हीन लेखण्याच्या पारंपरिक रुढींचा तीव्र निषेध करण्यात आला. जीवनाच्या सर्व क्षेत्रात स्त्रियांना पुरुषांच्या समान अधिकार दिले जातील, असे जाहीर करण्यात आले.

जुनी राज्यघटना बदलून नवी, समाजवादी समाजाला पोषक अशी राज्यघटना बनवण्यात आली. या नव्या राज्यघटनेमध्ये माणसामाणसातील सर्व प्रकारचे, सर्व स्तरांवरचे भेदभाव नाकारण्यात आले. मानवविकासाला बाधक असणाऱ्या वंशभेद, लिंगभेदासारख्या विषमता नाकारण्यात आल्या. कूबन महिला फेडरेशन आणि कूबन सरकारने राज्यघटनेला सुसंगत अशी धोरणे राबवायला सुरुवात केली. स्त्रियांच्या व्यक्तिमत्वाच्या व विकासाच्या आड येणाऱ्या अडचणींचे निर्मूलन करण्याच्या योजना बनवण्यात आल्या व क्रांतीपूर्व काळातील महिलांची परिस्थिती पूर्ण बदलून टाकली. सक्तीचे गरोदर–बाळंतपण संपले आणि बेकारीही संपवली. शिवाय त्यांचा शिक्षणामध्ये लक्षणीय विकास घडवून आणला. १९८५ साली पदवीधर मुलींची संख्या ४६ हजारपर्यंत गेली व स्त्रियांना चांगल्या नोकऱ्या मिळतील, अशी परिस्थिती निर्माण केली. कामाच्या ठिकाणी पुरुषांच्या बरोबरीने वागणूक आणि वेतन मिळवून दिले.

कामाच्या ठिकाणी स्त्रियांना संघटित करण्यात येऊ लागले. ग्रामीण भागात त्यांना शेतकरी संघटनांत व इतर ग्रामसंघटनांत सामील करून घेण्यात आले. त्यामुळे त्यांना नव्या व सुधारित पद्धतीने शेतकाम करणे माहीत होऊन कामात एकसूत्रीपणा येऊ लागला. पुरुष व स्त्री कामगार यांची पूर्वी खातेवार विभागणी होत असे, ती बंद करण्यात आली व स्त्री असो की पुरुष असो, कामगारांच्या गुणवत्तेप्रमाणे व कार्यक्षमतेप्रमाणे काम देण्यात येऊ लागले. स्त्रियांची क्षमता व गुणवत्ता वाढावी म्हणून त्यांच्यासाठी तांत्रिक शिक्षणाची केंद्रे उघडण्यात आली. त्यांमध्ये शेकडो तरुण मुली शिकू लागल्या. तारुण्याची सीमा ओलांडलेल्या स्त्रियासुद्धा उत्साहाने त्या वर्गांमध्ये शिकत होत्या. बहूतेक सर्व मेकॅनिकल

इन्स्टिटय़ूटमध्ये स्त्रिया आज मोठ्या आत्मविश्वासाने काम करीत आहेत. उत्पादनामधील स्त्रियांचा सहभाग वाढवण्याच्या कामी फेडरेशनची मदत फार मोलाची होती. फेडरेशनच्या सहकार्यामुळे शासनाला नवनिर्मितीच्या सर्जनशील कार्यांयमध्ये बहूसंख्य स्त्रियांचा सहभाग लाभला. १९७४ साली ६ लाख स्त्रिया वेगवेगळ्या यांत्रिक उद्योगांच्या विभागात तांत्रिक शिक्षण घेतलेल्या कामगार, टायपिस्ट किंवा स्टेनो म्हणून काम करीत होत्या. त्यांचीही संख्या वाढत गेली. १९८६ मध्ये ८ लाख स्त्रिया ही कामे करू लागल्या होत्या.

फेडरेशनची विशेष अवघड व लक्षणीय कामगिरी म्हणजे कूबामध्ये वेश्याव्यवसायात ढकलेल्या स्त्रियांचे आर्थिक व सामाजिक पुनर्वसन. त्यांना शारीरिक व्याधी, मानसिक गुलामी आणि बौद्धिक शैथिल्य यातून बाहेर काढून शिक्षणाची व श्रमाची गोडी निर्माण करणे, आर्थिक–सामाजिक जबाबदारी घेण्यास सक्षम व समर्थ बनवणे आणि विविध उद्योग–शेतीत मानाचे स्थान मिळवून देऊन गुलामीतून मानवी जीवनाकडे वळवण्याचे मोलाचे काम महिला फेडरेशनने यशस्वीरीत्या पार पाडले. वेश्याव्यवसायाची कूबातून हकालपट्टी केली. फेडरेशनची दुसरी अवघड कामगिरी म्हणजे राजकीय कैद्यांच्या कुटुंबियांचे पुनर्वसन. आडगावे, डोंगरी मुलूख येथे सी.आय्.ए. च्या जाळ्यामुळे देशविरोधी कृत्यात अनेक शेतकरी अडकले होते. त्यांना शिक्षा करायला लागल्यावर त्यांच्या बायका मुलांची व्यवस्था हावानाच्या मिरामर या क्रांतीपूर्व उच्चभ्रू श्रीमंतांच्या हिरव्याशार उपनगरातील निवासांमध्ये करण्यात आली. या आलीशान उपनगरात विद्यार्थ्यांयसाठी वसतीगृहे व शेतकरी स्त्रिया–मुलींची वसाहत आणि किनारे, बोट क्लब, पोहोण्याचे तलाव आदी सुविधा उपलब्ध करण्यात आल्या. खेड्यातील स्त्रिया–मुलींना शहरी वेशभूषा, राहाणी, शिक्षण व उद्योग–नोकरी याची ओळख करून देऊन त्यामध्ये रुळवण्याचे कठीण काम फेडरेशनच्या निष्ठावंत–प्रगल्भ सदस्यांनी पार पाडले.

महत्प्रयासाने विकसित केलेल्या समाजवादी व्यवस्थेचे रक्षण, देशाचे राजकारण यांमध्ये स्त्रिया जीव ओतून काम करीत आहेत. अर्थ–व्यवस्थापनाच्या राजकीय विभागात त्या लहान–मोठ्या अधिकारी आहेत, मंत्री आहेत, देशाच्या रक्षणासाठी त्यांनी स्त्रियांची संरक्षण पथकेसुद्धा बनवली आहेत.

""आपला आजचा समाज स्त्रियांच्या आकांक्षा पूर्ण करणारा आणि मुलांच्या भवितव्याला सुरक्षितपणा आणून त्यांना नव्या नव्या संधी उपलब्ध करून देणारा समाज आहे़. आपल्या या समाजव्यवस्थेत जुलूम नाही की दारिद्र्य नाही. या व्यवस्थेने स्त्रियांना शिक्षणाची संधी दिली, त्याबरोबर आर्थिक स्थैर्यही दिले.. ही समाजरचना अगदी वेगळ्या पद्धतीची आहे. तिची वेगळी मूल्ये आमच्या स्त्रिया जोपासत आहेत, कारण त्या मूल्यांनी त्यांना माणूस म्हणून प्रतिष्ठा मिळवून दिली आहे.''– *कूबा फेडरेशनच्या अध्यक्षा विल्मा हप्सिन यांचे महिला फेडरेशनच्या परिषदेतील भाषण.*

### ५. **आर्थिक आणीबाणी**

१९९० साली सोविएत युनियनमधील समाजसत्तावाद कोसळल्यावर कूबाची अर्थव्यवस्था

कोसळण्याच्या बेतात आली. कारण १९६० साली अमेरिकेने कूबातून साखर–आयात बंद केल्यावर कूबाची पुरी आर्थिक कोंडी झाली होती, तेव्हा सोविएत युनियनच्या मदतीच्या साहाय्याने कूबाची अर्थव्यवस्था सावरली होती. सोविएत युनियनला साखरेची निर्यात करून इंधन तेल, रासायनिक खते व कीटकनाशके यंत्रे, खाद्यवस्तू आदींचा पुरवठा सोविएत युनियनकडून सुरू झाला. आयात–निर्यात व्यापा ारात आलेली तूट सवलतीच्या कर्जाद्वारे भरून काढण्याची तरतूद सोविएत युनियनने केली व संरक्षणासाठी लष्करी साहित्य पुरवठा सुरू केला. तांत्रिक व अन्य तज्ञ सल्ला व प्रशिक्षण व्यवस्था करण्यात आली. सोविएत युनियनमधून आयात केलेले पेट्रोलियम आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत विकून कूबाला डॉलर मिळवणे शक्य झाले े. चीन व पूर्व युरोपीय समाजवादी देशांचेही सहकार्य मिळाले. आंतरराष्ट्रीय बाजारात साखरेच्या भावात झंझावाती चढउतार होत असते. सोविएत युनियनने स्थिर किंमतीला ठरीव टन साखर (५० लाख) उचलण्याचा करार केल्यामुळे उत्पन्नातील अनिश्चितता दूर झाली. सरासरीने पाहाता सोविएत युनियनकडून साखरेच्या खरेदीत बाजारपेठेपेक्षा २ ते ३ पट अधिक भाव कूबाला मिळाला. सोविएत युनियनने १९५९–७३ या काळात ४ अब्ज डॉलरचे कर्ज विनाव्याज पुरवले (कूबातील भांडवली गुंतवणुकीच्या २५% रक्कम) व त्याची परतफेड १९८६ नंतर २५ वर्षे कालावधीत करण्यास मुभा दिली. कूबाची ८५% आयात समाजवादी देशांकडून होई. या काळात राष्ट्रीय उत्पन्नाशी आयातीचे प्रमाण बरेच वाढले.

क्रांतीपूर्व काळात कूबाची अर्थव्यवस्था अमेरिकेवर परावलंबी होती ती क्रांतीनंतर समाजवादी देशांवर अवलंबी बनली. त्यामुळे पूर्व युरोपीय देश व सोविएत युनियनमधील समाजवादी अर्थव्यवस्था कोसळल्यावर कूबामध्ये आर्थिक आणीबाणीच निर्माण झाली.* परिणामी खते व कीटकनाशकांच्या आयातीत ८०% कपात, इंधन तेलाच्या आयातीत ५३% कपात करावी लागली. त्यामुळे रासायनिक शेतीचा पायाच कोलमडला.* शिवाय दूध व अंडी उत्पादनही अडचणीत आले. कारण १९६० नंतर स्थानिक जातींऐवजी सोविएत युनियनकडून आयात होणाऱ्या धान्यावर पोसलेल्या सुधारीत गायी व कोंबड्यांचा प्रसार करून उत्पादनवाढ साधली होती. धान्याची आयात बंद झाल्याने पुन्हा माफक उत्पन्न देणाऱ्या, चाऱ्यावर पोसलेल्या स्थानिक गाऱ्इंकडे वळणे भाग पडले व एकदम दूध अंड्यांचा तुटवडा निर्माण झाला. गव्हाची आयात ५०% कमी करावी लागली. अनेक खाद्यपदार्थांची आयात बंद झाली. कूबात सुमारे ५७% कॅलरीपुरवठा आयात अन्नखाद्यामार्फत होई तो जवळपास बंद पडल्याने बिकट टंचाई निर्माण झाली. शेतीप्रमाणे औद्योगिक उत्पादनही मोठ्या प्रमाणात घसरले. बस वाहतुकीत मोठी घट करावी लागली. (रोजच्या बसखेपा ३०,००० वरून ६००० वर उतरल्या) तेव्हा सायकल उत्पादनावर लक्ष केंद्रित केले. २० लाख सायकली मिळवल्या.

**शेतीची फेररचना** : या संकटाला तोंड देण्यासाठी कूबाने अर्थव्यवस्थेचे युद्धजन्य परिस्थितीप्रमाणे नियमन सुरू केले. अन्नपुरवठा निम्म्यावर घसरला तेव्हा सर्वांना किमान अन्न मिळावे यासाठी अन्नाचे व

पेट्रोलचे कडक रेशन केले आणि शेतीमध्ये आमूलाग्र पुनर्रचना सुरू केली. रासायनिक व यांत्रिक शेती बंद पडल्याने कूबा जैविक शेतीकडे वळला. राष्ट्रीय मूलभूत शेती संशोधन संस्थेद्वारा सेंद्रीय शेतीचे तंत्र विकसन, शेतकऱ्यांना मार्गदर्शन, रोपवाटिकातून खास रोपे पुरवठा अशी मदत सुरू केली. पीक संरक्षण संशोधन संस्थेमध्ये कीडनियंत्रणाच्या जैविक उपाययोजनांवर संशोधन वेगाने विकसित केले. देशाच्या विविध भागात २०० उपकेंद्रे सुरू केली. या केंद्रांमधून शेतकऱ्यांना जैविक उत्पादने, सल्ला व मार्गदर्शन सुरू केले. सेंद्रीय शेतीकडे स्थित्यंतर करणे व्यक्तिगत किंवा सहकारी शेतावर सोपे होते. कारण शेतजमिनीच्या सर्व मशागतीची जबाबदारी छोट्या गटावर होती. ट्रॅक्टरऐवजी बैलाने नांगरट, सेंद्रीय खते, गांडूळ खतनिर्मिती व वापर, जैविक कीडनियंत्रण याचा स्थानिक परिस्थितीनुरूप वापर सुरू करून सुमारे २०% शेतीक्षेत्रात जैविक शेतीकडील स्थित्यंतर २/३ वर्षांत घडवून आणणे शक्य झाले. पण हे बदल महाकाय शासकीय शेतांवर शक्य नव्हते (८०% क्षेत्र). तेथील शेती प्रमाणित, यांत्रिक पद्धतीने चाले. एक–दोन व्यवस्थापक ठरीव पद्धतीने शेतकामगारंच्या पलटणींद्वारा नांगरणी, लावणी, कापणी आदी कामे पुरी करीत. अशा सरधोपट व्यवस्थेद्वारा जैविक शेती करणे शक्य नव्हते. कारण त्यामधील निगराणी परिस्थितीनुरूप सूक्ष्मपद्धतीने व काळजीपूर्वक केली तरच चांगले उत्पादन मिळू शकते. तेव्हा महाकाय शेती व्यवस्थेत बदल करण्यास १९९३ मध्ये प्रारंभ केला. कामकऱ्यांचे छोटे गट पाडून ठरीव शेतजमिनीच्या मशागतीची सर्व जबाबदारी छोट्या गटांवर सोपवण्यात आली. शेत–कामकरी शेतजमिनीच्या विशिष्ट क्षेत्राशी जोडण्याच्या दृष्टीने सहकारी उत्पादक घटक निर्माण करण्यात आले. प्रत्येक सहकारी समूहाचे उत्पादक सदस्य दैनंदिन निर्णय व कामकाजासाठी एका व्यवस्थापक समितीची निवड करतात. विशिष्ट पिकांचा शासनाने नेमून दिलेला हिस्सा (टीोोंिर) पुरा करण्याच्या दृष्टीने पीक संयोजन, निगराणी, आदीचे निर्णय व्यवस्थापक समिती घेते. शासनाला हिश्श्याप्रमाणे पुरवठा केल्यावर उरलेेले उत्पादन बाजारात विकण्यास मुभा देण्यात आली. यासाठी शेतकऱ्यांचे बाजार उघडण्यात आले. शेतीसाठी आवश्यक तो भांडवली निधी–पुरवठा शासनाकडून केला जातो. उत्पन्नाची विभागणी सदस्यांमध्ये कामाच्या प्रमाणात करण्यात येते. जमीन, वित्त पुरवठा व महत्त्वाच्या शेतमालाची खरेदी व वितरण हे शासनाच्या नियंत्रणाखाली ठेवून शेतीचे व्यवस्थापन व पिकांची मशागत हे सहकारी गटांच्या ताब्यात दिल्याने काळजीपूर्वक निगराणी साधली जाऊन उत्पादन वाढ साधणे शक्य झाले.

**नागरी मोहीम** : कूबामध्ये ८०% जनता नागरविभागात राहाते. शहरातील लहान मोठ्या मोकळ्या जमिनींच्या तुकड्यांचा उपयोग करून भाजीपाला पिकवणे व कोंबड्या–डुकरे पाळणे या कार्यक्रमात सर्व नगरवासियांनी सामील व्हावे यादृष्टीने खास योजना आखण्यात आल्या. समाजवादी शासनाच्या धोरणानुसार खाजगी मोटारगाड्यांची वाढ नियंत्रित केलेली आहे. त्यामुळे पेट्रोलची बचत करता येते तसेच प्रदूषण मर्यादित राहातेे. शहरांमध्ये प्रदूषणाचा प्रश्न नसल्याने भाज्या, फळे, अंडी, मांस याचे

उत्पादन घेणे शक्य होते. शहरांमध्ये कार्यवाहीत आणलेल्या "अन्न पिकवा' मोहिमेखाली तीन प्रकारच्या योजना हाती घेण्यात आल्या – १) परसबाग – कुंडी , गॅलरी, गच्चीपासून वसती–स्थानातील सर्व जागामंध्ये परसबाग फुलवण्यास उत्तेजन देण्यासाठी रोपे पुरवठा, घरचा ओला कचरा खत म्हणून वापरावयाचे मार्गदर्शन व गांडूळखत पुरवठा सुरू करण्यात येऊन परसबाग उत्पादकांचे गट (लश्रील) स्थापण्यात आले. या परसबागांमधून भाजीपाला, केळी, पपई, अननस आदी फळे, कोंबड्या व डुकरे पालन केले जाते. २) संस्थांच्या बागा – कारखाने, शाळा, महाविद्यालये, इस्पितळे आदी संस्थांच्या आवारामध्ये शहर–पातळवरील ओला कचरा व मळी वापरून मुख्यत: शासकीय सहकारी संघटनांद्वारा अन्न पिकवण्याची मोहीम हाती घेण्यात आली. येथील विद्यार्थी, कामगार, कर्मचारी या उपक्रमात सवडीचा वेळ देतात. विद्यार्थी, कामगार यांना शिक्षा द्यावयाची झाल्यास बागकामाच्या रुपात दिली जाते. ३) उंच वाफ्यातील (ीरळीशव लशव) बाग – जुने मोटार तळ (लरीरिीज्ञ) जे खाजगी गाड्या नसल्याने मोकळेे पडले आहेत आणि शहराच्या आसमंतातील पडजमीन– जेथे जमिनीत लागवड शक्य नाही – अशा मोकळ्या जागेवर मळी, कचऱ्याचे खत व माती यांच्या मिश्रणात भाजीपाला लावण्यात येत आहे. वाफे म्हणून जुने टायरही वापरले जातात. अन्न पिकवा मोहिमेत नागरिक मोठ्या उत्साहाने सामील झाले आहेत. १९९७ साली शहरातील बागांमधून सुमारे ५.५ लाख टन भाजी–फळे–मांस पुरवठा झाला आणि अन्न पिकवा मोहिमेमुळे शहरांच्या नाशवंत खाद्यवस्तूंच्या गरजा शहरातल्या उत्पादनाआधारे भागवल्या जाऊ लागल्या. वाहतूक, साठवणूक खर्च व त्यातील उधळमाधळ वाचली. शहरातील रोजगार वाढला. ग्रामीण विभागातल्या दरापेक्षा स्वस्त दरात, ताजा व रसरशीत माल शहरातील मंडईत मिळू लागला. अन्नपदार्थांचे उत्पादन ६–७ वर्षात मोठ्या प्रमाणात वाढवून १९९८ मध्ये कूबा तीव्र अन्नटंचाईच्या गंभीर संकटातून बाहेर पड>ला.

कूबामध्ये समाजवादी शासनाने संशोधनाचा भरभक्कम पाया तयार केल्याने अल्प काळातच रासायनिक शेतीकडून सेंद्रीय शेतीकडे वळणे शक्य झाले. उती संवर्धन तंत्राचा वापर करून केळ्यांचे खुंट, उसाचे बेणे, अननसाचे डोळे यांच्या उपलब्धतेत मोठी वाढ साधली. गांडूळ खते, जैविक खते व कीडनियंत्रण पद्धती विकसित केल्या. उसांची उत्पादकता व साखरेचे प्रमाण वाढवण्याच्या दृष्टीने जीवतंत्रवैज्ञानिक संशोधन चालू आहे.

**उत्पन्न घट** : सोविएत युनियनमध्ये समाजसत्तावाद कोसळून आयात–निर्यात व्यापार ७५ टक्क्यांनी घसरला. त्यामुळे शेती व उद्योगांच्या उत्पादनात ४०–५० टक्क्यांनी घट झाली. परिणामी १९९०–९४ या काळात राष्ट्रीय उत्पन्न ३५ टकक्यांनी घसरले. ही घसरण$ १९९४ पासून थांबून त्यानंतर दरडोई उत्पन्नात प्रतिवर्षी सरासरीने ३.६% वाढ झाली. अर्थात १९९० पासून ५–६ वर्षे अत्यंत खडतर, अर्ध–उपासमारीचे जीवन लोकांनी जबाबदारपणे स्वीकारले. देशाचे स्वातंत्र्य व स्वायत्तता वाचवणे, समानतापर व न्याय्य समाजवादी व्यवस्था टिकवणे यासाठी एकदिलाने कूबन जनता उभी

राहिली त्यामुळेच अत्यंत बिकट आर्थिक संकटातून ती पार पडू शकली.

**परकीय व्यापार** : देशातील अन्नखाद्य पुरवठा सर्व नागरिकांच्या भगिरथ प्रयत्नांने सुधारला तरी कूबासारख्या चिमुकल्या देशाला मोठ्या प्रमाणात अनेक खाद्यपदार्थ (गहू कूबात पिकत नाही), इंधनतेल, रसायने, औषधे, यंत्रसामग्री अशा अनेक मूलभूत गरजांसाठी आयातीवर अवलंबून राहाणे अनिवार्य आहे. कूबाची प्रमुख निर्यात साखरेची आहे. परंतु सोविएत युनियन व पूर्व युरोपीय समाजवादी देश यांच्याकडून होणारी साखर आयात बंद झाल्याने कूबा नव्या बाजारपेठा शोधू लागला. स्पेन, कॅनडा, रशिया आदी देशांना काही प्रमाणात निर्यात सुरू झाली.* तरी अजून साखरेची बाजारपेठ मर्यादितच आहे व बाजारभावात प्रचंड चढउतार होत असल्याने परकीय चलन मिळवण्याचे अन्य मार्ग चोखळण्याविना गत्यंतर नाही. कूबन संगीत युरोप-अमेरिकेत लोकप्रिय आहे.तेव्हा संगिताच्या ध्वनीफिती, सीडी यांची निर्यात वाढत आहे. परकीय चलन मिळवण्यासाठी पर्यटन व्यवसायास उत्तेजन द्यावे लागत आहे. क्रांतीपूर्व काळात कूबा हे पर्यटकांचे नंदनवन होते. क्रांतीनंतर द्यूतगृहे, वेश्यागृहे बंद केल्याने हा व्यवसाय कमी झाला. अमेरिकी साम्राज्यशाही अंमलाचा परिपाक – स्त्रीचा स्वाभिमान तुडवणारा, उपभोग्य वस्तू म्हणून स्त्रीदेह कुस्करणारा वेश्याव्यवसाय समाजवादी शासनाने पद्धतशीरपणे निपटून काढून सर्व स्त्रियांना ताठ मानेने जगण्याची संधी दिली, त्याच कूबावर अर्थव्यवस्था चालवण्यासाठी पर्यटन व्यवसायाकडे वळावे लागावे हा मोठा शोचनीय पेच आहे.

**परकीय पर्यटन** : कूबातील निळाशार समुद्र, सूर्यस्नानासाठी विलोभनीय अशा विस्तृत पुळणी, हिरव्यागार डोंगरदऱ्या, धबधबे असा समृद्ध निसर्ग, ऐतिहासिक वास्तू, पारंपरिक संगीत व नृत्ये ही पर्यटकांना खेचणारी आकर्षणे आहेतच. पण पर्यटकांना वाटणारी स्वर्गीय पर्वणी म्हणजे कूबातील गौरवर्णीयांपासून कृष्णवर्णीयांपर्यंत विविध रंगढंगांच्या युवती आणि युवक. युरोप अमेरिकी पर्यटन व्यवसायामध्ये काम-पर्यटनाला (sex tourism) सर्वात महत्त्व आहे. कूबा त्यादृष्टीने पर्यटकांचे नंदनवन. तरुण मुली या धंद्यात खेचल्या जाऊ नयेत म्हणून शासनाचे सर्वतोपरी प्रयत्न चालू आहेत. हावानामध्ये स्थलांतर करण्यावर बंधने आहेत. कूबन महिला फेडरेशनने वेश्याव्यवसायाकडे ओढल्या जाणाऱ्या तरुणींना घरी भेटी देऊन, त्यांना मार्गदर्शन करून, शिक्षण व व्यवसायाकडे वळवून त्यांचे पुनर्वसन करण्याचे कार्यक्रम हाती घेतले आहेत. परंतु कूबाचा मुख्य प्रश्न आहे आयात-निर्यात व्यापार कोसळल्याने निर्माण झालेली गरिबी व त्यातून मार्ग काढण्यासाठी स्वीकारलेली पर्यटन व्यवसायातील परकीय गुंतवणूक. परकीय गुंतवणूकदार वेश्याव्यवसायाला उत्तेजन देत आहेत कारण त्याद्वारे त्यांना भरपूर नफा कमावता येतो. गरिबीमुळे तरुण-तरुणी या व्यवसायाकडे ओढता येतात. शिवाय पर्यटन व्यवसायाबरोबर अमेरिकेतील फॅशनेबल बूट, कपडे, सौंदर्य प्रसाधने यांचे आकर्षण तरुण वर्गात वाढत आहे व त्यासाठी डॉलर कमवण्याचा कोणाही तरुणाला उपलब्ध मार्ग म्हणजे समलिंगी धंदा. पर्यटन व्यवसायातून कूबामध्ये अशा प्रकारे भांडवली विकृती पसरत आहेत. बेकारी-अर्धबेकारीमुळे कूबन

तरुण समलिंगी व्यवसायात ओढले जात आहेत. त्याबाबत शासनाचे धोरण तेवढे कडकही नाही.

**डॉलरशी तडजोड** : १९९४ पासून कूबामध्ये डॉलर चलनही स्वीकारले जाऊ लागले. प्रारंभी १ डॉलर = १३० पेसो असा विनिमय दर होता. परकीय–पर्यटन (हॉटेल, रेस्तॉराँ>, टॅक्सी इ.) व्यवसायातील उत्पन्न, परदेशातून येणारे पैसे (Remittances) आणि खास कसबी व्यवसाय व कामातील गुणवत्ता  यास शासन देत असलेल्या प्रोत्साहनाद्वारे होणारी डॉलर कमाई यातून कूबन जनतेला डॉलर मिळवता येतात. १९९९ साली सुमारे ५०% जनतेला डॉलर उपलब्ध होते.  शिवाय पेसो बदला डॉलर खरीदता येतात. डॉलरचे खास आकर्षण$ आहे कारण आयात अन्नखाद्य, औषधे व विविध उपभोग्य वस्तू डॉलर चलनातील दुकानांमध्ये मिळणे सुलभ जाते. १९९४ साली साखरेच्या निर्यातीचे उत्पन्न ८० कोटी डॉलर होते, तर पर्यटन व्यवसायापासून ८५ कोटी डॉलर मिळाले. डॉलर मिळवण्याच्या कूबाच्या या प्रयत्नात खोडा घालण्यासाठी अमेरिकेने १९९२ साली तोरिचेल्ली कायदा व १९९६ साली हेल्म्स–बर्टन कायदा करून अमेरिकेतील कूबन्सना कूबातील कुटुंबियांना डॉलर पाठविण्यास बंदी, कूबामध्ये पर्यटनास जाण्यावर बंदी आदी बंधने घातली. (पण अमेरिकन पर्यटक कूबाला जातात) पर्यटन व्यवसायाच्या विस्तारामुळे डॉलरची उपलब्धता वाढून पेसोचा भाव हळूहळू वधारला, तो जुलै १९९५ मध्ये ३० पेसो = १ डॉलर आणि १९९८ मध्ये २० पेसो = १ डॉलर असा झाला.

पर्यटनाला मोठे उत्तेजन दिल्यामुळे एकूणच चंगळवाद, मिंधेगिरी, वेश्या–व्यवसाय यामध्ये वाढ , तसेच परकीय गुंतवणूक व खाजगी व्यापारास मुभा दिल्याने नफेखोरी व व्यक्तिवाद पोसला जात आहे. परंतु आज देशतील जनतेला रोजगार व किमान जीवनमान  पुरवण्यासाठी परकीय चलन मिळवण्याविना गत्यंतर नाही. परकीय व्यापारात हळूहळू वाढ होत आहे.* परंतु पर्यटन व्यवसाय हे परकीय चलन मिळण्याचे महत्त्वाचे साधन आहे. त्यातून निर्माण होणारी उत्पन्नातील विषमता मर्यादित ठेवण्याच्या दृष्टीने १९९५ मध्ये स्वयंरोजगारी व परकीय चलनात उत्पन्न मिळवणाऱ्यांवर आयकर व संपत्तीकर बसवले. बाजारपेठेला मुभा दिली तरी त्याची व्याप्ती नियंत्रित ठेवली आहे. खाजगी गुंतवणुकीवरही कडक निर्बंध आहेत. परकीय चलनाच्या बिकट अडचणीमुळे १९९० च्या दशकात कूबन अर्थरचनेत बाजारीकरण वाढवण्याची, डॉलरीकरण करण्याची वेळ आली तरी अर्थव्यवस्थेवर शासनाचे नियंत्रण आहे. जनतेच्या किमान गरजा भागवणे, सर्वांना शिक्षण व आरोग्य सुविधा देणे ही मूलभूत जबाबदारी शासन पार पाडत आहे. देशापुढील गंभीर अडचणी जनतेपुढे वारंवार व स्पष्टपणे मांडून कूबन नेते जनतेचा विश्वास व ईर्षा टिकवून आहेत. बिकट परिस्थितीमुळे कूबातून स्थलांतर मोठ्या प्रमाणात सुरू झाले पण त्यामुळे अमेरिकेत समस्या उद्भवतील या भयाने १९९४ साली अमेरिकेनेही स्थलांतरावर नियंत्रणे आणली. अमेरिकेने आर्थिक निर्बंध दूर करावे यासाठी अमेरिकेतील उद्योग–व्यापारी कंपन्यांच्या प्रयत्नांमुळे १९९८ मार्चपासून औषधे, खाद्य निर्यात व पैसे पाठवण्यावरील बंधने शिथील करण्यात आली. त्यामुळे कूबावर भोगवादाचा मारा अधिक जोरात सुरू होण्याचा धोका आहे. कूबाची आर्थिक

परिस्थिती बिकट असली तरी लॅटिन अमेरिकेतील इतर देशांचे परावलंबन व श्रमिकांची पिळवणूक यांच्या तुलनेत कूबातील समानतापर व न्याय्य व्यवस्था सरस वाटत असल्याने ती टिकवण्याची जनतेत ईर्षा आहे. सोविएत युनियनच्या अनुभवावरून समाजवादी व्यवस्था मोडून भांडवलशाही आणल्याने बेकारी व गरिबीने जनता कशी वेढली जाते हा अनुभव समोर आहे. तेव्हा समाजवादी व्यवस्थेद्वाराच अडचणींना तोंड देण्याचा प्रयत्न चालू आहे.

**खासे राष्ट्र** : स्वतंत्रता व स्वायत्तता कायम राखण्याचा कस कूबन नेते व जनतेत असल्याने कूबा जागतिकीकरणाच्या जाळ्यात अडकलेला नाही. फिदेल कॅस्त्रोंच्या शब्दात, – ""कूबासारख्या (चिमुकल्या) देशालासुद्धा शिक्षण, आरोग्य, वैद्यकीय सेवा, संस्कृती, विज्ञान, क्रीडा व इतर अनेक क्षेत्रातले विकास कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडता आले, त्याबद्दल जगात कुणीही शंका उपस्थित करीत नाहीत; आणि हे सारे अनेक दशकांच्या नाकेबंदीच्या परिस्थितीतसुद्धा कूबाला करता आले. शिवाय याच काळात कूबन चलनाचे अवमूल्यन तर सोडाच; उलट अमेरिकन डॉलरच्या प्रमाणात आपले चलन कूबाला वधारता आले. याचे रहस्य काय? रहस्य एकच. कूबा हा एकप्रकारे जगातील खाशा राष्ट्रांमध्ये मोडतो. कोणते खासे? जी राष्ट्रे आंतरराष्ट्रीय नाणेनिधीची सदस्य नाहीत अशा राष्ट्रांपैकी कूबा एक! सहाजिकच डॉक्टर नाणेनिधीच्या औषधोपचारापासून कूबा बचावलाय!''

**समाजवादी जाणिवा** : समाजवादी वाटचाल केवळ आर्थिक प्रगती करून, भौतिक गरजा भागवून होत नसते तर समाजावादी जीवनप्रणाली, समाजवादी संस्कृती माणसाच्या मनातही रुजावी लागते, त्यातून समाजवादाची वाटचाल चांगल्या तऱ्हेने होत असते. क्रांती म्हणजे फक्त राजकीय सत्तापालट नव्हे, क्रांती ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. राजकीय सत्ता ताब्यात येणे हा त्यातला पहिला टप्पा. कारण त्याद्वाराच उत्पादनांच्या साधनांवर खाजगी मालकीहक्क रद्द करून ती सामाजिक मालकीची करणे शक्य होते. राजकीय सत्तेपासून आर्थिक–सामाजिक फेररचना व त्याबरोबर लोकांची संस्कृती व जाणिवा आमूलाग्र बदलून जाणे, म्हणजे क्रांती.

२८ सप्टेंबर १९६६ रोजी केलेल्या भाषणात फिदेल म्हणतो – ""हृदयात डॉलरचे चिन्ह कोरून आम्ही समाजवादी किंवा साम्यवादी जाणीव रुजवण्याचा प्रयत्न करणार नाही.'' तो पुढे म्हणतो, ""देशाच्या कानाकोपऱ्यातील लोक, शहरातील, खेड्यातील, पहाडातील लोक आज क्रांतीच्या बाजूने भक्कमपणे उभे आहेत. कारण क्रांतीने त्यांच्यातील आत्मविश्वास जागा केला आहे. कष्टाने आणि संघर्षाने सगळे काही मिळवता येते, हा विश्वास त्यांच्यात रुजवला आहे. खरे तर, लोकांच्या अनेक भौतिक गरजा पूर्ण करायच्या राहिल्या आहेत. पण या लोकांच्या मानसिक गरजा मात्र क्रांतीने भागवल्या आहेत.''

* स्पेनच्या आणि अमेरिकेच्या वसाहतवादाखाली, नंतर बातिस्ताच्या जुलमी राजवटीखाली दडपल्या गेलेल्या कूबन जनतेमध्ये स्वाभिमान, आत्मविश्वास निर्माण केला कूबन क्रांतीने. *

पिचलेल्या शेतकऱ्यांना जमीन दिली व त्याचवेळी त्यांच्या मनांना उभारी दिली कूबन क्रांतीने. * कारखान्यांचे राष्ट्रीयीकरण करून आपल्या श्रमातून निर्माण होणारी संपत्ती आपल्या सर्वांची आहे ही भावना कामगारांच्या मनात रुजवली. प्रत्येक माणसाला स्वाभिमानाने जगता येईल अशी व्यवस्था निर्माण करून प्रत्येक माणसाला स्वत:ची वेगळी ओळख दिली कूबन क्रांतीने. * क्रांतीपूर्व कूबामध्ये समाजाची सूत्रे काही मूठभरांच्या हातात आणि लक्षावधी कष्टकरी लोकांकडे काहीच नाही अशी परिस्थिती होती. क्रांतिकारी सरकारने प्रत्येक वेळी लोकांना विश्वासात घेतले. सरकारचा लोकांवर विश्वास, लोकांचा सरकारवर विश्वास यातून कूबन क्रांतीच्या या वाटचालीमध्ये लोकांचा उत्साहपूर्ण सहभाग राहिला आहे. * हा उत्साह कूबन जनतेमध्ये आला कुठून? त्याच भाषणात पुढे फिदेल याचे उत्तर देतो – "" काही गोष्टी अशा असतात, ज्यांचे मोजमाप करता येत नाही. केवळ बेरीज–वजाबाकी, गुणाकार–भागाकार करून गणिती पद्धतीने या गोष्टी साध्य होत नाहीत. या गोष्टी म्हणजे – क्रांतीमुळे झालेले लोकांचे मानसिक / आत्मिक समाधान, या देशातल्या प्रत्येक स्त्री–पुरुषाला झालेली खऱ्याखुऱ्या माणसाप्रमाणे जगत असल्याची जाणीव, या देशातल्या लक्षावधी स्त्री–पुरुषांची आपण कुणीच नसल्याची भावना जाऊन कुणीतरी बनत चालल्याची होत असलेली जाणीव.''

फिदेल पुढे म्हणतो – ""आता खेड्यापाड्यात राहाणाऱ्या माणसांना सत्ता ही दूरवरची परकी गोष्ट वाटत नाही. अधिकार, सरकार या लांबच्या गोष्टी वाटत नाहीत. कारण आज या माणसांकडेच अधिकार आहेत. त्यांच्याकडे सत्ता आहे आणि तरीही फक्त सैद्धांतिक, बोलण्यापुरती नाही तर खरीखुरी. स्वत:च्या क्रांतीचे रक्षण करू शकणार नाही, असा एकही शेतकरी आज सापडणार नाही. लोकांच्या मनाला मिळालेला हा धीर आकड्यामध्ये मोजता येणार नाही. या गोष्टींनीच लोकांना क्रांतीशी घट्ट बांधून ठेवले आहे.''

कूबन क्रांतिकारी सरकारने लोकांशी सतत संवाद साधला. केवळ पुस्तकातून शिकवून किंवा साधनसंपत्तीचे सामाजिकीकरण करून समाजवाद अस्तित्वात येऊ शकत नाही. त्यासाठी लोकांच्या जाणिवा प्रगल्भ करणे, त्यांच्यात समाजवादी संस्कृती रुजवणेही आवश्यक असते. बळाने व सक्तीने समाजवादी व्यवस्था निर्माण होत नाही. त्यासाठी लोकांची मनेही घडवावी लागतात. समाजवादाच्या उद्दिष्ट–स्वप्नांबद्दल, ती गाठण्यासाठी आखलेल्या ध्येयधोरणांबद्दल लोकांच्या मनात एक विश्वास निर्माण करावा लागतो.

१९५९ मध्ये क्रांतीनंतर अमेरिकेने केलेले हल्ले असोत, आर्थिक नाकेबंदी असो किंवा ९०च्या दशकातील समाजवादाचा पाडाव असो आणि त्यानंतरची आर्थिक आणीबाणी असो, कूबाने समाजवादाची वाटचाल सोडलेली नाही. त्यामागची मुख्य प्रेरणा आहे कूबन जनतेचा समाजवादावरचा विश्वास आणि विकसित झालेल्या समाजवादी जाणिवा.